पुणें मराठी ग्रंथालय
क्र. दिंबरी
क्रमांक—३८०

७७/८८

मकरंदपुष्पमाला:—

पुस्तक १८ वें.

१४६२३

# निवळ प्रेमासाठीं.

( मनोरंजक

014623

लेखक:—
भारतीय.

किंमत सहा आणे.

Printer D. L. Lele. M. P. Wai.

मकरंदाची सहाव्या वर्षाची भेट.

# निबळ प्रेमासाठीं.

( मनोरंजक गोष्ट. )

लेखक

भारतीय.

प्रकाशक.

न. ना. पटवर्धन.

मोदवृत्त छा० छा०

कार्तिक शके १८३२.

किंमत सहा आणे.

समर्पण

माझे

परम प्रिय जेष्ठबंधू

यांस.

भारतीय.

# निवळ प्रेमासाठीं.

## प्रकरण १ लें.

### सिंधफळचे जहागीरदार.

हेमंतऋतूच्या सामराज्यामध्यें उडालेल्या कहरानें मृतप्राय आणि नष्टवैभव झालेल्या तरुवरांना नवजीवन प्राप्त होऊन जिकडे तिकडे अबादीअबाद झालें होतें. त्यांस पर्णकुसुमादि सर्व ऐश्वर्य प्राप्त होऊन ते पुन्हां वैभवशिखरीं प्राप्त झाले होते. बाहेरून शांत दिसणाऱ्या हेमंताच्या कारकीर्दीत मौनव्रतस्थ असलेले कोकिल आपल्यास पुन्हां स्वातंत्र्य प्राप्त झाल्यामुळें अत्यानंदित होऊन आपल्या मंजुळ रवानें प्रिय गृहावर—आम्रवृक्षावर—बसून दाहींदिशा दणाणून टाकित होते. कुसुमगण आपल्या सुगंधानें स्वजन संतोषविण्याचें काम टाकून गप बसले होते, ते आतां आपले गुणप्रदर्शन दुप्पट उत्साहानें करूं लागले होते. भूमातेच्या उदरांत जो क्रोधाग्नि पेटला होता तो आतां नाहींसा होऊन उष्णता रूपानें सूर्यनारायणांत मोक्ष पावण्यासाठीं जात होता. अशाप्रकारें वसंत राजाच्या कारकीर्दींत सर्व वनराष्ट्र सौंदर्ययुक्त झालें होतें. प्रियपती वसंत राजाच्या राज्यारोहणानें राज्ञी वनदेवता प्रसन्न झाली होती. त्यामुळें त्यांची राजधानी मनुष्य वगैरे प्रापंचिक त्रासानें संतप्त झालेल्या लोकांचे रंजनस्थान झालें होतें. स्वास्थ्य आणि शांतता पसरल्यामुळें शानशोकि आणि प्रणयी-

पक्षांच्या मनोवृत्ति उचंबळूं लागल्या होत्या. ते आपल्या प्रियजन शोधांत इकडून तिकडे व तिकडून इकडे खेपा घालीत होते.

वसंतराजाच्या आगमनानें झालेली क्रांति सर्व ठिकाणीं दृग्गोचर होत होती. ज्या ज्या ठिकाणीं हेमंताच्या कारकीर्दींत पर्णकुसुमादिकांवाचून गतवैभव दिसणारे वृक्ष, अगर कोकिळ असावयाचे तेथें तेथें हा वासंतिक मानसोल्हासी प्रकार दृष्टीस पडायचाच. मग सह्याद्रीसारख्या पर्वतराजाच्या सान्निध्यांत असलेल्या प्रदेशांत हा फरक दिसून येत असेल यांत नवल काय ? नवपल्लवयुक्त वृक्ष, सुगंधमय विकसलेलीं फुलें आणि कूजित कोकिल या सर्व कारणांनीं त्या वनांत दुःखी व कष्टी लोक आपलें दुःख क्षणभर तरी विसरावें या हेतूनें आश्रय घेत होते. या सृष्टिसौंदर्य सुखाच्या प्राप्तीमुळें त्यांची स्वतःच्या सुखाची आशा बळावत असे, आणि निराश झालेलें त्यांचें मन उत्साहपूर्ण होत असे; पण अल्लडांच्या मनांत यापेक्षां निराळे विचार जागृत होत असत. कारण; असला काळ आणि परिस्थिति ह्मणजे त्यांच्या मानसोल्हासाचे हंगाम असतात आणि अशावेळीं आत्मचिंतनाचा विशेष अम्मल बसतो.

सायंकाळची आल्हाद्कारक वेळ. वारा मंद मंद वहात होता. साधारण उष्ण मानाचे ते दिवस असल्यानें ते प्रकृतीस सुखदायक वाटत होते. सूर्यनारायण अस्ताचलास जाण्याचे बेतात होता. वृक्षांच्या पर्णकुसुमावरील चमकणारी सूर्यप्रभा पाहून दुःखीं मनुष्यासही आनंद वाटल्यावांचून राहिला नसता. अशावेळीं वनसृष्टी नवसौंदर्यानें अगदीं मस्त झाली असतां सुस्वर कोकिळ आपला आनंद मधुररवानें व्यक्त करीत असतो, आणि त्याच्या ताना ऐकून सात्विक अंतःकरणाचा मनुष्य तर अगदीं तन्मय होऊन जातो, व इतर माणसासही हा वृत्तीचा बदल थोडा वेळ अनुभवावा लागतो. अशावेळीं एक तरुण

नवबालिका आपल्या कोकिळापेक्षांही मधुर अशा आवाजानें गाणें गात होती. जणुं काय कोकिळ तान घेण्यास चुकला अथवा ज्या रागांत तो गात होता तो तरी चुकला असेल हें दाखवण्यासाठीं, अगर स्वतःच्या गुणाच्या अभिमानानें उन्मत्त झालेल्या कोकिळाचा अभिमान दूर करण्यासाठीं तिनें आपलें मनोहर गाणें सुरू केलें. तें गौरी रागांत तिनें म्हटलें.

बराच वेळ तोच राग आणि तेंच पद ती घोळून म्हणत होती. आणि मधुन मधुन कांहींसें पुटपुटतही होती. वनाच्या मध्यभागीं असलेल्या मुरलीधराच्या देवळावर ती असल्यामुळें तिला पूर्ण एकांत मिळाला होता. त्यामुळें तिनें मोठ्यानें गाण्यास अथवा स्वतःशीं उद्गार काढण्यास संकोच केला नाहीं. तिनें सुमारें अर्धा तास अशा तन्मय स्थितींत घालवला; इतक्यांत चाहूल ऐकूं आली म्हणून तिनें मागें वळून पाहिलें तों तिचे वडील आलेले दिसले. आपल्या नादांत बापाचा आदर करण्यास चुकल्याबद्दल ती लज्जेनें अधोवदन झाली. विशेषतः तिनें स्वतःशीं उच्चारलेले उद्गार त्यांनीं ऐकिले असतील अशा समजुतीनें तर ती फारच लज्जित झाली. शेवटीं ती धैर्य करून म्हणाली—

‘ बाबा, मीं आपल्या नादांत आपण केव्हां आलां हें पाहिलें नाहीं, या चुकीबद्दल क्षमा करालना ? ’

‘ तुझ्याकडून चूक मुळींच झाली नाहीं; मग क्षमा करायची कसली ? मीच तुझ्या आनंदांत व्यत्यय आणला. पण तारे ! तुझ्या त्या गाण्यानें तर मला अगदीं वेडा बनवून टाकला आहे. तुझ्या-सारख्या ईश्वरी अंशाकडून या पृथ्वीवरील पापी जनांस बोध व्हावा आणि ते सन्मार्गास लागावेत असा कांहीं परमेश्वरी संकेत तुझ्या जन्मांत असेल. कारण, तें गाणें मीं यापूर्वीं हजारदां ऐकलें असेल; पण कधींही तें

माझ्या मनांत विवेक जागृत करण्यास समर्थ झालें नाहीं; पण तोच आज निराळा अनुभव आला. तुझी ईश्वरावरची निष्ठा, सात्विक भक्ती, तुझें पवित्र मन, आणि तुझे सुविचार यायोगानें तूं आह्मांस लज्जित करते आहेस. या अविनाशी देहासाठीं आणि येथील क्षणभंगुर वास्तव्यासाठीं माणसानें सन्मार्ग सोडावा ही अत्यंत वाईट गोष्ट आहे. पण तारे! पापमयमती ज्यांची झाली आहे त्यांस हे विचार, हे शब्द आणि ही कल्पना मुळींच मानवत नाहीं. तूं यापूर्वीं, मी पापमार्गाला लागण्यापूर्वीं, आणि माझ्या कृष्णकृत्याच्या आरंभापूर्वीं जर हे विचार जागृत करतीस तर किती चांगलें झालें असतें. माझा आत्मा पापमार्गाला लागलाच नसता; पण आतां काय? तारे! मी पश्चात्तापानें शुद्ध नाहींका होणार? ईश्वराजवळ—कशाला तुझ्या जवळ—माझ्या पापाचा उच्चार करून क्षमा मागितल्यास मी पवित्र नाहींका होणार? छेः प्रत्यक्ष कृतीबद्दल शाब्दिक पश्चात्तापानें काय होणार! त्यासाठीं प्रत्यक्ष शिक्षाच अनुभविली पाहिजे— तारे! तूं धन्य आहेस. तुझ्या भोंवतालचें सारें जग पापमय असतांना, प्रत्यक्ष ज्या मातापितरांनीं जन्म दिला ते दुष्कृत्याचे मूर्तिमंत पुतळे असतांना, तुझ्यांत ही कल्पना जागृत झाली कशी? तारे! तूं परमेश्वरी अंश आहेस, तुझ्या जन्मानें आह्मांस तूं उद्धारलेस.'

इतकावेळ तारा अगदीं स्तब्ध होती. मुराररावाच्या या बोलण्याचा तिला मुळींच रोख कळेना. मुरारराबाविषयीं जरी लोकमत वाईट होतें तरी रणधीररावांच्या वैराखेरीज इतर कांहीं त्यांचीं दुष्कृत्यें तिच्या कानांवर आलीं नव्हतीं त्यामुळें आपल्या बापास खात्रीनें वेड लागलें असावें असा तिचा समज झाला. ती घाबरली आणि रडूं लागली. मधेंच विश्रांती सांपडल्यामुळें मुरारराव जरा शांत झाले, आणि ह्मणाले—

"तारे! यांत रडण्यासारखें काय आहे? मला कांहीं वेड लागलें

नाहीं. फक्त विकाराच्या झटक्यांत कांहीं बोललों झालें. मीं आजपर्यंत ज्याप्रकारचें वर्तन केलें त्याचा आतां मला पूर्ण पश्चात्ताप झाला आहे. जगांत शक्य असेल तर चांगलें करावें नाहींतर स्वस्थ असावें; पण सर्वच तुझ्यासारखीं कुठें असतात ? आणि असें जर होतें तर मग जगांत जें विविधत्व आहे तें राहतें तरी कशानें ? आह्मां पाप्यांना उत्पन्न करण्यांतही ईश्वराचा कांहींतरी मतलब असेलच. आह्मीं ज्याचा विनाकारण छळ करितों, तो आमच्या छळांतूनही जर धैर्यानें आणि नीतीनें पार पडला तरच तो ईश्वराचा आवडता होत असला पाहिजे. आणि अशी जर गोष्ट असेल तर आह्मीं हें मोठेंच काम करतों ह्मणावयाचें ! आमच्या छळाशिवाय जर कोणाची सत्वपरीक्षा होत नाहीं, आणि सत्वपरिक्षेशिवाय जर परमेश्वरप्राप्ती नाहीं तर मग आह्मीं एक परमेश्वरप्राप्तीचें साधनच नाहीं काय ? ”

तारा मध्येंच ह्मणाली, ‘ बाबा ! या तुमच्या भाषणानें मी तर अगदीं गांगरून गेलें आहे. तुमच्या अशा उपरोधिक बोलण्यांत काय मतलब असावा हेंच कळत नाहीं ! रणधीररावाचें नांव मीं घेतलें ह्मणून जर आपणांस राग आला असेल तर मी आपली क्षमा मागत्यें. आणि यापुढें मी तें नांव उच्चारणार देखील नाहीं. गोसावणीच्या भाषणांत एकदोनदां तुमच्या आणि त्यांच्या परस्पर वैरासंबंधीं गोष्ट निघाली तेव्हां तिनें सांगितलें कीं, जाधव घराण्याचीं माणसें शत्रूचा सूड घेतल्याशिवाय रहात नाहींत. या सर्व कारणावरून आपलें आणि त्यांचें वैर कां असावें; गोसावीण सांगते त्याप्रमाणें जर ते खरोखरच सज्जन असतील तर त्यांच्याकडून कांहींच अन्याय्यवर्तन होणार नाहीं; आणि आपणांकडून तर तसें होण्याचा संभव नाहींच. अशा स्थितींत या वैराची मीमांसा कशी करावी याच विवंचनेंत मी होतें; इतक्यांत आपण आलांत.’

‘ तारे ! माझें भाषण उपरोधिक नाहीं; पण मनुष्य अल्लडपणीं अविचारानें एखादी गोष्ट करून जातो व ती पुढें पुढें जास्त असह्य होत जाते. विशेषत: आयुष्यांत असली एखादीच गोष्ट झाली असली तरी त्या गोष्टीचा त्याला नेहमींच ध्यास लागलेला असतो आणि हें काय आपण व्यर्थ केलें असें त्याला वाटूं लागतें. मीं जें म्हटलें तें अगदीं खऱ्या भावानें म्हटलें. मला असल्याच कांहीं कृतकृत्याचा पश्चात्ताप होत आहे; पण आतां काय त्याचें ! केल्यासारखें भोगलेंच पाहिजे ! ’

“ पण ! परमेश्वर निव्वळ एका दुष्टकृत्यामुळें इतर सर्व सत्कृत्यांकडे दुर्लक्ष करणार नाहीं. आणि विशेषत: जर स्वत:च्या दुष्टकृतीचा खरोखरीच पश्चात्ताप झाला असेल तर खात्रीनें आत्म्याच्या उन्नतीला एकादेंच दुष्कृत्य आडवें येत नाहीं; पण, बाबा ! रणधीररावांशीं तरी वैर कां ? ”

इतक्यांत देवळांतून बायजाबाईची हांक ऐकूं आली. त्यासरशी तारा आपल्या आईकडे जाण्यास निघाली; पण आपल्या मुलीस संशयांत ठेवणें मुराररावास इष्ट वाटेना. आपल्या पत्नीचा निव्वळ शब्द ऐकण्यानेंच कीं काय, पुन्हां त्यांच्या पूर्व विचारांचा त्यांच्या मनावर ताबा बसून, मुरारराव म्हणाले—

“ त्यांत कांहीं विशेष नाहीं. आमचा स्नेह नाहीं म्हणून लोक आमच्यांत वैर असल्याची बातमी उठवतात. उद्यां आपण त्या म्हातारीकडे जाऊं म्हणजे सर्व गोष्टींची संशयनिवृत्ती होईल. ”

तारा ‘ बरें आहे ’ असें म्हणून निघून गेली. मुराररराव मात्र एकटे तेथेंच उभे होते. जरी तारेस अशी थाप दिली तरी त्यांचें मन कांहीं केल्या स्वस्थ होईना. पुन्हां ते आपणाशींच बोलूं लागले, “ शुद्ध माणसाच्या शब्दांत कितितरी ओज असतें. आज तिच्या त्या मधुर गाण्यानें तर माझी अगदींच तारांबळ उडवली. मी

त्या योगानें आज अगदीं गुप्त गोष्ट देखील ओकून टाकणार होतों; पण वेळींच आंतील प्रेमळ शब्द ऐकूं आल्यामुळें या घोर चुकींतून बचावलों. माझ्या भाषणानें तारेचा मजविषयींचा ग्रह कदाचित् बदलेलही. मीं स्वतःस पापी ह्मटलें, दुष्कृत्यें करणारा ह्मटलें, सारें कांहीं ह्मटलें ! लोकही मला जाधवकुलविध्वंसक ह्मणतात, दुष्ट म्हणतात. सारें कांहीं म्हणतात; पण मीं त्यांचें असें केलें आहे तरी काय ? महाराजांनींच जर सनद खोटी ह्मणून ठरवली तर त्यांत माझा काय दोष ? ही गोष्ट मात्र खरी कीं, या कामीं खटपट करणारांस मीं सहाय्य केलें; पण त्यांतही कांहीं वावगें केलें नाहीं. ज्यांचें अन्न खाल्लें, ज्यांच्या जोरावर मी यःकश्चित् पाटलाचा सरदार मुरारराव झालों त्यांना मदत केली—त्यांची इच्छा पूर्ण केली. राजकारणांत अशा युक्त्यांची योजना नेहमींच लागते. श्रीकृष्णांनीं देखील प्रसंगीं अशा युक्त्यांचा अवलंब केला. धर्मानेंही स्वतः जळन जाण्याचा प्रसंग आला असतां निरपराधी दुसऱ्या भावांस आपल्या ऐवजीं जाळिलें. एकंदरींत राजनीतीसाठीं असलें कृत्य केल्यास तें विशेष अयोग्य नव्हे. शिवाय सृष्टींतील ज्या घडामोडी होतात त्या मानवी प्राण्याच्या इच्छेवरून थोड्याच होतात ? मानवी प्रयत्न हे निमित्तमात्र आहेत. या सर्वांच्या मुळाशीं परमेश्वर असतो आणि तो आपली इच्छा अशा मार्गानें घडवून आणतो. या गतगोष्टी झाल्या. सारें महाराष्ट्र ज्यांचें नांव घेत आहे; आणि श्रीसमर्थासारखे ज्यांना उपदेशक आणि मार्गदर्शक गुरु होते, त्या थोरल्या महाराजांनीं तरी काय केलें ! आपल्या कचाट्यांत शत्रु सांपडला असतां भागुबाई-सारखे न्याय ! न्याय ! नीती करीत त्यांनीं अफझुलखानास सोडलें नाहीं. एकंदरींत राष्ट्रकार्यासाठीं थोरल्या महाराजांनीं ज्या मार्गाचा अवलंब केला होता, तोच मार्ग मुराररावानें जहागीरदार होण्यासाठीं केला त्यांत वावगें कोणतें ! तारेच्या त्या गाण्यानें माझ्या मनांत बराच वेळ

कल्लोळ उडविला होता. मी स्वकार्यापासून पराङ्मुख होण्याच्या बेतांत आलों होतों; पण परमेश्वराचीच इच्छा म्हणून तिचा शब्द ऐकूं आला आणि पूर्व विचारांचा पगडा पुन्हां बसला. हें कृत्य न्यायाचें आहे कीं अन्यायाचें आहे याचा विचार आधीं पाहिजे होता. आतां त्याचा काय उपयोग ? आह्मी करूं तोच न्याय, व तींच नीति आणि सांगूं तेंच शास्त्र. ” असें ह्मणून मुराररावही घरीं जाण्यास निघाले.

वरील हकिकतीवरून आपणांस मुराररावाच्या वृत्तीची अटकळ करतां येईल. ते निसर्गतः दुष्ट नव्हते. गरीब पण कुलिन अशा घराण्यांत जन्म झाल्यामुळें त्यांच्या मनावर बरेच सुसंस्कार झाले होते. परंतु, लहानपणींच आईबाप वारल्यामुळें त्यांस इतिहासप्रसिद्ध केसकर सरदारांचा आश्रय घ्यावा लागला. पुढें त्यांच्या तालमींत तयार होऊन ते राजकारणपटु झाले. थोरल्या महाराजांच्या कारकीर्दीत यांचा शहाणपणा पुढें आला नाहीं; पण संभाजीमहाराज गादीवर बसतांच जी क्रांति झाली त्याबरोबरच संभाजीमहाराजांचे सर्व सहाय्यकर्तेंही उच्चपदस्थ झाले. कलुशा प्रधानजी झाले आणि तत्पक्षीय लोक मोठमोठ्या मानाप्रत पावले. केसकर मुख्य सरदार झाले. त्यांचे जांवई मुराररराव दुय्यम सरदार झाले. हे लोक विशेषतः आपल्या अंगच्या गुणानें महाराजांस ज्यास्त आवडते झाले होते. कधीं शहाणपणा तर कधीं मूर्खपणा, केव्हां शौर्य तर कधीं फोलकटपणा, कधीं सत्यनिष्ठ तर कधीं दुष्ट, अशा अनेकविध गुणांची बतावणी प्रसंगानुरूप करतां आल्यासच त्याकाळीं महाराजांची मर्जी संपादन करतां येत होती. आणि याच गुणाच्या अभावी थोरल्या महाराजांचे आवडते शूर सरदारही या नव्या अमदानींत मानमान्यताशून्य झाले होते.

दुर्गुणामुळें अथवा गुणांच्या अभावीं थोरल्या महाराजांजवळ ज्यांची डाळ शिजली नाहीं असे कांहीं लहानमोठे सरदार पूर्वींपासून संभा-

जीस आपल्या कह्यांत आणण्याच्या प्रयत्नास लागले होते. प्राय: कलुशा. पिलाजीराव केसकर, आणि मुरारराव हे त्याचे पूर्ण विश्वासाचे होऊन बसले होते. तिघेही राजकारणपटु असल्यामुळें हा विश्वास कायम टिकण्यास मुळींच अडचण पडली नाहीं आणि गादीवर बसतांच पूर्वसंकेताप्रमाणें सर्व गोष्टी घडून आल्या. कलुशा आणि पिलाजीराव महाराजांजवळ आणि मुरारराव मोठ्या सैन्यासह सिंधफळास जाऊन राहिले.

सिंधफळचे पहिले जहागीरदार एसाजीराव जाधव यांस शिवाजीमहाराजांनीं स्वत:चे दूरचे नातलग आणि विशेषत: राज्यस्थापनेंत सहाय्यकर्ते ह्मणून जहागीर दिली; पण ती अनुभवण्यास ते फार दिवस जगले नाहींत. पुढें त्यांचे चिरंजीव संताजीराव जाधव हे त्या जहागिरीचे मालक झाले. परंतु, त्यांस देखील त्याचा उपभोग शेवटपर्यंत घेतां आला नाहीं. पिलाजीराव केसकर—तेथील पाटील—यांनीं जहागीरदारास आपली मुलगी करून घेण्यास गळ घातली; पण त्यांस पाटलाची-पिलाजीरावाची—मुलगी करून घेणें प्रशस्त वाटलें नाहीं. त्यांचें नाकारणें पिलाजीरावास अपमानास्पद वाटलें. या अपमानाचा सूड घेण्यासाठीं त्यानें अनेक युक्त्या सुरू केल्या. ही गोष्ट थोरल्या महाराजांस कळतांच त्यांनीं त्यांची पाटिलकी जप्त करून त्यांना तेथून हाकलून लावले. यामुळें तर पिलाजीराव जास्तच विकारवश झाले आणि या कृत्याचा सूड घेतल्याशिवाय रहावयाचें नाहीं असा त्यांनीं निश्चय केला. पुढें ते कलुशापक्षास जाऊन मिळाले व अशारीतीनें संभाजीमहाराजांजवळ त्यांनीं आपला जम बसवला. आपल्या जावयास मोठ्या सैन्यासह सिंधफळाजवळ ठेविलें. आणि थोड्याच अवकाशांत संताजीरावांची सनद खोटी ठरवून ती जहागीर मुराररावास देववली; आणि संताजीराव संभाजीमहाराजांविरुद्ध

राजारामाच्या पक्षास मिळाले आहेत अशी खोटी बातमी देऊन त्यांची तेथील देशमुखीही जप्त करवली. अशाप्रकारें संताजीराव जाधव–सिंधफळचे देशमुख, शिवाजीमहाराजांचे आवडते सरदार आणि नातलग–आज अगदीं विपन्न स्थितींत पडले. सर्व सरंजाम गेला. शेंवटीं कुटुंबांतील माणसांस पोसणें देखील त्यांना जड वाटूं लागलें. आजपर्यंतचा काल मोठ्या सन्मानाचा व मानमरातबाचा गेला असल्यामुळें त्यांना कोणाची मदत मागणें गोड वाटेना. मोंगलांची नोकरी करायची नाहीं असा निश्चय आणि संभाजीच्या राज्यांत कोठेंही थारा मिळण्याची निराशा. या सर्व कारणांमुळें या विपत्तीपेक्षां मरण बरें, असें संताजीरावांस वाटूं लागलें.

एकदां विपत्ती सुरू झाली ह्मणजे ती कोणतीच गोष्ट कमी पडूं देत नाहीं. थोडक्याच दिवसांत त्यांची पत्नीही वारली. आपल्या मुलासह ते मोठ्या कष्टानें निर्वाह करूं लागले. अशा कष्टप्रद स्थितींत देखील आपल्या श्वशुरगृहीं जायचें अथवा मुलास पाठवावयाचें हें त्यांच्या मानीस्वभावास रुचेना. शत्रूचा असा डाव साधलेला पाहून त्याचा सूड घेण्याचा मार्गही सुचेना. अशा सर्व तऱ्हेनें ते अगदीं पूर्ण ग्रस्त झाले.

या अन्यायाविरुद्ध त्यांनीं अनेक तऱ्हेनें दाद मागितली. संभाजीमहाराजांकडे गेले, कलुशा अमात्याकडे गेले. कोठेंही गेले तरी मुराररावाविरुद्ध तक्रार म्हणून भेट देखील होत नसे. अशा सर्व तऱ्हांनीं त्यांचा अगदीं निरुपाय झाला. ज्या ठिकाणीं आपण आणि आपल्या वडिलांनीं सत्ता गाजविली त्याच ठिकाणीं आपणांस हा धडधडीत अपमान सहन करावा लागतो याचें त्यास अतिशय दुःख होई. व त्या योगानें ते नेहमींच आजारी असत. निर्वाहास साधन नाहीं, मिळविण्याची ताकत नाहीं, मदत

घेण्याची इच्छा नाहीं, अशा स्थितींत आपलें शेंवटचें धन–मालकीचा वाडा–विकून निर्वाहाची तात्पुरती सोय त्यांनीं केली; पण ती टिकाऊ नव्हे, लवकरच त्यांस पुन्हा निर्वाहाची अडचण पडूं लागली. तीन तीन, चारचार दिवस उपवास काढावे लागत आणि अशा स्थितींतच त्यांचा अंत झाला.

या विपत्तीच्या आरंभीं रणधीरराव लहान नव्हता. पूर्वींच्या सुखाची आणि वैभवाची स्मृति आणि त्यानंतर एका मागून एक अननुभूत होणारीं संकटें हीं सर्व त्यास पूर्णपणें आठवत होतीं. नुकताच तारुण्याचा आरंभ तोंच पितृनिधनानें त्याची कंबर खचून गेली. विपत्तीमुळें त्यास शिक्षणही बेताचेंच मिळालें होतें. तो जातीनें जरी हुशार होता तरी अनुभव, शिक्षण आणि शासन यांच्या अभावीं त्याच्या मनावर नेहमीं विकारांचेंच साम्राज्य माजलेलें असे. ही विपत्ती त्यास असह्य झाली होती; पण या विपत्तीला मूळ कारणीभूत कोण हें त्यास कळेना ! आणि स्वतःच्या उमेदीवर नांव करीन म्हटलें तर कोणीच मदत करीना. शाब्दिक सहानुभूती मात्र मिळे. त्यानें त्याच्या मनाची शांती होईना. आपला शत्रू मुरारराव आहे याचा सूड घेतलाच पाहिजे असे त्यास वाटूं लागले. आणि यास उत्तेजक असें एक कारणही झालें.

संताजीरावास मृत्यूसमयीं आपल्या मृतदेहास पूर्वजांच्या चाली-प्रमाणें पुरून न घेतां दहन करून घेणें बरें वाटलें. वैभवांत ज्यांचा अंत झाला अशा पूर्वजांच्या बरोबरींत राहणें त्यांस बरें न वाटून त्यांनीं असें मुद्दाम सांगून ठेविलें होतें. रणधीररावांनीं आणि इतर मंडळींनीं त्यांच्या इच्छेप्रमाणें करण्याची व्यवस्था सुरू केली; पण जहागीरदारास आणि जहागीरदारीणबाईस हें करूं देणें प्रशस्त वाटेना. विशेषतः जाधवघराण्याविषयीं तेथील लोकांची पूज्यबुद्धि

आणि सहानुभूति हीं त्यांस रुचेनात. त्यांनीं आपल्या शिपायांकडून त्यांना या कामीं बंदी केली.

रणधीररावास आणि इतर मंडळीसही प्राण खर्ची पडला तरी हरकत नाहीं; पण संताजीरावांची शेवटची इच्छा तृप्त झालीच पाहिजे असें वाटूं लागलें. दोन्ही पक्षांत तंटा सुरू झाला. कांहीं लोक घायाळही झाले; पण संताजीरावाची इच्छा मात्र शेवटास गेली.

झाले ! जहागीरदारीणबाईस आकाश पाताळ एक करण्यास योग्य कारण झालें. आमच्या जहागिरींतले लोक जाधवांस मदत करण्यास तयार असल्याचें पाहून तर तिचा संताप द्विगुणित झाला. तिनें दरबारांत या तंट्याला बंडाचें स्वरूप देऊन जाधवांच्या राहिलेल्या शेवटच्या घासाची आहुती घ्यावी असा विचार केला. मुराररावास हें कृत्य पहिल्यानेंच नको हातें. त्यांनीं या कामीं संमती दिली नाहींही; पण त्यांचें ऐकतो कोण ? जहागीरदारीणबाईच्या इच्छेआड कोण जाऊं शकतो ?

आपल्या मसलती यशस्वी होऊन, स्वतःचा आणि केसकर घराण्याचा धिःकार करणाऱ्या जाधवांचा नाश होण्याचीं चिन्हें दिसतांच बायजाबाईस बरेंच समाधान वाटलें. त्यांतल्यात्यांत आपण जहागीरदारीण बनल्यावर आपली प्रौढी ऐकण्यास आणि टोमणे सहन करण्यास संताजीराव आणि त्यांची पत्नी हे दोघेही कांहीं काल जिवंत होते या कारणामुळें तिला बरेंच समाधान वाटलें होतें. लहानपणीं आईबापांचा लाड, तरुणपणीं मिंध्या आणि पोशा नवऱ्याचें प्रेम, आणि त्या दोन्हीं काळांत स्वतःची इच्छा हरप्रयत्नानें तडीस नेण्याची संवय, कोणाचा विरुद्ध शब्द अगर मत सहन न करण्याची जहालवृत्ति या सर्व कारणांस सध्यां प्राप्त झालेलें वैभव यामुळें तर ती अगदीं तुफान झाली होती. दरबारांत आपला बाप आपल्या मर्जीविरुद्ध जाणार नाहीं ही पूर्ण खात्री, यामुळें तर तिच्या नजरेंत कोणीच भरत नव्हते. मग

बिचारा मुरारराव–तिच्या अन्नावर पोसलेला; तिच्या प्रेमावर जहागीरदार बनलेला, पाटील मुरारराव– काय करणार ! तिनें आपल्या इच्छेप्रमाणें सर्व व्यवस्था केली. मुराररावांनीं फक्त तीं पत्रें पाहून संमती दिली.

------

# प्रकरण २ रें.

## आंधळी गोसावीण.

मुरारराव आणि बायजाबाई यांना आपल्या राजकारणांतून फुरसत मिळत नसल्यानें, मुलीवर त्यांची विशेष देखरेख नसे. त्यामुळें तारेस कोठेंही स्वतंत्रपणें फिरतां येत होतें; पण तिनें या स्वातंत्र्याचा कधींच दुरुपयोग केला नाहीं. सृष्टिसौंदर्याची नैसर्गिक प्रीति हृदयांत असल्यामुळें तिचा संध्याकाळचा वेळ बहुतेक मुरलीधराच्या देवळा भोंवतालच्या वनांत आणि डोंगरांत जात असे. त्यामुळें त्या भागांत राहणाऱ्या आंधळ्या गोसावणीची आणि तारेची बरीच गट्टी जमली होती गोसावीण वयानें अगदीं म्हातारी होती. शिवाजीमहाराजांच्या कारकिर्दीची तिला खडानूखडा माहिती. शिवाजीमहाराजांनीं आणि त्यांच्या अनुयायांनीं राज्य स्थापनेसाठीं जे प्रयत्न केले, जीं युद्धें केलीं त्या सर्वांची हकीकत ती फारच मनोरंजक रीतीनें सांगत असे. असल्या गोष्टींची निसर्गतः अभिरुचि असलेल्या तारेस गोसावणीला भेटल्याखेरीज आणि तिच्या तोंडून ते हृदयंगम प्रसंग ऐकिल्याखेरीज मुळींच चैन पडत नसे. याकारणानें तो रस्ता तिच्या पूर्ण परिचयाचा झाला होता.

पूर्वीं कबूल केल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं मुराररावास तारेबरोबर त्या

गोसावणीकडे जाणें भाग पडलें. मनांतून मुळींच नव्हतें. टाळण्यास कांहीं कारण सांपडतें तर त्यांनीं तसें केलें असतेंही; पण कांहींच कारण सांपडेना. शेंवटी संध्याकाळीं ते निघाले. ते लवकरच गोसावणीच्या झोपडीवर जाऊन पोंचले. समोरच ओटीवर ती म्हातारी वाऱ्यास येऊन बसली होती. ती शरीरानें बरीच उंच होती. आणि वयाची ८०.८५ वर्षें झालीं होतीं तरी शरीरास वार्धक्यामुळें कोठेंच बांक आला नव्हता. तिनें एक पांढरें पातळ नेसलें होतें. तिनें कपाळास भस्म लावलें होतें. डाव्या हातांत एक जुनी जपमाळ घेऊन कधीं कधीं 'रामराम' हे शब्द उच्चारतानांही ती दृष्टीस पडे. तिचा चेहरा भव्य होता, त्यामुळें पाहणारावर तिची छाप बसल्या खेरीज रहात नसे. कपाळ रुंद असून त्यावर बऱ्याच आंठ्या पडल्या होत्या. वार्धक्यामुळें जरी तोंडावर सुरकुत्या पडल्या होत्या तरी तिच्या तेजःपुंज चेहऱ्यावरून तारुण्यांत ती सुंदर स्त्रियांत गणली जात असावी असें वाटे; इतकेंच नव्हे तर ती एखाद्या श्रीमंत घराण्यांतली असून कालचक्राच्या फेऱ्यामुळें तिला दारिद्र्य प्राप्त झालें असावें असेंही वाटे. व या गोष्टी खऱ्या होत्याही. परमेश्वरानें जरी तिची दृष्टी हिरावून नेली होती तरी तिच्या चेहऱ्यावर गांभिर्य, बुद्धिमत्ता व चातुर्य या गोष्टींचें दर्शक अशा चिन्हांमध्यें कोणत्याही प्रकारचें व्यंग आलें नव्हतें.

तारा झोपडीसमोरील बागेचे फाटक सारून आंत गेली आणि गोसाविणीस म्हणाली, 'बाई, बाबा तुमच्या भेटीस आले आहेत.'

'ताराबाई ! मुरारराव खरंच कां आले आहेत ? महाराज ! या दरिद्री झोपडींत आपणासारख्यांच स्वागत करण्यास काय सांपडणार आहे ? बरें स्वागत करणारें मनुष्य देखील धड नाहीं. आपल्या थोर आगमनानें माझी झोपडी धन्य झाली. अशा प्रसंगीं मी

कोणत्या शब्दानें स्वागत करूं हें देखील कळेनासें झालें आहे; पण महाराजांची काय आज्ञा आहे.'

'बाई, इतका संकोच कांहीं करावयाला नको. सहज फिरत फिरत इकडे आलों झालें. मला स्वागतांच्या दिखाऊ तयारीपेक्षां तुमचें प्रेमपूर्वक स्वागत जास्त प्रिय वाटत आहे.'

'हा महाराजांचा मोठेपणा आहे.'

मुरारराव बराच वेळ स्तब्ध बसले. त्यांच्या मनांतून बरेंच बोलायचें होतें; पण विषयच सांपडेना. शेवटीं त्यांनीं ती झोपडी एकदां चौफेर नजरेनें पाहिली. बाईच्या स्वच्छतेमुळें ती जरी आंतून नीटनेटकी आणि व्यवस्थित दिसत होती तरी ती अगदींच मोडकळीस आली होती, आणि केव्हां पडेल याचा नेम नव्हता. अशी स्थिती पाहून ते ह्मणाले—

'तुमच्या झोपडीची, समोरच्या आंगणाची, आणि बगीचाची व्यवस्था व नीटनेटकेपणा वाखाणणीय आहे. परंतु, झोपडीची थोडीशी तरी दुरुस्ती झाल्याखेरीज ही बरी दिसणार नाहीं.'

'मग तिच्या दुरुस्तीची व्यवथा करीत कां नाहीं उद्यापासून.' तारा मध्येंच ह्मणाली.

'महाराज ! ती माझ्या आयुष्याची सोबतीण आहे. माझा नाश आणि तिचा नाश एकदांच व्हावयाचा आहे. मग तिची दुरुस्ती करून टिकाऊपणा आणायचा तरी कुणासाठीं ? तिची मालकीण नष्ट झाल्यावर ती दुसऱ्याच्या सत्तेखालीं गेल्यापेक्षां मजबरोबरच तिचाही अंत झाला तर त्यांत काय वावगें होणार आहे ? आपण या कामीं उगीच तसदी घेऊं नये अशी माझी नम्र विनंती आहे.'

आयुष्याचा कार्यभाग सौख्यांत, आनंदांत आणि श्रीमंतींत घालवून, उत्तरभागांत जर अशीं संकटें अनुभवावीं लागलीं तर कसें बरें वाटेल ?

ईश्वरी इच्छेस इलाज नाहीं ही गोष्ट खरी; पण ज्या गोष्टी मानवी प्रयत्नानें सुधरूं शकतात त्यांचा कां बरें उपाय करूं नये ? ' तारा ह्मणाली.

ह्मातारी गंभीरपणानें ह्मणाली, ' गोष्ट खरी आहे. जेव्हां दुःखाची मर्यादा आटोक्यांत असते तेव्हां असले प्रयत्न फलदायी असतात. माझ्या स्थितीला अशा प्रयत्नांचा उपाय उपयोगीं नाहीं. माझ्या सद्यःस्थितीला या झोपडीनेंच विशेष शोभा आली आहे असें मला वाटतें. कारण, परमेश्वरानें आपणांसाठीं ज्या स्थितीची योजना केली आहे तींत समाधानानें आयुष्याचे दिवस घालवावेत हा विशेष शहाणपणाचा मार्ग आहे. कारण, आजपर्यंतचा, माझा स्वतःचा संकटासंबंधींचा अनुभव, आणि इतरांच्या संकटांचा अनुभव या मानानें पाहतां माझी सध्याची स्थिति फार समाधानकारक आहे. आणि संपत्तींतून विपत्तींत परिवर्तन होण्याच्या कालींच परमेश्वरानें अशी एक संकटांची मालिका योजिली होती कीं, त्यायोगें सध्याचे दुसऱ्यास दिसणारे हाल आणि अपेष्टा यांचें तीक्ष्णपण कमी होऊन तेच मला सुखकारक भासूं लागले आहे. '

या भाषणानें मुराररावांच्या मनांत अनेक विचार उद्भवले असतील असें त्यांच्या चेहऱ्यावरून दिसून येत होतें; पण आपली ही स्थिति तारेच्या लक्षांत येऊं नये ह्मणून त्यांनीं भाषणास सुरुवात केली—

' ज्या अर्थीं तुह्मी आयुष्यांत अनेक स्थितीच्या क्रांत्या पाहिल्या आहेत त्या अर्थीं तुमची सध्याची स्थिति पालटून तुह्मांला पुन्हां सुस्थिति प्राप्त होण्याचा ईश्वरी संकेत असावा असें तुह्मांस वाटतही असेल?

' छेः महाराज ! मला असला वेडगळ अनुभव कांहीं आला नाहीं. कारण न्यायानें वागणाऱ्याची ऊर्जितावस्था परमेश्वरानें या जगांत कांहीं आणून दाखवली नाहीं. कदाचित् सन्मार्गाचें बक्षिस चोरून स्वर्गांत किंवा दुसऱ्या जन्मीं देत असेल. माझ्या अनुभवानें मला

इतकेंच शिकवलें आहे कीं, न्यायानें वागायचें झटलें तर हाल अपेष्टा खेरीज चालणार नाहीं. व तोच मार्ग जर स्वीकारायचा असला तर त्या मुकाट्यानें सोसल्या खेरीज दुसरा उपाय नाहीं. ही परमेश्वरी रचनाच आहे. त्याला काय उपाय ? मुराररावास तिचा खोंच कळला. तेही गप बसले. पण झातारी पुन्हा बोलूं लागली—

'काळचक्राचा फेरा त्याची गती आणि ईश्वरी संकेत हे मानवीबुद्धीस अगम्य आहेत ! समोरचीं झाडें जीं आपल्या गर्द छायेनें श्रांत प्रवाशांस सुख देत आहेत, असंख्य फांद्यांनीं आणि खोल गेलेल्या मुळयांनीं ज्यांनीं बराच मोठा भूमिभाग व्यापून टाकला आहे व हें जगड्व्याळ स्वरूप पाहून ज्यांचें अस्तित्व चिरकाल टिकेल असें भासतें, तींच झाडें ईश्वरी संकेतानें एका झंझावातानें, निमिषमात्रांत नष्ट पावलेलीं, जमीनीवर मृत पडलेलीं, अभिमानशून्य झालेलीं दृष्टीस पडतील. हा न्याय या सृष्टींतील चराचर वस्तूंस लागूं आहे. चंद्रास देखील १५ दिवस बंदिवासाचे आहेत. सूर्यनारायणास देखील ग्रहण आहे. तसेंच मोठमोठालीं राज्यें, थोर घराणीं यांच्यासंबंधींही असेंच. तीं जितक्या वेळांत वर येतात तितक्याच वेळांत खालीं जातात. त्यांचें अस्तित्व क्षणांत नाहींसें होतें. रावणाची संपत्ती कोठें आहे, रामाचें राज्य कोठें आहे, श्रीकृष्ण परमात्मा ज्यांचा साह्यकर्ता त्या पांडवांचें राज्य कोठें आहे ? तीं सर्व लयास गेलीं; पण त्यांस लागलेला काळ मात्र भिन्न होता. रावणाचें राज्य त्यानें स्थापिलें, त्यानेंच भोगिलें व त्यानेंच घालविलें रामाचें राज्य पूर्वजांनीं स्थापिलें, अनेक पिढ्यांनीं भोगिलें, आणि शेवटीं लयास गेलें. उत्पत्ति, स्थिती आणि लय हीं कोणासही चुकलीं नाहींत. परंतु, त्यांत थोडासा फरक आहे. राज्याची, कुटुंबाची, अगर व्यक्तीची, कोणाचीही असो, ज्या नीतीवर त्यांची स्थापना झाली आहे, तिच्या बळावर अस्तित्वाचा काळ अवलंबून

रहातो. पूर्ण नीतीच्या पायावर उभारलेला पदार्थ ज्यास्त वेळ दम धरतो. अनीतीच्या पायावर उभारलेला पदार्थ उर्जितावस्थेस पोंचतांच अधोगतीच्या मार्गाला लागून लवकरच नाश पावतो. आणि मिश्र पायांवर रचलेला पाया त्याच प्रमाणांत टिकतो. एकूण संपत्ति प्राप्त झाली असली ह्मणजे ती न्यायानें मिळवलेली असते आणि दारिद्र्य हें अनीतीचें दर्शक असतें अशांतला भाग नाहीं. स्थाइकपणाचा प्रश्न पायाच्या नैतिक मजबुतीचा आहे. याचा विचार ज्याचा त्यानें करावा आणि त्या मानानें स्वतःच्या भावी सुखदुःखाची आशा करावी असें माझें ठाम मत झालें आहे. याचें प्रत्यक्ष उदाहरण आपणांजवळ आहेच. जाधव घराण्याचा मोठेपणा, त्यांचा देशाभिमान, त्यांचे सद्गुण, त्यांचें नैतिक वर्तन, या सर्व गोष्टी महशूर आहेत; पण त्याच घराण्याच्या सध्याच्या आपत्तीकडे लक्ष दिलें ह्मणजे असें आढळून येईल कीं, हा फेरा नीतीं, अनीतीचा नाहीं. काळ परमहंस स्वरूपाचा असल्यापुळें त्यांत असा भेदभाव नाहीं. आपल्या तावडींत सांपडेल त्याचे दिवस पालटायचा हा त्याचा क्रम आहे. त्याला मनुष्याचा काय इलाज आहे ! फक्त या आपत्तीचा तीक्ष्णपणा कमी करण्यासाठीं समाधान आणि नीति यांचा मात्र अवश्य अवलंब केला पाहिजे.'

गोसावणीच्या अस्खलित आणि आवेशयुक्त भाषणानें मुरारराव अगदीं गांगरून गेले. ह्मातारी आंधळी असली तरी दिव्य दृष्टीच्या योगानें आपलें पापमय मन जाणूं शकली असें वाटून मुरारराव अगदीं लज्जित झाले. तिचा प्रत्येक शब्द त्यांस मर्मीं लागला. आणि विशेषतः कालचक्राच्या फेऱ्याचा प्रश्न सांगोपांग विवेचित झाल्यामुळें त्यांची त्यांसच लाज वाटूं लागली. विवेक जागृत होऊन नाचूं लागला. मोठे-पणाचा ताठा तात्पुरता नाहींसा झाला. अंगाला दरदरून घाम आला. आवेशानें आरक्त झालेला ह्मातारीचा चेहरा पाहण्याचें धैर्य होईना

ह्मणून ते अधोवदन बसले. ह्मातारीसही बराच थकवा आला होता. या सर्व भाषणाचा ओघ तारेसही कळेनासा झाला ह्मणून ती भ्रांत-चित्त एकीकडे बसली. आपण यांना व्यर्थ भेटावयास आणलें असें वाटून तीही स्थिर झाली. अशा प्रकारें थोडावेळ बरेंच सामसूम झालें.

शेवटीं मुराराव ह्मणाले ' बाई, जाधवरावराण्याविषयींचा तुमचा आदर आणि कृतज्ञताबुद्धी ही पाहून मला फार आनंद होतो. तोच क्रम नव्या जहागीरदाराविषयीं कायम रहावा अशी माझी इच्छा आहे.'

' मुराराव, आह्मीं ह्मातारीं माणसें स्नेह वगैरे करण्याच्या कामाची नव्हत. पापी जगांत व पापाचरणांत सर्व आयुष्य गेलें असल्यामुळें आमचे शेंवटले दिवस पश्चात्तापानलांतच दग्ध होण्यास योग्य असतात. स्नेह दृढ करण्यासाठीं आपण ही झोंपडी दुरुस्त करण्याचा विचार करीत आहां त्याबद्दल मी आपली ऋणी आहें व नेहमीं कृतज्ञ राहीन. परंतु, सध्याच्या माझ्या अवश्यकतेच्या आणि सुखाच्या दृष्टीनें पाहतां मृत्यूखेरीज इतर कशांतही ज्यास्त सुख मला दिसत नाहीं. यासाठीं तो विचार सोडून द्यावा अशी माझी विनंती आहे. '

' माझ्या देणगीचा तुह्मी स्वीकार करीत नाहीं याचें मला वाईट वाटतें. '

' वाईट वाटून घेण्याचें कांहीं कारण नाहीं. अवश्यकता वाटली असती तर मीं खात्रीनें आपली देणगी घेतली असती. देणगी घेतली नाहीं म्हणून आपणांविषयींची माझी आदरबुद्धी थोडीच कमी होणार आहे ? जाधवांचे हित जितकें मला प्रिय आहे तितकेंच तुमचें आहे. दोन्हींही घराणीं न्यायानें राहून एकमेक सलोख्यानें वागावीत अशी माझी मनापासून इच्छा आहे. परंतु एकंदर परिस्थितीचा विचार करतां ईश्वरास हा सलोखा संमत दिसत नाहीं. कारण, तसें असतें तर तुह्मी इतके विवेकभ्रष्ट होताना. संताजीरावांच्या दहनाविषयीं झालेला प्रकार कोणासही रुचणार नाहीं. जिवंतपणीं बरोबरच्या

नात्यानें वैर साधण्यांत खरा पुरुषार्थ आहे. मृत देह पुरला काय व जाळला काय त्यांत तुह्मांस काय निष्पन्न झालें असतें ? मनाचा कोतेपणा किंबहुना नीचपणा तुह्मी त्या दिवशीं पूर्णपणें व्यक्त केलात. हा वैर साधण्याचा मर्दानी प्रकार नव्हे असें मला वाटतें. मागें संताजीराव केसकरांनींही हाच क्रम सुरू केला होता; पण या कामीं स्वतःचा बळी पडण्या पलीकडे त्यांस कांहीं साधलें नाहीं. जाधवांची योग्यता फार मोठी आहे. दारिद्र्य असलें ह्मणून मानाचा लोप होत नाहीं. अनीतीनें मात्र योग्यतेचा लोप होतो. ह्मणून तुह्मी जरा विचारास थारा द्या. वैराच्या धुंदींत बापाच्या बचास डरचूं नका. तुह्मी सलोख्यानें आणि शहाणपणानें घ्या ह्मणजे रणधीरराव दारिद्र्यांत राहील; पण तुमच्या उपकाराची फेड अपकारानें करणार नाहीं ? '

मुरारावास या फाजील स्पष्टवक्तेपणाचा संताप आला; पण प्रत्येक गोष्ट खरी असल्यामुळें त्यांना आपला क्रोध दाखवतां येईना. विशेषतः आपल्या मुलीसमोर झालेली ही शोभा पाहून तर त्यांचा राग अनावर झाला; पण त्याबरोबर आपल्या पातकांचीही त्यांस एकदम स्मृति झाली. क्रोध पार मावळून त्याची जागा पश्चात्तापानें पटकावली. संताजीचा शेवट नजरेसमोर येऊं लागला. जाधवांचा थोरपणा मनास पटूं लागला. रणधीररावाची शूर मुद्रा त्यास दिसूं लागली. अशाप्रकारें अनेक कारणांनीं त्यांची मुद्रा बावरी झाली. शेवटीं व्यथित अंतःकरणानें ते घरीं जाण्यास निघाले.

गोसावणीच्या प्रत्येक शब्दानें होत असलेला मुराररावांच्या चेहऱ्यावरील फरक तारेच्या पूर्ण लक्षांत आला. अद्दले दिवशींच्या बापाच्या पूर्वींच्या भाषणाचा ओघ तिच्या लक्षांत आला. जाधवांच्या वैराचें कारणही कळलें. सलोख्यानें वागल्यास रणधीरराव सर्व वैर विसरून जाईल या गोसावणीच्या आश्वासनाची तिला वारं-

वार आठवण होई. आपल्या प्रिय बापाच्या बचावासाठीं हरप्रयत्नानें जाधवघराण्यांशीं स्नेह करायचा तिनें निश्चय केला; पण या सर्व प्रकाराची तिला भीती वाटून ती चिंतामग्न झाली आणि तिच्या तोंडावर काळजी स्पष्ट दिसूं लागली !

------

# प्रकरण ३ रें.

## सूड कीं रक्षण.

परत येत असतांना वाटेंत मुरारराव ह्मातारीच्या प्रत्येक शब्दावर विचार करीत होते. ते जों जों ज्यास्त विचार करीत तों तों त्यांच्या मनांतील भीति वृद्धिंगत होत होती. आपण संपत्तीसाठीं अन्याय्यवर्तनानें विनाकारण इहपर घालवलें असें त्यांस वाटूं लागलें. आपल्या बापाच्या सुरक्षितपणाबद्दल काळजी वाटून, त्याच्या कृत्याबद्दल आणि त्याच्या परिणामाबद्दल ताराही चिंतातुर झाली. आणि त्यामुळें तिचा चेहरा निस्तेज झाला व भयाची छटा तोंडावर दिसूं लागली. तें पाहून मुरारराव ह्मणाले—

‘ तारे, तुला भ्यायला झालें तरी काय ? ’

‘ संध्याकाळ झाल्यामुळें अशा दाट झाडींतून जातांना भीति वाटते आहे. ’ तारा ह्मणाली.

मुराररावांस तिचें हें ह्मणणें खरें वाटलें आणि त्यांनीं तिला बरेंच धैर्य दिलें. जी तारा नेहमीं या वाटेनें एकटी जायची तीच कां भ्याली ? भीतीचें कारण दुसरेंच होतें. आजपर्यंत आपल्या बापाच्या वर्तनाबद्दल तिला मुळींच शंका नसल्यामुळें आपला कोणी वैरी

असेल असें तिला वाटत नव्हतें; पण त्याच्या वर्तनाचें खरें स्वरूप कळल्या-पासन थोडीशी चाहूल ऐकिली कीं, भीति वाटत असे. आपल्या बापाचा वैरी येथें पाळतीवर बसला असेल असें वाटे. आणि त्यामुळें ती दाट अंधारमय झाडी तिला ज्यास्त भेसुर वाटूं लागली आणि उरांत धडकी भरली. मुरारराबाच्या शब्दानें धैर्य आलें होतें पण तें फार वेळ टिकलें नाहीं. पुन्हा भीतीचें साम्राज्य माजलें.

विचारमग्न होऊन झाडींतून हळूहळूं जात असतां पलीकडल्या बाजूस आरडाओरड आणि गर्दी एकूं आली. मागें वळून पाहतात तों एक क्रूर रानडुक्कर आपला पाठलाग करित आहे असें त्यांना दिसलें. मुराररावांजवळ त्यावेळीं हत्यार वगैरे कांहीं नसल्यामुळें पळण्याखेरीज इतर कोणताच मार्ग त्यास सोईचा वाटेना; पण त्या प्राण्यास त्यानें अधिकच आवेश आला. त्यानें त्यांची पाठ मुळींच सोडली नाहीं. तारा पळतां पळतां थकली आणि जमीनीवर बेशुद्ध होऊन पडली. मुरारराबास तर कांहींच सुचेनासें झालें. डुक्कर अगदीं जवळ येऊन ठेपला. आज आपलें आणि आपल्या मुलीचें मरण या डुकराकडनच आहे अशी त्यांची पूर्ण खात्री झाली. बचावाची मुळींच आशा दिसेना. आणि नुकताच कालचक्राचा वार ऐकिला असल्यामुळें तर त्यांच्या डोळ्यापुढें मूर्तिमंत मृत्यू दिसूं लागला. गर्भगळित होऊन निर्वाणीचा प्रसंग म्हणून ते तारेच्या आणि डुकराच्या मध्यें उभे राहिले. डुक्करही मोठ्या आवेशानें चाल करून येत होता. तो जवळ येऊन ठेपलाही आणि तो झडप घालणार इतक्यांत झाडींतून पुढें येऊन एका तरुण गृहस्थानें त्या डुकराच्या मानेवर असा एक सफाईदार तरवारीचा वार केला कीं, त्याचे तेथेंच दोन तुकडे झाले. मुराररावांनां आपला असा अकल्पित बचाव झाल्याबद्दल ईश्वराची स्तुति केली आणि त्या तरुण-गृहस्थाचे आभार मानिले. तारा बेशुद्ध असल्यामुळें आपण तिला

शुद्धीवर आणण्यासाठीं पाणी आणीपर्यंत तेथेंच बसण्यास त्या गृहस्थास विनंती करून ते झातारीच्या झोंपडीकडे गेले.

थोड्यावेळानंतर तारा इकडे सावध झाली. आपला बचाव कसा झाला हें तिला माहीत नसल्यामुळें आणि मुरारराव तेथें नसून त्याऐवजीं दुसरा एक तरुण गृहस्थ बसला आहे असें पाहून ती फार भयाभीत झाली. ती घाबरून मोठ्यानें हांका मारूं लागली. जवळच बसलेल्या तरुणानें तिला सर्व हकीकत सांगून जवळच पडलेल्या डुकराचें शरीर दाखवलें. तरी तिची कल्पना दूर झाली नाहीं. तिला कांहीं तरी विपरीत झालें असावें असें वाटलें आणि बापाचा शोध करावा म्हणून ती उठण्याचा प्रयान करूं लागली. परंतु नुक्तीच बेशुद्ध झाली असल्यामुळें, पळून पळून दमल्यामुळें, आणि बापाच्या मृत्यूच्या कल्पनेनें अवसानरहित झाल्यामुळें उठून उभे राहतांच तिचा पुन्हा झोंक गेला. त्या तरुणानें मोठ्या चलाखीनें तिला हातावरच झेललें त्यामुळें ती बचावली. तरुण जवळ नसतां तर जवळच्या दगडावर तिचें डोकें आदळून कपाळमोक्ष झाला असता. त्यानें नंतर तिला हळूच गवतावर पूर्ववत् निजवलें आणि आपण जवळच बसून ती निश्चेष्ट झाली असल्यामुळें वारा घालून सावध करण्याचा प्रयत्न करूं लागला.

त्यावेळचें तिचें स्वरूप त्या तरुणास फारच चित्ताकर्षक वाटलें. तिचा केतकीसारखा पण सध्यां निस्तेज झालेला गौरवर्ण, काळेभोर आणि सडक केस, कमानदार भिवया, सरळ नाक, चंचल आणि पाणीदार असे मिटलेले व मधुन मधुन उघडले जाणारे डोळे, आणि बेशुद्धपणीं अस्ताव्यस्त पडलेले अवयव यामुळें तर तो अगदीं वेडा झाला होता. जों जों तो देखावा ज्यास्त वेळ दिसे तों तों त्याची चित्तवृत्ती ज्यास्त चंचल होऊं लागली. अशा प्रसंगीं जवळ बसणें धोक्याचें जाणून जरा तो अंतरावर जाऊन पाठमोरा बसला.

थोड्यावेळानंतर तारा सावध झाली. पडतांना झेलणाऱ्या गृहस्थाच्या शरीरस्पर्शानें तिच्या अंगावर रोमांच उभे राहिले. तारुण्याचा पूर्ण विकास झाला असल्यामुळें त्या लहानशा शरीरस्पर्शानें मदनदहन सुरू झालें. तिला त्या तरुण गृहस्थाचें मुखावलोकन केल्याशिवाय चैन पडेना; ह्मणून ती उठून त्या तरुणाकडे पहात बसली आणि ती त्यांतच तन्मय झाली. तो तरुण शिकारीच्या पोषाखांत होता. डोकीस एक जुनासा मंदील असून अंगांत एक अंगरखा होता. हातांत एक भाला होता. कमरेस तलवार लटकत होती व पाठीवर ढाल पडली होती. तरुण वय, मर्दानी बाणा, पिळदार शरीर, गौरवर्ण आणि सुंदर स्वरूप आणि त्याहूनहीं सुंदर स्वभाव यामुळें त्याकडे कितीही पाहिलें तरी तिचें समाधान होईना. ती सारखी टक लावून पाहूं लागली. आतांपर्यंत आपला प्राणरक्षण करणारा तरुण तिला आतां आपल्या सत्तेचा आहे; नसेल तर झाला पाहिजे असें वाटूं लागलें. आणि अशा प्रकारें ती तरुण रूपावलोकनांत आणि तज्जन्य सुखानुभवांत मग्न असल्यामुळें तिला आपल्या बापाचेंही विस्मरण पडलें.

हें वर्णन करण्यास आह्मांस इतका वेळ लागला; पण तिनें तें काम फारच लवकर केलें. त्या तरुणानें सहज मागें वळून पाहिलें तों तारा उठून आपल्याकडे फार निरखून पहात आहे असें त्यास अढळून आलें. दोघांच्या प्रेमासक्त नेत्रांचें मीलन झालें. तारा अधोवदन झाली. त्या तरुणानें आपलें तोंड फिरवलें. प्राणदात्याचे आभार मानावेत ह्मणून आणि विशेषतः त्याशीं संभाषणाचा योग घडून यावा ह्मणून तिनें विनययुक्त व मोहक अशा स्वरानें ह्मटलें " महाराज ! आज जें माझें आणि बाबांचें रक्षण केलेंत याबद्दल आह्मीं आपले फार ऋणी आहोंत. खरोखरीच आपण ईश्वरी अंश आहों ह्मणूनच अशा निर्वाणीच्या प्रसंगीं आमच्या रक्षणासाठीं आलांत. माझ्या बाबांचा सध्यां

दर्जा मोठा आहे त्यामुळें आपली इच्छा असल्यास आपले हे अद्वितीय शौर्य मराठेशाहीच्या उपयोगीं पडेल अशी व्यवस्था करून देतील. ”

त्या तरुणास हें सहज उच्चारलेलें वाक्य रुचलें नाहीं. तो ह्मणाला, ‘ मी आज कांहीं मोठें कृत्य केलें असें नाहीं. हें तर आमचें कर्तव्य आहे. यासाठीं आपण इतकी कृतज्ञता दर्शविण्याचें कारण नाहीं. आजपर्यंत मुराररावांनीं जो उपकार केला तोच मला बस आहे, ज्यास्त कांहीं नको. ’

तारेस याचा अर्थ मात्र कळला नाहीं. याचा सरळ अर्थ आहे कीं, उपरोधिक आहे हेंच तिला कळेना. बोलण्याच्या पद्धतीवरून तें सरळ नसावें असें तिला वाटलें. ह्मणून शंका निवारण करण्यासाठीं तिनें त्याला नांव विचारलें. ‘ अद्याप नांव सांगण्याची वेळ आली नाहीं ’. असें त्यानें उत्तर दिलें. ती गोंधळून स्तब्ध बसली; पण त्या तरुणाचा उठून जाण्याचा बेत पाहून ती ह्मणाली, ‘ खरोखरीच बाबांच्या लवकर न येण्यानें आपला खोळंबा होत आहे याबद्दल मला फार वाईट वाटतें; पण कृपा करून जर आपण थांबाल व ते आल्यावर जाल तर कांहीं गैर होणार नाहीं. ’ अशा प्रकारचें विनययुक्त भाषण ऐकून तो तरुण तेथेंच बसला. त्यास तेथें फार वेळ बसणें गोड वाटेना व तिला एकटीला सोडून जाणेंही रुचेना. शिवाय सरळ हृदया कोमल तरुणीशीं आपण जरा कठोर वर्तन केलें याचें त्यास फार वाईट वाटलें. पुन्हा जर ती कांहीं बोलेल तर आपण सरळ उत्तर देऊं असा त्यानें विचार केला; पण त्या तरुणाच्या तुटक वर्तनानें हिरमुसलेली तारा न बोलतां गप राहिली. सौंदर्यावलोकनांत तिनें किती तरी चोरटी नजर फेंकिली असेल आणि नेत्रांच्या मीलनानें कितीदां तरी अधोवदन झाली असेल. कांहीं झालें तरी परस्परांचे मनांतील भाव परस्परांस स्पष्ट कळले होते. इतक्यांत मुराररावही आले. आपली मुलगी सावध झालेली पाहून

त्यांस पराकाष्ठेचा आनंद झाला. मुराररावांनीं येतांच तारेस हृदयाशीं धरून ईश्वराची स्तुति केली आणि बराच अंधार झाला असल्यामुळें तें घरीं जाण्यास निघाले. या आनंदाच्या भरांत त्यांचे त्या प्राण-रक्षक तरुणाकडे लक्ष गेलें नाहीं. शेवटीं तारा ह्मणाली " बाबा ! हा आजचा आनंदाचा प्रसंग फक्त या तरुणामुळेंच आला. तो नसतां तर आपली काय स्थिति झाली असती आणि आपल्या कुटुंबावर केवढें संकट आलें असतें याचा अंदाज करतां येत नाही. "

' अलबत् ! या तरुण माणसाचा मी पूर्ण ऋणी आहे. तुह्मी जें आज शौर्य दाखवलें आणि मुरारराव जहागीरदाराचे आणि त्यांच्या प्रिय मुलीचें जें रक्षण केलें त्यामुळें लोकांत तुमची वाहवा होईल. आणि या उपकाराचा प्रत्युपकार जहागीरदारांकडून आपल्या इच्छेप्र-माणें मिळेल. शेवटीं अशा शूर माणसाचें नांव काय आहे हें कळण्या-साठीं मी स्वतः विनंती करितों. ' मुरारराव ह्मणाले.

' त्यासाठीं विनंती करण्याचें कारण नाहीं. मी रणधीरराव जाधव आहे. मीं जे केले ते उपकार नव्हेत. आणि प्रत्युपकाराची त्यास मुळींच गरज नाहीं. ' नंतर तारेकडे वळून ' हे तुमचे बाबा आले आहेत आतां मी जातों. ' असें ह्मणून रणधीरराव चट्कन् झाडींत निघून गेला. जाधवाचें नांव ऐकतांच मुरारराव अगदीं गोंधळून गेले. त्यास परत बोलावण्याचा प्रयत्न केला; पण तो सिद्धीस गेला नाहीं. व रणधीरराव पुन्हा आला नाहीं !

मुराररावाच्या चेहऱ्यावर आश्चर्य आणि तिरस्कार यांची संमिश्र छटा दिसूं लागली. इतकावेळ आपण त्यास कसें ओळखलें नाहीं याचेंच त्यास आश्चर्य वाटूं लागले. आणि आपला हाडवैरी अशा निर्वाणीच्या प्रसंगीं आपलें रक्षण करतो याचें कारण काय असावें याचा विचार ते करूं लागले. रणधीरराव उदार मनाचा असलाच

पाहिजे असा त्यांचा ग्रह झाला. ज्ञातारीच्या प्रत्येक शब्दाची पुन्हा त्यास आठवण झाली आणि आपल्या कृतकृत्याबद्दल पुन्हा पश्चात्ताप वाटूं लागला. यापुढें सलोख्यानें वागण्याचा त्यांनीं निश्चय केला.

रणधीररावाच्या नाशासाठीं चतुर बायजाबाईंनीं जो दारू-गोळा तयार केला होता, तो घेऊन शेवटचा बार उडवण्यासाठीं त्या स्वतःच माहेरीं गेल्या होत्या. त्यामुळें रणधीररावाच्या नाशाची जी मुराररावास खात्री होती, ती खात्रीच त्यांस ताप देऊं लागली. आधींच गोसाविणीच्या भाषणानें घाबरल्यामुळें आणि विशे-षतः शत्रूच्या उदारवर्तनानें चकित् झाल्यामुळें जाधवांच्या नाशाची कल्पना त्याच्या विवेकास रुचेनाशीं झाली. रणधीररावांचा बचाव केला पाहिजे असा त्यांनीं विचार केला. त्याच्या नाशासाठीं आपण विवेक, नीति आणि धर्म यांस न जुमानून अनेक गर्हणीय मार्गांनीं प्रयत्न केले, त्यानें निर्वाणीच्या प्रसंगीं आपला बचाव करावा हाच खरा पुरु-षार्थ असें त्यांस वाटूं लागलें आणि अशा थोर पुरुषाशीं वैर करून आपलें बरें व्हावयाचेंही नाहीं असें त्यांस वाटलें. स्वतःचा जहागीरदार-पणा आपणांस शोभत नाहीं अशी त्यांची खात्री झाली. आणि स्वतःचा नीचपणा आणि शत्रूचें औदार्य, आपला स्वार्थ आणि त्याचें शौर्य हीं त्यांच्या नजरेसमोर मूर्तिमंत दिसूं लागलीं. क्षणिक ऐहिक सुखासाठीं केलेल्या कृतींचा त्यांना अगदीं वीट आला. आणि ज्या बायजाबाईसाठीं आणि तिच्या प्रेमासाठीं आपण इहपर घालवलें तिचा अगदीं कंटाळा वाटूं लागला. रणधीररावाची बचावाची कल्पना तिला मान्य होणार नाहीं आणि ती आपलें ऐकणार नाहीं ह्मणून त्यांनीं दरबारांतील इतर प्रमुख सरदारांस पत्रें लिहून बायजाबाईची बातमी खोटी आहे, द्वेषमूलक आहे असें कळवून, तो खटला खालच्या खालींच

काढून टाकण्याची विनंति केली. दरबारी लोकांस पत्नीविरुद्ध त्यांचें असलें धैर्य पाहून बरेंच आश्चर्य वाटलें. परंतु तो खटला तेथेंच मिटला. बायजाबाईस त्यानें फार राग आला आणि मुराररराव येऊन क्षमा मागेपर्यंत त्यांचेकडे जायचेंच नाहीं असा विचार करून त्या माहेरी राहिल्या. मुराररावानें मूर्खपणानें आपल्या कन्येचा सर्व व्यूह ढासळून टाकावा याबद्दल पिलाजीरावही फार गरम झाले; पण इकडे मुराररावास मात्र बराच आनंद झाला होता.

गोसावीण नेहमीं ज्या पुरुषाचे गुण गात होती, त्या पुरुषाचा परिचय होण्याचा आणि संभाषण करण्याचा प्रसंग असा अकल्पित रीतीनें आल्याबद्दल तारेस फार आश्चर्य वाटलें. गुण श्रवणानें ज्या तरुणाविषयीं तिचें मन सार्द्र झाल्यानें जो प्रेमांकुर उद्भवला होता तो आतां प्रत्यक्ष दर्शन, परिचय, संभाषण, शौर्य आणि सद्गुण यामुळें जोगवला. तारेस रात्रभर झोंप आली नाहीं. नेहमीं ती मूर्ती आपल्या भोंवतीं फिरतें आहे असा तिला भास होई. त्याचा तो मोहकपणा, तें सौंदर्य, तो सरदारी बाणा आणि ती रमणीय मूर्ति आतां तिच्या हृदयांतील अधिष्ठित देवता झाली. जागृतावस्थेंत देखील तिला त्यांचा स्पर्श झालासा वाटे. व त्या काल्पनिक सुखांतच ती तल्लीन होऊन जात असे. अर्धवट बेशुद्ध असतांना व जमीनीवर पडतांना रणधीररावांनीं झेललेला प्रसंग तिला थोडथोडासा आठवूं लागला. पुन्हा आपण पडतों आहों आणि रणधीरराव आपणांस सांवरीत आहेत असा तिला भास होऊं लागला. अशाप्रकारें तिनें सारी रात्र वेड्यासारखी घालवली. कधीं घोड्याच्या टापांचा आवाज ऐकूं येऊन, रणधीरराव आपणाकडे येत असावेत असें वाटून ती खिडकी उघडून पाही व निराश होई, तर केव्हां स्वतःसारखेच प्रेमबद्ध होऊन रणधीरराव आपणांकडे येऊन दारावर थाप मारित आहेत असें वाटून ती दार उघडी; पण पुन्हा निराशा

ठेवलेलीच. स्वप्नांत रणधीरराव आले असें वाटून आलिंगनोत्सुक असे पसरलेले बाहू खिडकीस लागत आणि ती जागी होऊन हा प्रकार स्वप्नांतला असें समजून पुन्हा बद्दील होऊन बिछान्यावर पडे. अशा मानसिक प्रक्षुब्धतेंतच दिवस उगवला.

गोसावणीकडे जाऊन ती रणधीररावाची ज्यास्त माहिती मिळावी ह्मणून झटे. परंतु, त्या धूर्त ह्मातारीनें नवें कांहींच सांगितलें नाहीं. तिचें नेहमींचें ठराविक वर्णन असे. त्यामुळें गोसावणीच्या ह्मणण्या इतके ते सूड घेण्यास अत्युत्सुक असें नाहींत असें तिला वाटूं लागलें. इतकेंच नव्हे तर भाषणांत तुटकपणा खेरीज त्यांच्यांत कांहींच दुर्गुण नाहींत अशी तिची खात्री झाली. अशा थोर मनाच्या गृहस्थास जर आपण आपलें तनमनधन अर्पण केलें तर निराशा होणार नाहीं अशी तिची दृढ कल्पना झाली.

रणधीररावास स्वतःच्या दुःखाचें आणि आपत्तीचें विशेष वाईट वाटलें नाहीं. परंतु, आपल्या बापाचा ज्या दुष्टानें विनाकारण छल केला त्याच्या नरडीचा घोट घेतला पाहिजे असा त्यानें विचार केला. मुरारराव गोसावणीच्या झोंपडीकडे एकटेंच गेले आहेत असें कळतांच रणधीररावानें आपली तयारी केली. कदाचित् त्याजवळ तरवार नसेल ह्मणून त्यानें आणखी एक तरवार आणि ढाल घेतली. या सामन्यांतून कोणी तरी एकटा जिवंत राहिला पाहिजे अशा दृढनिश्चयानें तो निघाला होता. पण परमेश्वरी रचना निराळीच. परत येतांना मुरारराव आपल्या मुलीसह येत असल्यामुळें त्यावेळीं त्याशीं सामना करणें ह्मणजे तिला दुःख देणें होय ह्मणून तो बेत त्यानें फिरवला; पण इतक्यांत आपला शत्रू हिंस्र पशूच्या तावडींत सांपडून मरतो आहे असें पाहतांच त्याचें मन द्रवलें आणि त्याचा त्यानें बचाव केला. शिवाय तो जर पशूच्या भक्षस्थानीं पडता तर पुढें आपणांशीं सामना करण्यास

तो न राहता, झणून त्यानें आपल्या शत्रूचें रक्षण केलें. शत्रूचें रक्षण झालें, शत्रू पशूच्या तावडींतून बचावला, आपल्या सामन्यासाठीं राहिला; पण रणधीररावाचें मात्र रक्षण झालें नाहीं. तो प्रेमाच्या तावडींत सांपडला आणि त्यामुळें त्याचे सुडाचे विचार जरा ढिले पडले. रणधीररावासही याचें फार आश्चर्य वाटलें. शत्रू नाहींसा करण्याचे ऐवजीं आपलें शत्रुत्व, सुडाचे विचार हेंच नाहींसे करूं लागलों असें त्यास वाटे. तारेची सुंदर मूर्ती त्यास मोहक वाटली; पण त्यासाठीं अद्याप तो वेडा झाला नव्हता. त्याजवर प्रेमाचा पूर्ण अंमल बसला नव्हता. त्याचें वैर जरी नष्ट झालें नव्हतें तरी तें कमी प्रखर मात्र खात्रीनें झालें होतें. प्रेमामुळें त्या तरुणीस दुःख होईल अशी गोष्ट करणें—मुराररावाचा सूड घेणें—त्यास रुचेनासें झालें. त्याची स्वतःची मती अगदी गुंग झाली झणून त्यानें आपल्या मामास सर्व हकीकत कळवून त्याचें मत विचारलें व तें उत्तर येईपर्यंत कांहीं करायचें नाहीं असा त्यानें निश्चय केला. त्यास स्वतःसच या सर्व प्रकाराचें पराकाष्ठेचें आश्चर्य वाटून, हें ‘ सूड कीं रक्षण ’ हेंच कळेनासें झालें.

---

# प्रकरण ४ थें.

## विलक्षण भेट.

रणधीररावाचे मामा विश्वासराव शिरके हे कोकणांतील बड्या सरदारापैकीं होते. राजाराम महाराजाच्या मातोश्री सोयराबाई ह्या याच घराण्यांतल्या होत्या, त्यामुळें संभाजीनें त्यांचा क्रूरपणानें वध केल्यापासून कोकणांतील बरेच सरदार खवळून गेले होते. संभाजीस

पदभ्रष्ट करून राजारामाची गादीवर स्थापना करण्याचा त्यांचा बेत होता. संभाजीच्या जुलमानें जे लोक त्रस्त झाले होते, असंतुष्ट झाले होते, किंवा जे खरे निमकहलला सरदार महाराष्ट्रसत्तेचे अस्तित्व इच्छित होते ते सारे संभाजीच्या कारकिर्दीचा शेवट इच्छित होते; पण दुसऱ्याचा शिरकाव न होऊं देतां ही क्रांती घडवून आणायची होती. ही क्रांती अंतस्थरीतीनें जरी प्रत्येकास हवी होती तरी पुढाकार घेण्यास कोणीच धजेना. आणि साऱ्या महाराष्ट्रभर असे सरदार पसरलेले होते तरी ही गोष्ट खटपटी खेरीज यशस्वी होण्याचीं चिन्हें दिसेनात. शेवटीं विश्वासराव स्वत: महाराष्ट्रांत आले आणि त्यांनीं त्या कामीं खटपट सुरू केली. रणधीररावांची झालेली स्थिति त्यांस कळली होती; पण त्या परिस्थितींत कांही करणें शक्य नसल्यामुळें त्यांस गप्प बसणेंच इष्ट वाटलें. इतक्यांत त्यांस रणधीररावाचें पत्रही आलें. त्यांस त्याचे सूडासंबंधीचे वेडगळ विचार रुचले नाहींत, म्हणून त्यांनीं रणधीररावास जरा शहाणपणानें वागण्याचा उपदेश केला. तें पत्र खालील प्रमाणें होतें:—

'चिरंजीव रणधीर राव यास:-

अनेक आशिर्वाद, तुमचें पत्र पोंचलें. संताजीरावांच्या मृत्युमुळें आम्हांस पराकाष्ठेचें दु:ख होत आहे; पण काळाकडे लक्ष देऊन दु:खाचें सांत्वन करून घेतलेंच पाहिजे. आमच्या प्रियभगिनीच्या मृत्यूनंतर आमच्या खाजगी व्यापामुळें तुमचा समाचार घेण्यास फावलें नाहीं यावरून तुमच्या आमच्या प्रेमांत कांहीं व्यत्यय आहे असें मानूं नये. बहिणीची मुलें तीं आमचींच. तुमचा समाचार घेणें आमचे आद्यकर्तव्य आणि आमच्यापासून वाटेल ती मदत घेणें हा तुमचा नैसर्गिक हक्क होय. यापुढें कोणत्याही बाबतींत अनमान होणार नाहीं अशी आशा आहे. तुमच्या घराण्यावर एकसारखी जी संकटाची मालिका लागली

आहे त्यामुळें तुमच्या स्थितीचा दगडासही द्रव येईल. शौर्यानें, इमानानें आणि नेकीनें तुमच्या पूर्वजांनीं जी संपत्ती मिळवली होती तिची मालकी फक्त राजाच्या हुकमानें आणि इच्छेनें एखाद्या परक्या, लुच्चा, नीच माणसास मिळावी यांत आश्चर्य वाटण्याजोगें कांहींच नाहीं. सध्याच्या दृष्टीनें अशा गोष्टी होणेंच ज्यास्त इष्ट आहे. या संकटांस प्रखर करण्याची परमेश्वरी इच्छाही दिसून येते. असें नसतें तर तुमचे वडीलही मृत्यू न पावते. अशा प्रकारें तुमच्यावर चोहोंकडून आकाश फाटलें आहे. संकटानें निराश होऊन, अपमानानें संतप्त होऊन शत्रूचा सूड उगवायचा तुमचा बेत दिसत आहे. पण मला ही तुमची कल्पना मुळींच पसंत नाहीं. जें कांहीं होत असतें तें परमेश्वरी इच्छेवरूनच घडून येत असतें. संकटें मनुष्याच्या नीतिची, धर्माची आणि विवेकाची कसोटी पाहण्यास येतात, आणि वाईट मार्गांत यश हेंही देखील त्यास भुलवून दुर्मार्गी लावण्यासाठींच येतें. तुह्मीं या संकटांत अनीतीस आणि अविवेकास थारा देऊं नये. पण सध्यां तुमच्या परिक्षेचा दुसरा एक राष्ट्रीय प्रसंग आला आहे. सध्याचें राष्ट्राचें संकट किती भयंकर आहे याची अद्याप कल्पना तुह्मांस येणार नाहीं. परंतु ज्यांनीं प्रत्यक्षपणें थोरल्या महाराजाबरोबर याकामीं देह झिजवला आहे त्यांस याचा भयंकर-पणा दिसून येणार आहे. सध्याची अशी स्थिति झाली आहे कीं, महत्प्रयासानें उभारलेलें हें राष्ट्रमंदीर लवकरच ढासळणार असें वाटूं लागलें आहे. यासाठीं आपण प्रयत्नांत दिरंग केला तर आपलें कर्तव्य न बजावण्याचा खऱ्या मराठेवीरास न शोभणारा आरोप आपणावर इतिहास करील. यासाठीं सध्या तुह्मी व्यक्तिविषयक प्रश्नांची विशेष फिकीर न करितां या राष्ट्रीय कार्यांत आपलें शौर्य भासवाल अशी आशा आहे. कांहीं कामामुळें मला तिकडे यावयाचेंच आहे. समक्ष भेटीअंती इतर गोष्टींचा खुलाला करू. मात्र कोणत्याही प्रकारचा तुह्मीं अविचार करू नये. कळावें. वि. शि'.

त्या पत्रामुळें रणधीररावांच्या विचारांत बराच फरक पडला होता. ज्या माणसानें पत्र आणिलें होतें त्याच्याकडून कळलेल्या हकीकती- वरून त्यास मामांच्या प्रयत्नांची दिशा कळून आली आणि अशा- कामीं आपण अवश्य मदत केली पाहिजे असें त्यांस वाटूं लागलें. त्यामुळें मुरारराव्यांच्या सुडाचा विचार मनांत मुळींच येईनासा झाला. आणि विशेषत: त्याची प्रेममग्न स्थिति झाली असल्याकारणानें आप- णांस प्रिय झालेल्या तरुणीच्या पित्याचा नाश करणें निर्दयपणाचें आणि अमानुषपणाचें भासूं लागलें.

इकडे मुराररावांसही अशा उदारचरित गृहस्थाशीं वैर करणें अयोग्य भासूं लागलें. त्यांच्या वर्तनक्रमांत बराच फरक पडला. विशेषत: बायजाबाई माहेरीं गेल्या असल्यामुळें त्यांच्या अशा सुविचा- रावर घाला न पडतां दररोज तो जास्त वाढूं लागला. जितका जास्त विचार करावा तितका जास्त पश्चात्ताप होऊं लागला आणि यापुढें आपल्या वर्तनक्रमाची दिशा बदलण्याचा त्यांनीं निश्चय केला. एखादे- वेळेस त्यास असें वाटें कीं, आपण जाऊन रणधीररावास सर्व खरी हकीकत सांगून क्षमा मागावी; त्यांतही कांहीं फायदा दिसेना ह्मणून त्यांनीं कलुशा वगैरे कडून त्याची संपत्ती परत देववण्याचा विचार केला; पण तेही संभवनीय दिसेना. शेवटीं त्यास एक सुंदर युक्ति सुचली. तारेची प्रेमानें झालेली स्थिति त्यांस दिसली व रणधीररावाचीही अशीच झाली असेल असा त्यांनीं विचार केला. निदान त्या दोघांचा स्नेहसंबंध, आणि परिचय वाढवावा ह्मणजे ही गोष्ट आपोआप घडून येईल असा अंदाज करून रणधीरस- वास घरीं आणून ठेवण्याचा त्यांनीं नक्की विचार केला. जर ही युक्ति सफल झाली आणि रणधीररावाचें व तारेचें लग्न झालें तर अनायासें त्याची संपत्ती त्यांस मिळून त्या लग्नामुळें बायजाबाईचें

कडवें वैर कमी होऊन सर्वच सुखकारक प्रकार होईल असें त्यांस वाटलें. या कल्पनेनें त्यांस आनंद झाला आणि रणधीररावाच्या भेटीसाठीं ते प्रयत्न करूं लागले.

नेहमींप्रमाणें रणधीरराव पहाडांतून फिरत असतां मुराररावांची भेट झाली. ताराही बरोबर होती. मुराररावांस हवा होता तोच प्रसंग आल्यामुळें त्यांस आनंद झाला. रणधीरराव मात्र गांगरून गेला. त्यास काय करावें हेंच कळेना व तारेस पाहतांच तर तो जास्त बावरून गेला. तारा तर लज्जेनें अधोवदन झाली. पूर्वी तिच्याशीं केलेल्या तुटक वर्तनाचें त्यास वाईट वाटूं लागलें आणि पुन्हा भाषणाचा प्रसंग आला याबद्दल आनंद झाला. शेवटीं मुरारराव ह्मणाले--

' रणधीरराव, त्या दिवशीं तुह्मीं जे आह्मांवर उपकार केलेत त्याबद्दल आह्मी जन्माचें ऋणी झालों आहोंत. '

' मी कांहीं विशेष केलें नाहीं. आपण निःशस्त्र होता आणि तो दुष्ट प्राणी तुमच्यावर अचानक झडप घालणार होता अशा स्थितींत मी जवळ असूनही जर मदत केली नसती तर मराठेवीरास कलंक लागला असता. '

' ही गोष्ट खरी आणि तुमच्या सारख्या घराण्याच्या शूरास हें विशेष नवीन नाहीं. परंतु, आपल्या परस्पर संबंधाविषयीं लोकांत जी कल्पना आहे त्यामुळें तर तुमच्या या कृतीचें पुष्कळांस कौतुक वाटलें व तें वाटणेंही गैर नव्हें. '

' घराण्याचा संबंध ' हे शब्द ऐकतांच रणधीररावाचा चेहरा संतप्त दिसूं लागला. हा फरक मुराररावाच्या लक्षांत आला. तारा तर पूर्ण भयभीत झाली; पण रणधीररावानें क्रोध आटपून भाषण केल्यामुळें सर्वांची भीति कमी झाली. तो ह्मणाला - " तो संबंध कसाही असला तरी त्यांत आतां बदल होणें शक्य नाहीं. आणि त्या संबंधास साजे-

लसें वर्तन राहीलच. परंतु शत्रू संकटांत सांपडला असतां मदत न करण्याइतका नीचपणा अद्याप जाणवांत आला नाहीं. कांहीं करायचें असलें तर उघडपणें आणि राजरोसपणें झालें पाहिजे. चोरीचा सूड शूरांस शोभत नाहीं. ”

रणधीररावाच्या मनांत आपणाविषयीं कसले विचार चालले आहेत ते या भाषणावरून मुराररावांस स्पष्ट कळून आले; पण ते चलाख आणि प्रसंगावधानी असल्यामुळें अशा भाषणानें न घाबरतां अगर क्रोधवश न होतां, त्यांनीं अवसानानें आपलें भाषण सुरू केलें,

‘ रणधीरराव, तुमचा देखील या बाबतींत गैरसमज झालेला पाहून मला पराकाष्ठेचें वाईट वाटतें. तुमच्यामतें तुमची जहागीर अन्यायानें मींच बळकावली, असेंचना ? आणि तुमच्या साऱ्या विपत्तीला कारणीभूत मीच. असेंना ? हो तुह्मांस तरी काय माहीत ! लहानपणापासून जे उद्गार तुह्मीं ऐकिलेत त्याचाच हा प्रतिध्वनी आहे. वास्तविक पाहतां माझा व्यक्तिशः याकामीं कांहीं संबंध नाहीं. गादीवर बसतांच महाराजांनीं जी सनदांची तपासणी केली त्यांत तुमची सनद त्यांस विश्वसनीय वाटली नाहीं ह्मणून त्यांनीं तुमची जहागीर काढून घेतली. यांत जर माझा कांहीं दोष असेल तर पहा, आतां मलाच जहागीर मिळाली ही महाराजांची कृपा. पूर्वींपासून मजकडे या प्रांताची मामलत होती, फक्त कलुशा अमात्यांच्या विनंतीवरून आणि मीं स्वतः जी त्यांची इमानें इतबारें सेवा केली त्यावरून महाराजांनीं कृपावंत होऊन ही सरफराजी केली. असें झालें ह्मणून मी तुमचा शत्रू कसा होतों हें मात्र मला सुचेनासें झालें आहे. शिवाय, या गोष्टी मानवी इच्छेवरून थोड्याच घडून येतात. परमेश्वरी इच्छाही अशींच असेल. नाहींतर संपत्तीबरोबर तुमचे सर्वच आधार कसे पटापट नष्ट होते ? ’

तारेस आपल्या बापाच्या बोलण्याचा रणधीररावाच्या मनावर

बराच परिणाम होईल असें वाटलें आणि तीही जणुंकाय आपल्या बापाच्या भाषणास पुष्टी देत आहे अशा केविलवाण्या मुद्रेनें रणधीर-रावांकडे पाहूं लागली. रणधीररावांच्या आणि तिच्या दृष्टीचें एक-दोंचें मीलन झालें आणि त्या कृतीचा तिला अपेक्षित असा परिणाम झाला. मुराररावांचें भाषण जरी त्यांना पुरें पटलें नाहीं तरी आपण स्पष्ट बोलून या तरुणीस व्यर्थ दुखवलें असें त्यास वाटूं लागलें. आणि ते शांतपणाचा आव घालून ह्मणाले, ' मी जरी एक दोन कडक शब्द वापरले तरी माझें आपणांशी कट्टे शत्रुत्व आहे अशातला भाग नव्हे. माझें नुकसान झालें आहे हेंही खरेंच आणि तें कोणीतरी दुष्ट-बुद्धीनें केलें हेंही खरेंच. फक्त माझी आजपर्यंत अशी कल्पना होती कीं ही आपलीच—— '

' मी एकदां ह्मटलेंना कीं, त्यांत माझा व्यक्तिश: संबंध नाहीं ह्मणून. तुह्मांस तसें वाटत असेल तर माझा अगदींच नाइलाज आहे. ही गुण-गुण मला केव्हांच कळली होती. परंतु, प्रत्यक्ष तुमची आणि माझी कधीं भेट होण्याचा प्रसंग न आल्यामुळें तुमचा गैरसमज दूर करतां आला नाहीं. परवांच्या तुमच्या उदार वर्तनानें माझें तुह्मांविषयींचें प्रेम द्विगुणित झालें आहे. आणि त्यामुळें खरी हकीगत सांगून गैरसमज दूर करण्याचा मीं अगदीं निश्चय केला होता. त्याप्रमाणें मीं आज खरें कायतें सांगितलें. आतां झालेल्या गोष्टीबद्दल माझा नाइलाज आहे. सध्यांच्या परिस्थितींत गतवैभव पुन्हा तुह्मांस मिळणें शक्य नाहीं. परमेश्वरावर भार ठेऊन बसलें ह्मणजे हेही दिवस जातील. '

" तुमच्या सहानुभूतीबद्दल मी तुमचा फार आभारी आहें. आणि आजपर्यंत माझा जो गैरसमज होता तोही आतां दूर झाला. यापुढें आपला स्नेहसंबंध कायम राहील अशी आशा आहे. "

मुराररावांच्या मुत्सद्दी भाषणानें रणधीररावांच्या तोंडून वरील उद्गार

निघाले असतील यांत नवल कसलें ? या नवीन स्नेहसंबंधाचा सर्वांस अतिशय आनंद झाला आणि प्रत्येकानें मनांत याबद्दल ईश्वराचें आभार मानिले; पण आकाशांत मेघांचा गडगडाट आणि पावसाची इतर चिन्हें पाहून तें सारें परतलें. रणधीररावांच्या पहाडावरील घरांजवळ जाण्यापूर्वीच पावसानें गांठिलें. सारे भिजून ओलेचिंब झाले. तारा तर त्या थंडीनें गारठून गेली. तिच्या नाजुक प्रकृतीकडे लक्ष देऊन रणधीररावांनीं त्या सर्वांस घरांत चलण्यास विनंती केली. मुराररावांस आपला नवा स्नेह दृढ करण्यासाठीं असला प्रसंग हवाच होता. त्यांनीं ती गोष्ट मान्य केली. तेथें गेल्यावर थोडासा गरिबी फराळ झाला. बराच वेळ झाला. रात्र झाली तरी पाऊस थांबण्याचीं चिन्हें दिसेनात ह्मणून त्यांनीं रात्रभर तेथेंच राहण्याचा निश्चय केला. रणधीररावांस मुराररावांच्या साधेपणाचें फार आश्चर्य वाटलें आणि ते जरी आपल्या नाशांत मुळींच नव्हतें असें नाहीं; तरी मुख्य सूत्रचालकत्व कोठेंतरी दुसरीकडे असलें पाहिजे अशी त्यांची खात्री झाली. या विलक्षण भेटीचें प्रत्येकांस आश्चर्य वाटून आनंद झाला आणि त्या आनंदांतच त्या सर्वांना झोंप लागली.

---

# प्रकरण ५ वें.

## गुप्त मसलती— तुळशीबाई.

पूर्वींच्या चळवळीपैकीं विश्वासरावाच्या चळवळीची थोडीशी ओळख मागें झालीच आहे; पण त्याशिवाय त्या काळीं अनेक लोक अनेक कारणांनीं त्या प्रचलित पद्धतीचा शेवट इच्छित होते आणि अनेक मार्गांनीं प्रयत्न करीत होते. आपल्या प्रिय

माणसाच्या वधानें अगर अपमानानें संतप्त होऊन कांहीं लोक संभाजीचा वध करण्यास प्रवृत्त झाले होते; पण त्यास त्याचें काय ? त्यांनीं आपल्या दयापूर्ण कृतींनीं सर्वत्र थंड करण्याचा सपाटा सुरू केला होता. आज या सरदाराचा वध कर. उद्यां त्याची गर्दन छाट. आज यास हत्तीच्या पायीं दे तर त्यास भिंतींत जिवंत चिणून टाक. यास कड्यावरून लोटून दे. तर त्यास चुन्याच्या भट्टींत टाकून जाळ. अशा प्रकारें संभाजीचा क्रम चालला होता. कलुशासारखा मदतगार भेटल्यामुळें कोणतीच सामुग्री कमी पडली नाहीं. अशाप्रकारें थोर सरदारांचे, इमानी मुत्सद्यांचे, आणि थोरल्या महाराजांच्या विश्वासू मोहऱ्यांच्या आहुतीनें महाराजांची इच्छा शांत झाली नाहीं ह्मणून त्यांनीं राजारामाच्या मातोश्रीचा अत्यंत क्रूरपणें वध केला. यावेळेस दारूबाज, रंडीबाज, इष्की, खुशालचंद अशींच माणसें आपल्या विलासी मुद्रेनें सैन्यें आणि दरबार यांस सुशोभित करतीं झालीं. दुर्व्यसनांच्या संख्येवर आणि प्रखरतेवर बढती मिळूं लागली. दररोज अघोरकृत्यें होऊं लागलीं. क्रूरपणाचा कळस झाला. माणसाचा वध करणें ह्मणजे ' डोईतल्या उवा मारणें होऊन बसलें. ' अशा प्रकारें संभाजीची कारकीर्द चालली होती.

दरबारी लोक आधींच कंटाळले. इमानीपणा आणि शौर्य यामुळें धन्याची मर्जी संपादितां येईना. त्यासाठीं दारूचा पेला आणि असलेंच कांहीं शस्त्र लागत असे. दिवाणजी तर अष्टौप्रहर दारूचा पेला घेऊन महाराजांसमोर खडे असत. महाराजांच्या पूर्णविश्वासामुळें कलुशाखेरीज राज्यांतली एखादी काडी देखील हलेनाशी झाली. या गोष्टी न रुचून जे सरदार घरीं बसत त्यांजवर रुष्ट होऊन त्यांची मालमत्ता जप्त करीत. महाराजांस यापैकीं कांहींच कळत नसे. त्यांचा सारा वेळ

मद्यपानांत आणि तुळशीच्या रंगमहालांत जात असे. तिचा भाऊ एसाजी फर्जंद हा राजाचा 'नाकाचा बाल' झाला होता. यामुळें खाजगी सर्व सूत्रें याच्या स्वाधीन असत.

तुळशी आणि एसाजी हीं हिरोजीफर्जंदाचीं मुलें होत. लहानपणीं संभाजीनें सरकारी खजिना लुटला असतांना ज्या जामदारानें थोरल्या महाराजांस सांगून संभाजीस शिक्षा करविली होती, तोच हा हिरोजी फर्जंद. हिरोजीनें आपल्या धन्यानें हा नीच मार्ग सोडावा याच हेतूनें शिक्षा करवली; पण त्याचा विपरीत परिणाम झाला. संभाजीस तेव्हांपासून तो आपला कट्टा शत्रू आहे असें वाटूं लागलें. आणि एकदां समय साधून हिरोजीचा कुस्तीच्या मिषानें प्राण घेतला. यामुळें एसाजीस संभाजीचा कधीं सूड घेऊं असें वाटत होतें; पण त्याचें सामर्थ्य अगदींच थोडें असल्यामुळें संभाजीचा खून करण्यासाठीं त्यास कपटाचाच अवलंब करावा लागला. संभाजीचे तुळशीवर जें प्रेम होतें तें कांहीं कमी होईना. तिचें मात्र त्यावर मुळींच प्रेम नसे. ह्मणून तिचें ज्यावर प्रेम होतें त्या दौलतरावाचा संभाजीनें खून करून आपल्या मार्गांतला कांटा काढिला; पण त्यामुळें तर तुळशी अगदींच खवळून गेली. बापाचा वध करणाऱ्या आणि विशेषतः आपल्या प्रियकराचा प्राण घेणाऱ्या संभाजीविषयीं तिच्या मनांत पराकाष्ठेचा संताप भरला होता. एसाजी आणि तुळशी या दोघांचें त्याच्या सूडाविषयीं एकमत झालें. इतक्यांत संभाजीची संक्रांत प्रत्यक्षपणें तिच्याकडे वळली. तरुण, सुस्वरूप अशी अनाथ मुलगी पाहून त्यानें नाहींनाहीं ते चाळे सुरू केले. आणि एकदां तर त्यानें स्पष्ट आपले विचार कळवलेही. मसलत साधन आणि या युक्तीनें आपला हेतू तडीस जाईल असें वाटून तिनेंही संमति दिली. वरकांती प्रेम दाखवून त्यास तिनें अगदीं मुठींत ठेवलें होतें. संभाजी भोळया स्वभावाचा असल्यामुळें तिचें तें प्रेम खरोखरीच आहे असें

त्यास वाटलें. त्याचा बहुतेक वेळ तिच्याच घरीं जाऊं लागला. तिच्याशिवाय त्यास मुळींच सुचेनासें झालें. तिनें मुद्दाम राजाचें दारूचें व्यसन अधिक वाढविलें. अशाप्रकारें तो कब्जांत आल्यावर तुळशी आणि एसाजी यांनीं आपला मुख्य हेतू तडीस नेण्याच्या प्रयत्नास सुरुवात केली.

शिवाजी महाराजांच्या मृत्यूपासून अवरंगजेबाचा महाराष्ट्रावर डोळा असे. त्यांत संभाजीच्या या स्थितीमुळें आपल्या यशाची त्याला पूर्ण आशा वाटूं लागली. आणि मुख्यतः राजाची व्यसनाधीनता तर ही आशा दृढ करीत असे. अशा स्थितींत जुन्या बाणेदार आणि शूर लोकांत फूट पाडून आपला कार्यभाग उरकण्यासाठीं तकरीबखान आणि इखलासखान या बापलेकास पाठवले होते. परंतु, विश्वासरावासारखे अभिमानी, शूर, धूर्त, आणि दूरदर्शी मुत्सद्यांनीं त्याचा हा कावा ओळखून यांचे कोणतेही प्रयत्न यशस्वी होऊं दिले नाहींत. इतक्यांत तुळशी आणि एसाजी यांचा त्यांना परिचय झाला. आणि त्यांस आपण दिल्ली सोडून ज्या उद्देशानें आलों तो अंशतः तरी तृप्त होईल असें वाटून त्यांनीं त्यांशीं स्नेह केला. बरेच दिवस अनेक कारणामुळें या चौकडीच्या मसलतीला यश आलें नाहीं. जोत्याजी या नांवाचा एक संभाजीजवळ हुजऱ्या होता. त्यास मात्र तुळशीच्या कपटाचा सुगावा लागला. त्यानें संभाजीस परोपरीनें सांगितलें; पण त्यांस तें खरें वाटलें नाहीं. तरी त्यानें त्यांचा बेत मात्र यशस्वी होऊं दिला नाहीं. शेवटीं त्रासून तो कांटा आपल्या मार्गांतून उपटून टाकण्याचा खानांनीं विचार केला; पण ती कल्पना तुळशीस रुचली नाहीं म्हणून तें अमलांत आले नाहीं. त्यांनीं आपला कावा साधण्यासाठीं दुसऱ्या युक्त्या लढविल्या.

शेवटीं त्यांची अशी खात्री झाली कीं, रायगडासारख्या राजधानीच्या

ठिकाणीं राहून आपले हे बेत सिद्धीस जाणार नाहींत. ह्मणून त्यांनीं संभाजीस तेथून कोठें तरी दूर नेण्याची मसलत केली. संभाजीस शिकारीचा विशेष नाद असे. त्यास शिकारीचा कोणी आग्रह केला तर तो तो मोडीत नसे. त्याच्या या स्वभावाचा फायदा घेऊन तुळशीनें त्यास शिकारीस जाण्यास सिद्ध केलें. इतकेंच नव्हे तर उन्हाळ्याचे २–३ महिने संगमेश्वरींच घालवावयाचे असें ठरलें. शिवाय बरोबर लवाजमा वगैरे न घेतां फक्त निवडक २५–३० माणसांस नेण्याचा हुकूम झाला. त्यामुळें तर आपणांस या कामीं खात्रीनें यश येईल असें तुळशीस वाटूं लागलें. व आपली ही मसलत पार पडली हा एक मोठा शुभशकूनच झाला असें तिला वाटूं लागलें.

संगमेश्वरीं जातांच चैन सुरू झाली. संभाजी आणि कलुशा नाच, रंग, तमाशे आणि दारू यांत मग्न झाले. तुळशी व एसाजी वगैरे लोक संभाजीचा जीव घेण्याची तयारी अगदीं जारीनें करीत होते. व तो बेत शेवटास न्यायचा दिवसही ठरला. तकरीबखानानें संकेताप्रमाणें पांच मारेकरी वाड्यांत आणून ठेविले. तुळशी आणि एसाजी यांच्या वृत्तींत त्या दिवशीं फार चलबिचल उडाली होती. ती चलबिचल जोत्याजीखेरीज कोणाच्याही ध्यानांत आली नाहीं. तुळशीनें त्या दिवशीं जोत्याजीस मादकविष घातलेलें अन्नाचें ताट वाढून दिलें; पण त्यास संशय आला ह्मणून तें अन्न न खातां तो फक्त पुष्कळ सुंगी आल्याचें मिष करून अंथरुणावर पडून राहिला.

रात्रीं जिकडे तिकडे सामसूम झाल्यावर आणि मध्यान्हरात्र उलटून गेल्यावर त्यांनीं हालचाल सुरू केली. सहा असामी रंगमहालाकडे जातांना दिसले. जोत्याजी जागा असल्यामुळें त्यानें हें पाहिलें. नंतर तुळशीनें रंगमहलाचें दार उघडून त्यांस आंत घेतलें खाचितच कांहीं तरी दगा असेल ह्मणून चटकन उठून तोही आंत गेला. झोंपीं गेलेल्या

संभाजीचा वध करण्याचा त्यांचा बेत दिसतांच त्यानें आरडाओरड करून संभाजीस जागें केलें आणि त्यांपैकीं तिघांस एकट्यानें यमसदनास पाठविलें. संभाजी सावध होऊन उठणार इतक्यांत एसाजीनें त्यावर एक वार केला. परंतु, चपळ संभाजीस तें कळतांच त्यानें मोठ्या शिताफीनें त्याचा वार चुकवून, त्याची तरवार हिसकावून घेतली व त्यास परलोकचा मार्ग दाखवला. या अवकाशांत बाकीची माणसें पळालीं. फक्त जोत्याजीनें एक मनुष्य अडकवून ठेविला होता. दुसऱ्या दिवशीं चौकशींत एसाजीचे अगर तुळशीचें त्यांत अंग असलेलें मुळींच बाहेर आलें नाहीं. ह्मणून राजानें त्याचा शिरच्छेद केला. जोत्याजीच्या झगण्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं. तुळशीनें आपल्या यशस्वी शस्त्रानें राजास पुन्हा आपल्या प्रेमपाशांत अडकवलें.

तरीही तुळशी निराश झाली नाहीं. तिनें आधीं जोत्याजीस नाहींसा करण्याचा विचार केला. संभाजीजवळ तिनें त्याची फार निंदा केली; पण त्याचाही कांहीं परिणाम झाला नाहीं. ती कांहीं दिवस स्वस्थ बसली व नंतर पुन्हा आपल्या उद्योगास लागली. त्या त्रिकुटाच्या पुन्हा मसलती सुरू झाल्या. संभाजी अगदीं बिनघोर असे. जोत्याजीस मात्र रात्रंदिवस चैन नसे. त्यानें नरमीं राजाची कानउघाडणी करावी; पण त्याचा कांहीं सुपरिणाम झाला नाहीं. किंचित् महाराजांचा रोष मात्र झाला. तुळशीस या जोत्याजीची फार भीति होती. हा आपले बेत कधींही यशस्वी होऊं देणार नाहीं अशी तिची पूर्ण खात्री झाली होती. म्हणून तिनें एक युक्ति योजिली. जोत्याजीस त्याची बायको मरणोन्मुख असल्याचें घरचें पत्र आलें. ह्मणून महाराजांनीं स्वत: त्यास लवकर जाऊन येण्यास सांगितलें; पण त्यास आपल्या मालकास अशा संकटांत सोडून जाणें प्रशस्त वाटेना. महाराजांचा तर जाण्याचा विशेषच आग्रह, त्यामुळें निरुपाय होऊन त्यास जावें लागलें.

जोत्याजीची आडकाठी दूर होतांच तुळशीनें आपला बार तयार करण्यास सुरुवात केली. खून करण्याचें काम तिनें स्वतः आपणावर घेतलें व दिवसही ठरवला. आणि त्या दिवशीं त्या दोघां खानांनीं येऊन दिवाणखान्यांत दडून बसावें व वधाचें काम तिच्यानें झालें नाहीं तर त्यांनीं तें पूर्ण करावें असा संकेत ठरला. कटवाल्यांची संख्या पूर्वीपेक्षां अधिक असल्यामुळें, आणि जोत्याजी तेथें हजर नसल्यामुळें हा बेत यशस्वी होईल अशी प्रत्येकास खात्री होती.

ठरल्यादिवशीं तिनें आपली सर्व तयारी केली. त्यादिवशीं तिच्या तोंडावर निर्वाणीचें धैर्य चमकूं लागलें होतें. तरी पण मधून मधून आपला बेत तडीस जाईल कीं नाहीं याची भीतीही दिसत होती. चेहऱ्यावरची टवटवी जाऊन तिची मुद्रा कावरीबावरी आणि भेसूर दिसत होती. तरी राजाच्या मनांत शंका येऊं नये म्हणून तिनें बरेंच उसनें अवसान आणिलें होतें. नेहमींप्रमाणें संभाजीची पूर्व रात्र आनंदांत गेली. मध्यरात्र होतांच ती ताडकन् उठून उभी राहिली आणि जंबियानें संभाजीच्या छातींत तिनें जोरानें वार केला. त्यासरशीं तो जागा होऊन धडपडून उठला पहातो तों ही त्राटिका अशा घोर स्वरूपानें उभी आहे असें त्याला दिसलें. त्यानें क्रोधानें तिला एक लाथ मारली. त्यासरशीं तिचें डोकें भिंतीवर आपटून ती मरण पावली. राजास जखम जबरच लागली असल्यामुळें तो तेथें मूर्छित पडला.

जोत्याजी घरीं गेला. पाहतो तों सर्व मंडळी खुशाल आहेत. यांत कांहीं तरी तुळशीचें कपट असावें असें वाटून त्याच पावली तो रायगडास परत आला. तपासांतीं ही सारी करामत तुळशीचीच आहे असें कळून आलें. तुळशीचा अंत झालेला पाहून त्यास समाधान वाटलें; पण इतर कांहीं गोष्टींमुळें त्यास पराकाष्ठेचें दुःख झालें. ती सारी हकीकत पुढें येणारच आहे.

मनुष्य प्रेमांध झाला ह्मणजे त्यास हिताहित सारखेंच भासतें. शत्रु कोण आणि मित्र कोण याची परीक्षा रहात नाहीं. आणि त्यामुळेंच अनेक संकटें आल्याचा इतिहास दाखला देत आहे. बाहेरून कोमळ दिसणाऱ्या, आपल्या हावभावांनीं जग मोहित करून टाकणाऱ्या, सौंदर्यानें थक्क करणाऱ्या, कवींस कदलीदलाप्रमाणें कोमळ तनु भासणाऱ्या, नवनीत कोमलांगीचें दुष्ट कृत्य इतकें भयंकर कोठेंच सांपडणार नाहीं. आश्चर्य आहे कीं, राज्यस्थापक श्रीशिवाजी महाराजांच्या खुद्द मुलावर असला प्रसंग यावा !

---

# प्रकरण ६ वें.

### पण शेवट गोड होईलना ?

मुरारराचांचा आणि रणधीररावांचा समेट झाला ही गोष्ट वाचकांच्या ध्यानांत असेलच. आणि विशेषतः त्यास एक रात्र रणधीररावांकडे घालवितां आली यामुळें तर स्नेह आपोआप दृढ होत चालला. त्यांनीं व तारेनें जेव्हां रणधीररावांस आपणांकडे रहाण्यास आग्रह केला तेव्हां त्यास ती विनंती नाकारवेना. शांत झालेल्या, आणि प्रेमबद्ध झालेल्या रणधीररावानें थोड्या आढ्यावेढ्या नंतर ती विनंति मान्य केली. तरी त्याचें मन तेथें जाण्यास कचरूं लागलें. आजपर्यंत आपले कट्टे वैरी ह्मणून ज्यांची प्रसिद्धी त्यांच्याशीं आपण असा उघड स्नेह करूं लागलों आणि त्यांचा पाहुणचार स्वीकारूं लागलों तर लोक काय ह्मणतील याची त्यास भीति वाटूं लागली. परंतु, एकदां रुकार देऊन आपला शब्द परत घेणें हें त्यास रुचलें नाहीं. मोठ्या जड अंतःकरणानें तो त्यांचेकडे गेला. या नवीन

स्नेह करण्यांत जरी मुरारराबांचा रणधीररावांच्या केलेल्या नुकसानीची अंशतः तरी भरपाई करण्याचा हेतू असला तरी आणखी एक कारण होतेंच. त्यांची मनोदेवता सांगत होती कीं, विश्वासरावाच्या चळवळीस यश येणार. आणि आपण जर हा शत्रुसंबंध कायम ठेवला तर पुढें आपली फजीती होईल. शिवाय त्यांची स्वतःची जरी या बेबंदशाहीतच चलती झाली होती तरी विचार करून पाहतां ही स्थिति लवकरच नाहींशी झाल्याखेरीज आतां घडगत नाहीं असें त्यांस अलीकडे वाटूं लागलें होतें. आपल्या रक्षणासाठीं विश्वासरावाचा प्रयत्न योग्य आहे असें त्यांचें मत असे. पण जोपर्यंत आपलें त्यांच्या भाच्याशीं वैर आहे तोंपर्यंत आपणांस त्यांच्या पक्षास मिळतां येणें शक्य नाहीं यासाठीं त्यांना रणधीररावांशीं लवकर स्नेह करणें फार जरूरीचें वाटलें.

बाहेरून जरी रणधीरराव मोकळेपणानें वागत होता तरी त्याच्या मनास समाधान नव्हतें. आपण ज्या शत्रूचा सूड उगवावयाचा पूर्ण निश्चय केला होता त्याचेच आपण पाहुणे होऊन मेजवान्या झोडींत आहों ही गोष्ट त्यास डंवचत असे; पण तारेची मूर्ती दृष्टीपुढें येतांच हे सारे प्रश्न मावळून जात. तेथून जाणें त्यास सुचेना. आणि मुराररावांचा आणि तारेचा थोडासा आग्रह झाला कीं पुरे; रणधीरराव पुन्हा पाहुणे बनलेच असे घडे. शिवाय मुरारराबांचें सध्याचें निष्कपट आणि प्रेमळ वर्तन पाहून त्यांस आपली कल्पना बरीच चुकली असावी असें वाटे. आणि त्यामुळें वाईट वाटून त्यांचा स्नेह जास्त दृढ करणें त्यासही आवश्यक वाटे. तरी लहानपणापासून ही मनांत रुजलेली कल्पना दूर होईना. अशा विलक्षण स्थितींत तो बरेच दिवस तेथें राहिला.

जास्त सहवासानें आणि पूर्ण परिचयानें त्यास तारेचे सद्गुण

नेहमीं नजरेस पडत. शिवाय तिचें आपणांवर प्रेम आहे हेंही त्यांस कळलें होतें. त्यामुळें त्याचीही तशीच स्थिति झाली. तरीही आपल्या बापाच्या दुःखाची आणि संकटाची आठवण बुजेना. तिची आठवण होतांच हा स्नेह, हें प्रेम सारें झुगारून द्यावें, या मायेस भुलूं नये असें त्यास वाटे; पण पुन्हा तो मायेनें मोहित होई. कदाचित् आपल्या आपत्तीस मुरारराव मुळींच कारणीभूत नसतील. फक्त गैरसमजानें आपल्या वडलांचा असा ग्रह झाला असेल तर आपणही तीच चूक कां करावी असें त्याला वाटे. पुन्हा त्यांसही असें वाटे कीं, आपण शत्रुत्व आणि मैत्री या दोन्ही गोष्टी विचारानें केल्या नाहींत. मैत्री अंतःकरणपूर्वक दृढ करावी तर शत्रुत्वाची कल्पना नाहींशी होईना. ती टाकावी तरी शत्रुत्वाबद्दल पूर्ण खात्री होईना. मनांतला शत्रुत्वभाव नष्ट झाल्याखेरीज तारेविषयीं प्रेमभाव आणि मुराररावांविषयीं आदरभाव धरणें अन्यायाचें वाटूं लागलें. आजपर्यंतचा संबंध व कायम ठेवावा कीं कांहीं दिवस स्नेही बनून पुन्हा वैर सुरू व्हावयाचें हें कांहीं कळेना. त्यास अशी ही संशयात्मक स्थिति फार दिवस ठेवणें बरें वाटेना. ह्मणून पक्का निश्चय करण्यासाठीं तो टेकडीवर एकांत अशा स्थळीं जाण्यास निघाला.

वाटेंत आंधळ्या गोसावणीचें ठिकाण लागल्यामुळें त्यास थोडावेळ तेथें जाऊन बसावें लागलें. मात्र तिला या नव्या स्नेहाची बातमी लागली होती. आणि तेव्हांपासून तिचेंही मन जरा अस्वस्थ झालें होतें. ज्या गृहस्थानें जाधवांचा समूळ नाश केला त्याच्याशीं रणधीरराव पुन्हा स्नेह करतो हें त्यांस लांछनास्पद आहे असें तिचें मत असे. अनायासेंच रणधीररावांची गांठ पडल्यामुळें तिनें त्याचें मन वळविण्याचा प्रयत्न केला. ती ह्मणाली. " रणधीरराव ! तुमच्या पूर्वजांची शत्रूची पूर्ण खोड जिरवणारे ह्मणून कीर्ति होती. आणि तोच अनुवंशिक बाणेदारपणा तुमच्यांतही असेल असा सर्वांचा समज होता; पण सध्यां

तुमच्यांत झालेल्या फरकानें सर्व लोक बुचकळ्यांत पडले आहेत. आपल्या शत्रूच्या घरीं पाहुणचार घेण्यांत तुह्मांस मुळींच दिक्कत वाटेनाशी झाली आहे आणि आज जवळ जवळ दोन आठवडे तुह्मी आपलें ठाणं तेथेंच दिलें आहे; असला हा अभिमानशून्यपणा जाधवांत उत्पन्न झाला कसा ? ”

“ बाई ! हा निव्वळ गैरसमज आहे. माझ्यांतला अभिमानही नष्ट झाला नाहीं. अथवा कट्टें वैरत्व बाळगण्यासारखें मुराररावांकडून कांहीं झालेंही नाहीं. संभाजीमहाराजांच्या कारकिर्दींत ज्या अनेकांवर विपत्ती आली आहे त्यापैकीं आह्मीही एक आहों. कर्मधर्म संयोगानें मुराररावास ही जहागीर दिली, एवढ्याच कारणानें जर त्यांस शत्रू ह्मणायचें असेल तर तें चुकीचें होईल. ” रणधीरराव ह्मणाले.

‘ सारें जगच फिरलें. त्याला काय इलाज. जाधव घराण्यापैकीं एका पुरुषाचे असले मवाळ उद्गार ऐकून सारे जाधव अपमानामुळें आपलीं तोंडें फिरवीत असतील. रणधीरराव, तुमचे हे उद्गार ऐकण्यापूर्वींच मला बधिरत्व आलें असतें तर किती बरें झालें असतें. मी त्यांस शत्रू मानून सूड घ्याच असें ह्मणत नाहीं; पण तुह्मी त्यांच्या उपकारा खालीं आपलेपणा गमावून घेऊं नका. हें माझें सांगणें आहे. मुराररावांनीं कदाचित् तुमच्या नाशासाठीं कांहीं खटपट केली नसेल, पण संताजीरावाच्या मृत्यूच्या वेळचा तो प्रकार काय होता? तो अगदीं स्नेहाचाच होता नव्हे ? तुमचें मन फार मोठें असेल. अपकार कर्त्यास उपकारानें मिंधें बनवायचें असला बाणा तुमचा असेल तरी हरकत नाहीं; पण तुह्मी आपला खानदानी बाणा घालवून उपयोगीं नाहीं. ’

“ बाई ! मला वस्तुस्थिति कळून येऊन मुराररराव माझ्या नाशाच्या बुडाशीं नाहीं अशी खात्री झाल्यावरच मीं त्यांच्याशीं स्नेह

करण्यास सुरुवात केली. आणि कोणाशीं स्नेह करणें जर तुमच्या मतें वाईट असेल तर माझा नाइलाज आहे. "

' रणवीरराव ! तुमची खात्री ह्मणजे काय ? दोन गोड शब्द वापरले कीं, झाली तुमची खात्री; पण ज्यास या पापी जगाचा जास्त अनुभव आहे त्या आह्मांस कोणाचेंही कपट ओळखण्यास मुळींच अडचण पडत नाहीं. आणि विशेषतः मुराररावांच्या प्रत्येक कृतीबद्दलचें मला पूर्ण ज्ञान असल्यामुळें त्यांची खरी किंमत माहित आहे. तुह्मी ह्या गोड थापांना भुलून आपला निश्चय लथाडून टाकलांत त्या थापांचा आमच्या मनावर मुळींच परिणाम होताना. त्याच्या मधुर भाषणानें तुह्मी भुलून गेला आहां व त्याचें ह्मणणें तुह्मांस अगदीं सत्य वाटलें आहे. पण याशिवाय तुमच्या स्थितींत फरक पडण्यास झाला अझून एक जबरदस्त कारण झालें आहे. तुह्मीं ताराबाईवर अनुरक्त आहां त्यामुळें आपल्या प्राणेश्वरीस ज्या गोष्टीनें दुःख ती गोष्ट तुमच्यानें होणें शक्य नाहीं. त्यासाठींच तुह्मीं आजपर्यंतचा अपमान विसरून स्नेह करण्याच्या भानगडींत पडला आहांत. ताराबाईसारख्या तरुण, सद्गुणी आणि पोक्त अशा स्त्रीवर तुमच्यासारख्यानें लुब्ध होणें संभवनीयच आहे. पण प्रेमाला मागचा पुढचा कांहीं विचार पाहिजे होता. परिस्थिती आणि संबंध हे लक्षांत घ्यायला पाहिजे होते. आजपर्यंत ज्या दोन घराण्यांमध्यें सतत वैर चालत आहे, त्या दोन घराण्यांतील तरुणांनीं परस्परांच्या प्रेमपाशांत आसक्त व्हावें ही अघटित विधिलीलाच होय. पण याचा शेवट कधींही सुखकारक होणार नाहीं. तुमचीच गोष्ट घ्याना. तुह्मीं जरी अभिमानशून्य होऊन ताराबाईचा स्वीकार करण्यास सिद्ध असलां तरी शत्रूच्या पोरास आपल्या पोटचा गोळा देण्यास बायजाबाई आणि मुरारराव कधींही तयार होणार नाहींत. कदाचित् मुरारराव होईल पण बायजाबाई कधींच तयार

होणार नाहीं. ती केसकर घराण्याची मुलगी असल्यामुळें आणि विशेषतः तिचा स्वतःचा अपमान जाधवांकडून झाल्यामुळें ज्या जाधवांचा नाश करण्याचा विडा तिनें उचलला आहे त्यांस अशा रीतीनें आपले आप्त करील हे संभवनीयच नाहीं. तिला स्वतःच्या हेक्यापुढें कोणाच्या सुखाची, नीतीची, अगर लाजलज्जेची मुळींच काळजी नाहीं. मग तुमचा हेतू तडीस जाणार तरी कसा ?'

" बाई ! तुमचें ह्मणणें जरी रास्त असलें तरी ज्या मूळ सिद्धांतावर तुमची ही कल्पना रचलेली आहे तो सिद्धांतच अगदीं चुकीचा आहे. मी तारेच्या प्रेमांत बद्ध झालों नाहीं किंवा तिलाही मजसाठीं वेड लागलें नाहीं. मीं तिचें रक्षण केलें ह्मणून कदाचित् ती मजशीं मोकळेंपणानें वागत असेल इतकेंच. शिवाय आम्हासारख्या निष्कांचन कफल्लकांवर अनुरक्त होणार तरी कोण ? "

" रणधीरराव ! तुह्मांस स्त्रियांच्या हृदयाची कल्पना नाहीं. अलीकडे तारेच्या वृत्तींत जो फरक झाला आहे, आणि जी चलबिचल झाली आहे ती सूक्ष्मपणानें पाहिली म्हणजे तिच्या हृदयाचें खरें स्वरूप कळून येणार आहे. अहो, प्रेम हें कांहीं बाह्य परिस्थितीवर, रूपावर आणि संपत्तीवर अवलंबून नाहीं. रुचिसाम्य आणि अभिरुचीवर अवलंबून आहे. तुह्मी किती जरी उडवाउडवी केली तरी तुमचा परस्परांचा प्रेमानुरक्तपणा आतां लपणार नाहीं. आणि मीं पूर्वींच सांगितलें आहे कीं, यांत तुह्मांस सुखाची आशा कमी आहे. तुह्मांस निरुत्साही करावें, दुःखी करावें या हेतूनें मी असें ह्मणतें असें नाहीं. या गोष्टी अगदीं उघड आहेत. आणि ह्मणून माझें आग्रहाचें सांगणें आहे कीं, तुह्मी ज्यास्त प्रेमबद्ध होऊं नका. एकदां तुह्मी आपल्या मनावरचा दाब जाऊं दिलात कीं, मग कांहीं केल्या पुन्हां तें तुमच्या तावडींत येणार नाहीं. तारेचा नाद

सोडा. तारा ह्मणून कोणी प्राणी या पृथ्वीवर आहे ही स्मृति नष्ट करा. कारण सध्याचा काळ तुमचें स्वतःचें सुख पहाण्याचा नव्हे. अशा स्थितींत रणधीरराव ! तुमच्यासारख्या वीरांनीं प्रेमाच्या भानगडींत पडणें सयुक्तिक नाहीं. तुमचें मामा सध्या ज्या कामांत गुंतलें आहेत त्यांस त्यांत मदत करणें तुमचें आद्यकर्तव्य आहे. विशेषतः सध्यां लोकांस असह्य त्रास होत आहे व त्या योगानें संभाजीमहाराजासंबंधानें लोकमत बिघडण्याचा बराच संभव आहे. यासाठीं तुह्मी राज्यांत शांतता राखण्याची खटपट करा. जेणेंकरून राज्य पुन्हां मजबुतीच्या पायावर उभें राहील असें काम करा. ह्मणजे तुमची कीर्ति होऊन तुह्मीं आपलें कर्तव्य बजावल्यासारखें होणार आहे. ”

त्यांना ह्मातारीचें ह्मणणें बरेंच सयुक्तिक वाटलें; पण हृदयांतून तारेची मूर्ती काढून टाकायची कल्पना मात्र रुचली नाहीं. तारेच्या सहवासाचें सुख आपणांस लवकरच अंतरावें लागणार या कल्पनेनें त्यांचें मन बरेंच दुःखित झालें. विषण्णमनानें फिरत असतांना त्यांचें लक्ष भोंवतालच्या सृष्टिसौंदर्याकडे वळलें नाहीं. आजपर्यंत सुखमय भासणारे पर्वत, गगनचुंबित वृक्ष, आणि सुंदर वनदेवता हीं अगदीं उदास भासूं लागलीं. ह्मातारीच्या प्रेमत्यागाविषयींच्या उपदेशामुळें त्यांचें तारेविषयींचें प्रेम द्विगुणीत झालें होतें. तिजवांचून आपलें जीवित नीरस होईल असें त्यांस वाटे. तरी सध्यां लोककार्यार्थ देह झिजवायचा जो प्रसंग आला आहे तो जाऊं द्यावयाचा नाहीं असा त्यानें निश्चय केला आणि नंतर व्यक्तिसुखाचा विचार करायचा असें ठरवलें.

नेहमींप्रमाणें तो मुरलीधराच्या देवळांत दर्शनास गेला. तों तेथें कोणी स्त्री आपल्या सुंदर गायनानें ईश्वराची स्तुति करीत असल्याचें त्यास दिसलें. आवाज ओळखीचाचसा वाटला. पण कोणाचा हें कांहीं निश्चित कळना. ती ताराच असावी असें त्यास वाटलें. एकांत-

भंग न व्हावा ह्मणून जरा अंतरावरून आडून तो तिचें बोलणें ऐकूं लागला. गाणें संपल्यावर ती उठून उभे राहून ह्मणाली, " परमेश्वरा, आज मी इतके दिवस तुझी प्रार्थना करीत आहे तरी तूं मला कांहींच मार्ग सुचवीत नाहींस. मला कांहींच सुचेनासें झालें आहे म्हणून मी तुला अशा विचित्र स्थितींत मदत करण्यास आळवीत आहे. संकटांत पडलेल्या दीनांचा तूं कैवारी ह्मणून तुझी ख्याती असतांना तूं मज-साठीं असा तटस्थ कां आहेस ? कदाचित् माझी योग्यता तुझ्या अनुग्रहास योग्य नसेल; पण परमेश्वरा, तुला हा भेदभाव कां असावा ? दुःखितांचें दुःख हरण हाच तुझा बाणा आहे. परमेश्वरा, तुलाही प्रेमाची कल्पना आहे. एकेकाळीं तूंही प्रेम केलेंस आणि एका हीन अबलेचे मनोरथ पूर्ण केलेस. तुह्मींही एकमेकांवर विरुद्ध परिस्थितींतच प्रेममग्न झालां होता. मग आह्मीं दोन मानव एक-मेकांवर अनुरक्त झालों तर त्यांत नवल काय ? जर ही गोष्ट परमे-श्वरास चुकली नाहीं तर ती मनुष्यास चुकेल कशी ? पण ही विरुद्ध-स्थिती परिस्थितीस आणि व्यक्तीस आहे. प्रेम असा भेदभाव जुमा-नीतच नाहीं. आपल्या सात्विक अनुरक्तेचा ओघ प्रेम आपणांशीं रूपगुणांनीं साम्य आणि अभिरुचीस मान्य अशा कसल्याही परिस्थि-तीच्या माणसांकडे वळवतें. पण ईश्वरा ! ही विरुद्ध परिस्थिती सृष्टि-कर्त्यानें प्रेमाच्या खऱ्या कसोटीसाठीं उत्पन्न केली आहे. त्यास न जुमानतां प्रेमाचा ओघ कायम राहिला, लोकांच्या दूषणांनीं नष्ट झाला नाहीं, प्रेमहेतू तडीस जाण्याचा विशेष संभव नसतांही दृढनिश्चय डळ-मळला नाहीं तरच तें खरें प्रेम. अशा स्थितीशीं झगडण्याचें सामर्थ्य प्रेमीमाणसास अवश्य पाहिजे. तें मागण्यासच मी तुला नेहमीं त्रास देत असते. परमेश्वरा, मी अशा स्थितींत जी मूर्ती हृदयांत सांठविली आहे, ज्यांस मीं आपलें तनमनधन अर्पण केलें आहे, आणि एकदां ज्यांना

पाति म्हटलें आहे, त्यांची मानससेवा आमरण मजकडून घडवण्याचें कार्य तडीस ने. रणधीरराव आजपासून या देशाचे स्वामी आहेत आणि मुरलीधरा, मी तुजसमक्ष अशी शपथ घेते कीं, त्यांच्याखेरीज इतर माणसें ला बंधूप्रमाणें होत. मीं याकामीं कदाचित् अविचार केला असें वाटत असेल तर तसें वाटूं देऊं नकोस. मीं हें काम पूर्ण विचारांतीं केलें आहे. मला या जगांत अशा स्थितींत मनोरथपूर्तीची आशा कमी आहे, तरी माझें मन त्यांजवर अनुरक्त झालें आहे. तें अशा निश्चयाखेरीज फार दिवस राहील तर व्यभिचार होईल, ह्मणूनच मीं हा निश्चय केला आहे. ही त्यांची सांपडलेली आंगठी ईश्वरा, तुज-समक्ष मी आपल्या बोटांत घालतें. आजपासून मी त्यांची पत्नी झालें आहे. मीं त्यांच्याशीं मानसविवाह केला आहे. कदाकाळीं त्यांची जरी या कामीं संमती न मिळाली व त्यांनीं माझा स्वीकारही केला नाहीं तरी ईश्वरा, माझ्या पत्नित्वास बाध येऊं देऊं नको. मी त्यांची मानस-पूजा करणार, मानससेवा करणार, त्यांची मूर्ती या हृदयांत सांठवणार, तिचें स्मरण करीत रहाणार; पण परमेश्वरा, हा माझा निश्चय तुझ्या भरंव-शावर आहे. माझें सध्यांचें धैर्य आणि निश्चय हीं तुझीच देणगी आहे. त्याची सारी लाज तुलाच आहे. " असें ह्मणून तिनें ती आंगठी बोटांत घातली. इकडे तारेच्या प्रत्येक शब्दानें रणधीररावाचे विचार आणि निश्चय दृढ होऊं लागले होते. तारेच्या प्रेमापुढें त्यांस सारें जग तुच्छ वाटूं लागलें. तिच्या निश्चयपूर्वक शपथेनें तर त्याच्या मनांत अशी खडबड उडून गेली कीं, ते भानरहित होऊन ताड्कन् उठून तिच्याजवळ आले. ते तिचा हात आपल्या हातांत घेऊन म्हणाले ' परमेश्वरा ! खऱ्या प्रेमाला आणि खरें प्रेम करणाऱ्याच्या योग्यतेला मोबदला देण्याचें काम आतां मजकडे उरलें आहे. तुझ्या प्रसादानें मजवर जी एक रूपगुणखनी प्रसन्न झाली आहे ती देवता मी नेहमीं संतुष्ट राखीन.

तिजविषयींच्या कर्तव्यांत मुळींच कसूर करणार नाहीं. मीही तुज-समक्ष अशी शपथ घेतों कीं, माझी प्राणेश्वरी– तारा – माझ्या देहाची जन्मभर स्वामीनी राहील. ' त्यांनीं आलिंगनोत्सुक बाहु एकमेकां-भोंवतीं पसरले. शब्दोच्चारणानें थकलेले ओष्ठ परस्परांच्या ओष्ठाशीं मीलन पावले. आनंदांत सर्वच शांत झालें; पण दोघांच्याही मनांत विचारांचा कल्लोळ माजला होता. शेवटीं तारा आपणांशींच म्हणाली "पण याचा शेवट गोड होईल ना. '

------

# प्रकरण ७ वें.

## पुन्हा बायजाबाई.

प्रेमासक्त तरुणांचीं मनें दिवसेंदिवस जास्त बद्ध होत चाललीं होतीं. एकमेकांशिवाय त्यांना प्रत्येक क्षण दुःखमय आणि कष्टप्रद भासत होता. जगाचा विशेष अनुभव नसल्यामुळें ते नेहमीं मनोराज्यांत गर्क असत. त्यामुळें आतां आपणांस खात्रीनें सुखप्राप्ती होणार अशा कल्पनेवर बायजाबाईच्या संमतीविषयीं ते नेहमीं बरेच बेफिकीर दिसत. तरी कधीं कधीं ही शंका दोघांच्याही मनांत उद्भवत असे. बायजाबाईचा स्वभाव पूर्ण ओळखीचा असल्यामुळें तिची या कामीं संमती मिळणें हें तारेस फार कठीण वाटे आणि अंधळ्या गोसावानें सुचवून ठेवलें असल्यामुळें या शंकेचें निवारण रणधीररावाच्यानेंही करवत नसे. तरी प्रेमओघ अशा जोरानें वहात होता कीं, तो अशा शुष्क आडकाठ्यांस न जुमानतां पुढेंच वहात होता. त्यामुळें त्यांनीं एकमेकास वचनांत गुंतवून घेतलें होतें. रणधीररावास तिच्या स्वभावाची पूर्ण ओळख नसल्यामुळें ती आपल्याला

लाडक्या मुलीच्या हट्टासाठीं, सुखासाठीं आणि आवडीसाठीं व्यक्तिविषयक द्वेष बाजूस ठेवून ह्या गोष्टीस अनुमती देईल असें वाटे. पण तारेच्या मनानें असें कधींच घेतलें नाहीं. ती आपल्या प्रियकराच्या सान्निध्यांत असो कीं, त्याच्या थोडावेळच्या विरहानें विरहिणी असो, अगर त्याच्या गुणावगुणाचे परिशीलनांत गर्क असो-प्रत्येकक्षणीं बायजाबाईची मूर्ति तिला भेवडावीत आहे असा भास होई. आपल्या या कृतीनें मातृप्रेमास—कदाचित् पितृप्रेमास देखील—मुकावें लागणार व त्यायोगें आपणांस भयंकर संकटें सोसावीं लागणार हें तिला पूर्णपणें माहित होतें. तरीही तिच्या मनावर ह्या संकटांचा बिलकूल ताबा नव्हता. ती प्रेमराजाचा बंदागुलाम बनली होती. तिच्या मनांत प्रेममय अशा तिच्या प्रियकराची मूर्ति स्थापली गेली होती. अशी ती प्रियकराची उपासना करणारी पतिव्रता बाह्य उपाधीस काय जुमानणार! तिनें स्वकर्तव्यांत कसूर न करण्याचा पक्का निश्चय केला. आप्तेष्टांचा राग, जननिंदा, मातृकोप हें सारें तिनें निंद्य मानलें आणि प्रियाराधनेंत ती मग्न झाली. बायजाबाईच्या नसण्यानें तिला आपलें व्रत बरेंच चालवतां आलें.

मुराररावासारख्या तीव्र नजरेच्या माणसाच्या लक्षांत या दोघांचा परस्पर अनुरक्तपणा केव्हांच आला होता. हा संबंध आपल्या पत्नीस बिलकुल रुचणार नाहीं अशी त्यांची मनोदेवता त्यांना सांगत होती. आपली याकामीं पूर्ण संमती असली तरी बायजाबाईच्या इच्छेपुढें आपला कांहीं इलाज चालणार नाहीं ह्मणून सध्या आपण मौनव्रत धरणें बरें असें त्यांना वाटलें; पण तारेची निवड, तिचें कायमचें सुख, हीच आपली खरी इच्छा तृप्त होण्याचें साधन, ह्या विचारानें त्यांच्या मनास बरेंच समाधान वाटलें.

बायजाबाईस तारेच्या लग्नाची काळजी नव्हती अशातला भाग

नव्हता; पण त्यासंबंधानेंही आपल्या राजकारणास जोर आणण्याचा तिचा हेतू होता. जेणेंकरून आपला पक्ष सबळ होईल तो मार्ग तिला संमत असे. ह्मणून तिनें कान्होजीराव या नांदाच्या संभाजीच्या पूर्ण प्रेमातल्या सरदारास आपली मुलगी देण्याचा विचार केला होता. त्यावेळचें कान्होजीरावाचें वजन, संपत्ती आणि दर्जा यांमुळें तिला त्याच्या उतरत्या वयाकडे विशेष लक्ष द्यावेंसें वाटलें नाहीं. शिवाय तिचा रणधीररावाविषयीं जो विचार सुरू होता तो त्याच्याच मध्यस्थीनें सफळ होण्याचीं चिन्हें दिसत असल्यामुळें त्यांच्या ऋणांतून अंशत: तरी उतराई व्हावें ह्या हेतूनें तिनें ही युक्ति योजली होती. स्वत: कान्होजीरावानें हीच मागणी केल्यामुळें तर बायजाबाई आनंदानें फुगून गेल्या. बायजाबाईची संमती मिळाल्यानें आतां लग्न कशाही स्थितींत होणार अशा खात्रीनें कान्होजीराव लग्नाच्या तयारीस लागले.

जगांत असा सर्वसाधारण नियम आहे कीं, कोणतीही गोष्ट फार दिवस गुप्त रहात नाहीं. रणधीररावाचा आणि तारेचा हा प्रेमानुबद्धपणा लवकरच बऱ्याच लोकांस कळला. जाधवांच्या अभिमानी लोकांस हा प्रकार फार अपमानास्पद वाटला. शत्रूच्या मुलीच्या प्रेमपाशांतून रणधीररावास सोडवण्याच्या मार्गास ते लागले. इकडे नव्या जहागीरदाराचे लोकांस असें वाटे कीं, जो काटा समूळ काढावा ह्मणून तिकडे बायजाबाई अविश्रांत श्रम करीत आहेत तोच त्यांचे यजमान त्याला सुरक्षित ठेवण्यासाठींच नव्हे—तर त्याला आपला कायमचा आप्त करण्याचे विचारांत आहेत. जहागिरदारांच्या या मूर्खपणापासून त्यांना परावृत्त करण्याचा त्यांचे हितेच्छु प्रयत्न करूं लागले; पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. तारेच्या मनांत रणधीररावाविषयीं भलत्याच कल्पना भरवून अविश्वास उत्पन्न करण्याची त्यांनीं पराकाष्ठा केली; पण त्यांतही यश आलें नाहीं. प्रेमाच्या प्रचंड प्रवाहापुढें अशा निर्बल

कुशंकांचा कांहीं परिणाम झाला नाहीं. रणधीररावांनीं आपलें हृदय मोकळें करतांच तो सारा शंकाव्यूह ढासळला आणि तारा पूर्ववत् प्रेममग्न झाली. त्यामुळें जहागिरदारांच्या लोकांची पूर्ण निराशा झाली. शेवटीं त्यांनीं निराळीच युक्ति योजली आणि ही सारी हकीकत बायजाबाईस कळविण्याचें ठरलें. तें काम प्रत्यक्षपणें करून मुराररावाची गैरमर्जी संपादण्यापेक्षां कान्होजीरावाच्या एखाद्या माणसाकडून हें काम घडवून आणण्याचा त्यांनीं इरादा केला आणि योजल्याप्रमाणें ही बातमी रायगडीं बायजाबाईचे कानीं गेली. या बातमीनें तिच्या अंगाचा अगदीं तिळपापड झाला. आपले सारे व्यूह यांच्या वेडगळपणामुळें ढासळले असते यामुळें तारेचा आणि मुराररावांचा त्यांस अतिशय राग आला. घाईघाईनें रणधीररावाच्या हद्दपारीचा हुकूम घेऊन त्या सिंधफळास जाण्यास निघाल्या.

बिचाऱ्या मुराररावांस या गोष्टीची वार्ताही नव्हती. विश्वासरावांस राजकारणांत मदत करून आपल्या इच्छेप्रमाणें तारेचें आणि रणधीररावाचें लग्न करण्याच्या विचारांत ते होते. विश्वासरावही लवकरच भेटीस येणार होते. त्यांच्या समक्ष सर्व गोष्टी ठरवून त्यांच्या हस्तें तारा आणि रणधीरराव यांचा विवाहही उरकून घ्यावयाचा होता. मग जरी बायजाबाई आली तरी हरकत नाहीं असें त्यांस वाटत होतें. आजपर्यंत तिच्या हेकड स्वभावामुळें प्रत्येक गोष्टींत स्वतः हार खाऊन वागण्याचा प्रसंग आला परंतु, आतां हे स्वमनास समाधान आणि शांती देणारें कृत्य बिनधोक उरकायचेंच असा त्यांचा कृतसंकल्प झाला होता. त्यांची ही मानसक्रांति होण्यास त्या आंधळ्या म्हातारीचे शब्द कारणीभूत झाले. तिचा प्रत्येक शब्द नव्हे प्रत्येक अक्षर त्यांच्या हृदयास शल्याप्रमाणें बोचत होतें. शिवाय जाधवांच्या द्वेषासंबंधानें पूर्वी आपल्या हातून घडलेल्या भयंकर कृत्यांची आठवण झाली म्हणजे

त्यांच्या अंगावर काटा उभा राही व सध्यांचा हा घडून येणारा सुयोग जमल्यास घडलेल्या पापाचें अंशतः तरी क्षालन होईल असें त्यांना वाटे. रणधीररावासंबंधानें अलीकडे त्यांचे स्वतःच्या मुलाप्रमाणें प्रेम जडलें व पश्चात्तापानें दग्ध झालेलें त्यांचें मन पूर्व वृत्तीवर आलें. त्यांच्या प्रत्येक कृतींत विनय दिसूं लागला. महाराजांची व अमात्यांचीं अमानुष कृत्यें आठवून आणि त्यांच्या अयोग्यवर्तनामुळें देशाचें झालेलें मातेरें त्यांच्या दृष्टीपुढें उभें राहून त्यांच्या मनाची केविलवाणी स्थिती झाली. त्यांची ही मानसिक स्थिती त्यांच्या वर्तनांत जागोजाग दिसूं लागलीं व त्यामुळें त्यांच्या पक्षांतील मंडळीस मुराररराव खास वेडे झाले असें वाटलें व ही बातमी थोड्याच वेळांत गांवभर पसरली. यामुळें मुराररावांच्या मनाची स्थिती तर फारच चमत्कारिक झाली व अशा विचित्र काळांत चांगले विचार वेडेपणाचे द्योतक झाले आहेत यांत विशेष आश्चर्य नाहीं असें समजून ते विश्वासरावास लागेल ती गुप्त मदत देण्यास सिद्ध झाले.

आज विश्वासराव सिंधफळास येणार ह्मणून जिकडे तिकडे व्यवस्था चालली होती. मुराररराव स्वतः पाहुणचाराच्या तयारीस गुंतले होते. नेमलेल्यावेळीं सर्व मंडळी मोठ्या उत्सुकतेनें त्यांच्या आगमनाची वाट पहात होती. विश्वासराव राजघराण्याचें आप्त ह्मणून त्यांना बराच मान मिळे. शौर्य, राजकारणपटुत्व व नीती यांमुळें त्यांचा लोकांवर बराच वचकही असे. मुराररावांनीं त्यांच्या दर्जास साजेशी त्यांची व्यवस्था ठेवली. त्यांची वाट पहात ते एका उंच बुरुजावर जाऊन बसले. तेथून लांबवर दृष्टी पोंचत होती. पूर्वेकडून आणि पश्चिमेकडून येणारे दोन रस्ते जेथें मिळत तें ठिकाण तेथून स्पष्ट दिसत होतें. सिंधफळास तेथून एकच रस्ता होता. विश्वासराव पूर्वेकडून येणार होते त्याप्रमाणें ते आले. पण इतक्यांत पश्चिमेकडूनही सुमारें पंचवीस

शिपायांसह एक मेणा मोठ्या तातडीनें येत असतांना दिसला. पाहुण्यांच्या येण्यानें सर्वांस आनंद झालाच. पण त्या दुसऱ्या अनपेक्षित मेण्यानें मात्र त्यांच्या उत्साहाचा विरस झाला. मुराररावाचा चेहरा काळाठिक्कर झाला. तारा तर ती स्थिती पाहून बेभान झाली. रणधीररावास मात्र त्याचा कांहींच अर्थ कळेना म्हणून तो मुराररावांबरोबर पाहुण्यांचें स्वागत करण्यास न जातां तारेस कांहीं विचारावें म्हणून मागेंच राहिला. तो चमत्कारिक मुद्रेनें तारेस म्हणाला—

‘ ताराबाई, नव्या पाहुण्यांच्या येण्यानें तुमच्या चेहऱ्यांत असा अकल्पित फरक कां पडला ? तो पाहुणा कोण ? ’

‘ ती माझी आई ! ’

‘ मग आईच्या येण्यानें चेहरा उदास कां व्हावा ? ’

‘ ती कर्मकहाणी आतां सांगून काय उपयोग ! ती बहुतेक आपणांस माहितच आहे. ’ डोळ्यांत आसवें आणून ती पुन्हा म्हणाली, ‘ झालें, आजपर्यंतचा आनंदवृक्ष आतां एकदम उन्मळून पडणार ! आजपर्यंत आपल्या गोड सहवासांत जो सुखाचा अनुभव घेतला तो यापुढें फक्त स्मृतींतच रहाणार ! आजपर्यंत मी आपणांस ‘ प्रिया ’ म्हटलें आपण मला ‘ प्रिये ’ म्हटलेंत, तें सारें आज संपलें. झालें सुख संपलें. दांपत्यसुखाचा अनुभव आपण फक्त कल्पनेंतच आणि शब्दांत घेतला तेवढाच संपला. प्रिया, नव्हे—रणधीरराव, यापुढें या अभागिनीस आपले चरण दिसणार नाहींत, सेवा घडणार नाहीं, कदाचित् माझ्या प्राणावरही बेतेल. रणधीरराव, माझें कांहीं बरें वाईट झालें तरी तुम्ही मला आपल्या आठवणींतून मात्र काढूं नका. प्रिया, मीं मनानें आपणाला पूर्ण वरलें आहे, मीं आपली पत्नी आहे आणि आपली पत्नी आहे तोंपर्यंतच माझें अस्तित्व या जगांत आहे. तुम्ही असें बावरल्यासारखे कां बरें दिसतां ! मी किती स्पष्ट बोलूं. आईस तुमचें येथें राहणेंच गोड वाटणार नाहीं, मग

माझें प्रेम कसें रुचेल. माझी ही स्थिती कळल्यावर माझा ती छळ करील, आपला अपमान करून मला आणखी पोळवील, नानाताप देईल ! प्रिया ! आतां सारें संपलेंच. आपली मूर्ती माझ्या हृदयांत राहील, तीच माझें रक्षण करील. '

"मग ! काय मी तुझ्यावर प्रेम करण्यास अयोग्य आहे ?"

"प्रिया ! पुन्हां हा प्रश्न का ? आपण अयोग्य आहां असें जर वाटतें तर माझें प्रेम कां जडतें ? बाबांनीं तुझांवर इतका विश्वास कां ठेविला असता ? पण सर्व सत्ताधारी आईसाहेबांस आपल्या द्वेषाखेरीज कांहीं दिसत नाहीं. तुमच्या वडलांनीं तिच्याशीं पूर्वीं लग्न केलें नाहीं हा जो तिचा अपमान झाला त्यामुळेंच तर तुझांस विपत्ती भोगावी लागत आहे. अशा स्थितींत काय होईल कळत नाहीं. प्रिया ! आतांपर्यंत मी केलेल्या स्वार्थाबद्दल क्षमा मागतें. आपलं प्रेम परिणामीं सुखकारक होणार नाहीं, अशी माझी मनोदेवता सांगत होती. परंतु, तसा प्रसंग येईपर्यंत तरी आपल्या सद्गुणांचा सहवास घडावा ह्मणून मीं आपणांवर उघडपणें प्रेम केलें. पण प्रिया ! आपण मात्र फसलांत."

इतक्यांत विश्वासराव वाड्यांत आल्याची वर्दी आल्यामुळें तारेस आणि रणधीररावांस तेथून जावें लागलें. बायजाबाईचें आपणांविषयींचें मत ऐकून रणधीररावांस बराच क्रोध आला. पण तारेचें निःसीम प्रेम, तिची दीन मुद्रा आणि तिचा निश्चय यामुळें त्या क्रोधाऐवजीं त्याला तारेची काळजी वाटूं लागली. विश्वासरावाची भेट घेऊन त्यानें आपला घोडा सज्ज करून ठेवला आणि तसा प्रसंग दिसतांच तेथून काढता पाय घ्यावा असा त्यानें निश्चय केला. बायजाबाईची स्वारीही आली. विश्वासराव, मुरारराव आणि रणधीरराव सामोरें गेले. पण त्या कोणाशीं न बोलतां संतप्तमुद्रेनें

रणधीररावांकडे एक तीव्र दृष्टी फेंकून तडक चालत्या झाल्या. मुरार-रावांस या अपमानाचा फार संताप आला. पण करणार काय ? शरीरांत जीव आहे तोंपर्यंत हा अपमान सहन करावा लागणार अशी निर्वाणीच्या कल्पनेनें तो तिच्या मागोमाग गेला. मुरारराव एकटेच सांपडतांच बायजाबाईनीं आतांपर्यंत दाबून ठेविलेला क्रोध मोकळा करून त्या संतापानें ह्मणाल्या, 'माझ्या पश्चात् आपण ज्या ज्या गोष्टी केल्या त्या कितीही खबरदारी घेतली तरी मला कळल्यावांचून राहिल्या नाहींत बरें कां ! तो मेला भिकारडा रणधीरराव घरीं आणून ठेविला आहे काय आणि त्याचे इतकें स्तोम तें काय माजवलें आहे. ह्मणे त्यास जांवईही करावयाचें आहे ! मनाची नाहीं जनाची तरी लाज बाळगायची. खाशी व्यवस्था. बापानें एखाद्या चोराला संभावीत म्हणून त्याची स्तुति गायची आणि मुलीनें त्यास माळ घालायची ! चोख व्यवहार ! त्यांत मेली इतकी लबाडी ती काय ? मला त्यांतलें एक अक्षर देखील कळूं दिलें नाहीं. नाहींच कळवणें व्हायचें. कारण मला कळल्यावर मी असले भिकार चाळे थोडेच चालूं देणार आहे. आणखी ह्मणे तो कोणी तोतया विश्वासराव आला आहे त्याचाही स्नेह संपादन करण्याचा बेत चालू आहे. कांहीं विचार तरी करावयाचा ! आपण मोठें झालों कसें. आणि आपला तोच मोठेपणा कायम ठेवावयाचा कसा ? दरबारांत वजन वाढवावयाचें कसें इकडे कांहीं लक्ष आहे कां ? मिळाली आहे फुकटची पोळी ! तिजवरच सारें औदार्य. पण ह्मणतातना कीं पोकळ मोठेपणा येऊन उपयोगीं नाहीं. तो अनुवंशिकही पाहिजे. आपणांसही हें सुख रुचेल कसें व पचेल कसें ! गप बसवेना ह्मणून त्या बंडखोराशीं स्नेह करावा किंवा नाहीं तो उद्योग करावा. मेली धडपड करावी कीं, ह्मातारपण सुखानें जावें, मिळालेली पोळी कायम रहावी, ह्मणून दर-

बारांत जाऊन प्रयत्न करायचा सुरू होतांच कांहींतरी वेडी वांकडी पत्रें पाठवून दुसऱ्याचा उत्साहभंग करावयाचा. रणधीरावाच्या दांडगेपणाबद्दल आणि बंडखोरपणाबद्दल शिक्षा देववायची खटपट करायला जावें, तों 'त्यांत त्याचा कांहीं अपराध नाहीं, लागलेली बातमी बहुतेक खोटी आहे.' असें लिहून दुसऱ्यास फजीत करायचें. हा आपला नेहमींचाच प्रकार. पण आपणांस असें सांगितलें कोणी? गप बसला असतां तर काय बिघडलें असतें. पण लक्षांत ठेवा मीं कोणत्या घराण्यांतील आहे तें. मीही पूर्ण तयारीनें आले आहे. बघूं बरें रणधीररावाचा आतां बचाव कसें करतां तें.'

'अशी रागावतेस कां? जरा शांतपणानें ऐकून घेशील तर मीं जें केलें तें योग्यच केलें अशी तुझीही खात्री होईल.'

'ते आपल्या दृष्टीनें असेल योग्य. ज्यांच्या योगानें तुह्मास पाटलाचे जहागीरदार बनतां आलें त्यांच्याशीं विश्वासघाताचें कृत्य अँ. शिवाय ज्या उदार महाराजांच्या कृपेनें आपणास दर्जा प्राप्त झाला त्यांच्या विरुद्ध चळवळीस तुमची संमती आणि अशा राजाच्या विरुद्ध चळवळ करण्याबद्दल तुमची फूस अँ. धन्य आहे तुमच्या नीचपणाची. शिवाय जगाची कांहीं तरी लाज. आपल्या तरुण मुलीस एका भिकारड्या तरुणाबरोबर बोलायला चालयला, हंसायला खिदळायला, सारीच मोकळीक. हीही गोष्ट मला कारण कळल्यावर योग्य वाटेल, असेंच ना.'

'अलबत्! रणधीररावासारख्या सभ्य आणि सद्गुणी तरुणावर अशा प्रकारचा विश्वास ठेवायला कांहीं हरकत नाहीं. शिवाय ज्या तरुणानें अगदीं निर्वाणीच्या प्रसंगीं वैरभाव विसरून माझें आणि तारेचें रक्षण केलें त्यांस घरीं आणून ठेविलें यांत कांहींच गैर केलें नाहीं.'

'रक्षण केलें एवढ्याच कारणावर जर त्यांस एवढा मान तर जर

उर्था एकाद्या मांग रक्षण करील तर त्यासही हाच मान देणार वाटतें.

‘ माझ्यानें हे शब्द ऐकवत नाहींत. तुला जर तो आवडत नसला तर तूं त्याशीं बोलूं नकोस. ’

‘ तें कां ? माझ्या घरांतून एखाद्या नीचाला हांकलून लावण्याची ताकद नाहीं ह्मणून कीं काय ? विश्वासराव आणि रणधीरराव हे दोघेंही आतांच्या आतां येथून निघाले पाहिजेत. ’

‘ पण आमंत्रित पाहुण्यांचा असा अपमान करणें शोभतें कां. एक दिवस दम धर ह्मणजे ते आपोआप जातीलच. ’

‘ छे. छे. असले बंडखोर लोक येथें क्षणभरही राहतां कामा नयेत. ’ असें ह्मणून महाराजांचा रणधीररावांस सिंधफळांतून हद्दपार केल्याचा हुकूम आणि विश्वासरावास सध्यां आपला पाहुणचार येथें शक्य नाहीं अशा अर्थाची चिठ्ठी तिनें मुराररावाजवळ दिली. मुाररावांनीं ती वाचून रागानें फेकिली; पण बायजाबाईनें चटकन् उचलून गड्याकडून ते दोन्हीं कागद खालीं पाठवून दिले. मुाररावास अनिवार संताप आला. ज्यास्त कांहीं करावें तर जगांत खाजगी गोष्टीचें प्रदर्शन होऊन फजिती होईल या भीतीनें त्यांनीं ज्यास्त कांहीं केलें नाहीं. फक्त तिला ते म्हणाले—

‘ विपत्तींत असल्यामुळें जे लोक मोठेपणा पावले नाहींत अशा लोकांचा अपमान करणें फक्त तुझ्या घराण्याच्या मोठेपणास साजत असेल तर गोष्ट निराळी ! जगांत कितीही कट्टा दुष्मन असला तरी त्याच्या विपत्तींत त्याचयाशीं सौम्यपणानें वागण्याची रीत आहे. पण आह्मांस या सभ्य चालीरीतींशीं काय करावयाचें आहे ? तुह्मी आपल्या तुटक्या फुटक्या वैभवांतच मस्त झालां आहांत. पण लक्षांत ठेवा हें तुमचे वैभव, व तुमचा बडेजाव अगदीं अविश्वसनीय आहे. चक्रनेमिक्रमाप्रमाणें या हालअपेष्टांचा अनुभव तुह्मां-

सही लवकरच घ्यावा लागेल. तुझ्या शहाणपणाला या गोष्टी साजत असतील आणि तुजकडून इतका अविचार होईल असें मुळींच वाटलें नव्हतें. पण अनुषंगिक अविचार, गर्व, वृथाभिमान, आणि बेगडी श्रीमंतीची ऐट यानें जी तू सुद्धां अंध झाली आहेस त्यास आळा घालणारा परमेश्वर समर्थ आहे.'

"इतकी नको कांहीं टीका करायला. आपला चांगुलपणा आणि सारासार विचार आपणांसच लखलाभ होवो. मला जें गोड दिसलें तें मीं केलें. पण गप बसा—तुमची शेंडी माझ्या हातांत आहे. खोट्या दस्ताची गोष्ट बाहेर काढली कीं मग कळेल सारें ?"

"पण दुष्टे ! तें सारें तुझ्याच साठीं ना ?"

"मग आतां मजसाठींच गप बसा !"

मुरारराव निरुत्तर होऊन रागानें निघून गेला. आणि बायजाबाई पाहुण्याबद्दलच्या हुकमाची अंमलबजावणी बरोबर झाली कीं नाहीं हें पाहण्यास गेल्या.

---

# प्रकरण ८ वें.

## महाराष्ट्राचें दुर्दैव.

दिवसें दिवस महाराष्ट्राची स्थिती अगदीं विचित्र होत चालली होती. संभाजीमहाराज ऐषारामांत ज्यास्त मग्न होत चालले होते आणि त्यामुळें राज्यकारभाराचा सारा बोजा कलुशावर पडला होता. त्याच्या मध्यस्थीखेरीज महाराजांची भेट होणें शक्यच नव्हतें. कलुषा स्वतःही व्यसनाधीन असल्यामुळें जिकडे तिकडे बेबंदशाही

माजली होती. शिवाजी महाराजांच्या वेळीं अगदीं जय्यत असलेलें सैन्य आतां बाजारबुणग्याच्या स्थितीस येऊन पोहोंचलें होतें. जुने आणि शूर सरदारांऐवजीं सैन्यांत खोगिरभरतीचे लोक जमले होते. त्यांची शिस्त नाहींशी झाली होती आणि संभाजी महाराजाखेरीज इतर कोणांस ते जुमानीतनासे झाले होते. खजीना अगदीं रिकामा झाला होता. राज्यांतला काळीचा वसूल वेळेवर येत नसे. अशाप्रकारें टंचाई झाल्यावर दिवाणजींनीं पैसे मिळविण्यासाठीं दुसऱ्या युक्त्या योजल्या. जमीनीवरचे कर वाढवले, नवीन कर बसवले तरी पैशाची तूट कांहीं भरेना. अनेक गांवें ओस पडलीं. अनेक किल्ले ताब्यांतून गेले तरी महाराजांचे आणि त्यांच्या दिवाणजीचे डोळे उघडले नाहींत. ते दोघेही ‘ आंगठीवरच्या खड्यासारखें राज्य ’ करण्यांत गुंतले होते. शत्रूशीं खरे सामने करण्याचे प्रसंग नाहींसे झाले होते. कारण ज्या कारणांनीं पूर्वीं लढण्याचे प्रसंग येत तीं कारणें आतां लढाईस अगदीं लंगडी वाटूं लागलीं. बंड करणें, खंडणी न देणें, किल्ले अगर गांव बळकावणें या कारणावरून आतां लढायांचा प्रसंग क्वचित्‌च येत असे. त्यामुळें संभाजीसारख्या मर्दास बाहुप्रभाव दाखवण्याचे प्रसंग मुळींच येत नसत. आपल्या बाहुबलशमनासाठीं शिकारीस जाणें, कुस्ती करणें, आणि प्रवाशांस लुटणें वगैरे साधनांचा त्यांना अवलंब करावा लागे. एकदां संभाजीमहाराज आपल्या पूर्वाश्रमीच्या खेळगड्यासह शिकारीस गेले असतां पन्हाळगडच्या बाजूनें म्हैसुराकडे जाणारी एक टोळी दिसली. सहज लीलेनें संभाजीमहाराजांनीं तिजवर हल्ला केला. दैवयोगानें त्यांस त्यांत एक तरुण स्त्री सांपडली. तिला किल्ल्यावर ठेऊन घेऊन बाकीच्यांस त्यांनीं जिवंत सोडून दिले. ती स्त्री शहाजादी रोषनार आहे असें कळतांच तर तिला न सोडण्याचा निश्चय अगदीं पक्का झाला.

शहाजादीला पन्हाळगडावर आल्यापासून अननुभूत असें स्वातंत्र्य

मिळालें होतें. जनानखान्यांतल्या कोंदट हवेपेक्षां आणि गजबजलेल्या दिल्लीपेक्षां तिला निसर्गदेवतेच्या प्रसादानें सुंदर आणि लावण्ययुक्त झालेली पन्हाळगडची वनशोभा, तेथील शुद्ध हवा ज्यास्त प्रिय वाटूं लागली. तिला या सौख्यापुढें आईबाप, सोयरे, राजसत्ता आणि राजदरबार हीं अगदीं तुच्छ वाटूं लागलीं. अशा स्थितींत संभाजीमहाराजांची आणि तिची प्रत्यक्ष भेटही होऊं लागली. नुकत्याच झालेल्या चकमकींत दिसलेल्या संभाजीच्या शौर्यानें ती चकित झाली असल्यामुळें, त्यांची साधी पण मनोहर अशी मूर्ती पाहतांच आणि त्यांच्या चातुर्यपूर्ण मधुरवाणीचें शब्दामृत श्रवण करतांच तिचें मन पाघळूं लागलें. एकांतांत विचारास पुष्कळ अवसर सांपडल्यामुळें तिला संभाजीखेरीज कांहींच सुचेनासें झालें. मराठ आणि मुसलमान हा भेद अगदीं नाहींसा झाला. संभाजीमहाराज दिसले नाहींत कीं, तिला हुरहुर लागे. शेवटीं तर ती त्यांच्यासाठीं अगदींच उल्लु बनली. इकडे विलासी महाराजांच्या मनांत अशाच विचारांचें काहूर माजलें होतें. या दोघांच्या मनांत जरी प्रेमकल्पनांचें पूर्ण प्राबल्य होतें तरी एकदम त्यांस प्रेम व्यक्त करतां येईना. धर्मकल्पना त्यांच्या या संबंधास आडवी येई. लग्न न करतां शहाजादीला आपल्या उपभोगार्थ बाळगावी असें महाराजांस वाटे. पण ती अवरंगजेबाची मुलगी, प्रेमानें कितीही उल्लू झाली असली तरी या अपमानास्पद स्थितींत राहण्यास मुळींच कबूल होणार नाहीं असें त्यास पक्कें वाटत असे. हातची शिकार जाऊं द्यावयाची नाहीं ह्या निश्चयामुळें ते जपूनच वागत असत. दिवसेंदिवस दोघांचेही मनोविकार ज्यास्त प्रबळ होऊं लागले. एके दिवशीं बोलतां बोलतां संभाषणाचा ओघ आला.

'शहाजादी ! आपण येथें आल्यापासून मलूलशा दिसतां? आपल्या चेहऱ्यावरील पहिला टवटवीतपणा अगदींच नष्ट झाला आहे. कद.-

चित् येथील जंगली हवा, रानटी माणसं, कदान्न, आणि मोकळेपणा या गोष्टी मोंगलांच्या जनानखान्यांत वाढलेल्यास मानवत नसतील; किंवा मजसारख्या रानटी माणसाच्या भाषणांत किंवा वर्तनांत कांहीं अप्रासंगिक अगर अपमानास्पद प्रकार झाला असेल ह्मणून आपणांस वाईट वाटत असेल.'

'छे! छे! महाराज, रानटी, अडाणी, वगैरे विशेषणें आपणांस लावण्यास कोण समर्थ आहे? आज ज्यांच्या सौजन्याबद्दल सारें जग अभिमान बाळगीत आहे, आणि ज्यांच्या सौजन्याचा मला प्रत्यक्ष अनुभव आहे त्यांच्याकडून अतिरेक होण्याचा संभव तरी कसा? आणि शहाजादी जनानखान्यांत जन्मलेली आणि तेथेंच वाढलेली ह्मणून तिला निव्वळ औपचारिक गोष्टींचीच आवड असेल असें आपणांस वाटते काय? शहरांतील लोकांच्या बाह्योपचारापेक्षां येथील रानवट ह्मणणाऱ्यांचा सरळपणा ज्यास्त महत्वाचा आहे.'

इतके तिनें मोठ्या धैर्यानें म्हटलें. शहाजादी असली तरी स्त्रियांची नैसर्गिक लज्जा आणि विनय हे यावेळेस आपली छाप बसवल्याखेरीज राहिले नाहींत. तशांत जनानखान्याच्या बंदिवासांत वाढलेली ती परपुरुषाशीं—एका राजाशीं—आणि तेही आपलें ज्याच्यावर प्रेम आहे अशाशीं बोलत असतांना एकदम लज्जित झाली यांत नवल तें कसलें? लज्जेनें ती अगदीं भांबावून गेली. तिच्या भालप्रदेशीं घर्मबिंदु मौक्तिकाप्रमाणें चमकूं लागले. तिचें मुख आरक्त झालें. तोंडांतून शब्दही निघेनासा झाला. आणि सलज्ज होऊन ती अधोवदन करून उभी राहिली. शहाजादींत हा फरक एकदम कां झाला हें संभाजीच्या लक्षांत आलें आणि तो म्हणाला.

"शहाजादी! शेवटीं मी तर्क केला होता तोच खरा ठरला अँ! निसर्ग—निर्मित सृष्टिशोभा ज्याठिकाणीं स्वतंत्रपणें वास करीत आहे,

जेथें हवा स्वेच्छेनें वहात आहे, ज्याठिकाणचें पाणी कृत्रिम उपायांनीं मर्यादित केलें गेलें नाहीं. त्याठिकाणीं तुमच्यासारख्या लावण्यमयीच्या नैसर्गिक प्रेम–स्फूर्तीला कसलाही अडथळा वाटूं नये आणि तो योग्य दिशेकडे सहजपणें वहात जावा यांत मुळींच आश्चर्य नाहीं. पण शहाजादी, जगांतली प्रत्येक गोष्ट दिसते तितकी सोपी नसते, त्यास अनेक अडथळे असतात हें आपण जाणतच असाल ! ”

“ होय, या कृत्रिम पण रूढीमुळें बलवत्तर झालेल्या अडथळ्यांनींच तर मला उद्विग्न केलें आहे. ” शहाजादी म्हणाली.

“ मग त्याला कांहीं उपाय योजिला आहे काय ? ”

“ उपाय काय ? उपाय पुष्कळ आहेत पण ते मान्य झाले पाहिजेतना ?”

“ शक्य असेल तर सांगा म्हणजे मीही विचार करीन. ”

“ उपाय आहेत, शक्यही आहेत. व एकेकाळीं होते; पण सध्याच्या विशिष्ट स्थितींत ते अशक्य झाले आहेत. त्यामुळें तर मला याची अगदींच निराशा वाटते आहे. ”

“ पण प्रेम नैसर्गिक आहे. या बाह्य उपाधी त्यास महत्त्वाच्या नाहींत. होय, पण रीतिरिवाज आणि रूढी हे निसर्गाच्या प्रवाहाबरोबर वहात नाहींत. प्रेमास नेहमीं रूढीकडेही लक्ष द्यावें लागतें. आणि ते नियम जर पाळले गेले तरच ते न्याय्य होय. ”

‘ मग करायचें तरी कसें ? ’

‘ याला सोपी युक्ति हीच आहे कीं, आपण मला विधिपूर्वक हिंदू तरी करून घ्यावें किंवा आपण मुसलमान तरी व्हावें. यावेरीज तिसरा उपायच नाहीं. माझा बाप कितीही कट्टा मुसलमान असला तरी आपल्या ह्या औदारिक धर्मांतराच्या प्रकारामुळें आपल्या विवाहास खात्रीनें संमती देईल. ’

‘ तुम्हांला तर हिंदु होतां येणें शक्यच नाहीं. मला स्वतःला कांहीं

धर्माचा प्रश्न नाहीं. मी मुसलमान झालोंही असतों, परंतु सध्याच्या कांहीं महत्त्वाच्या कारणांमुळें धर्मांतर कांहीं शक्य दिसत नाहीं. ह्मणून यास कांहीं निराळीच तोड केली पाहिजे. ' ते पुन्हां भीतभीत ह्मणाले ' मला वाटते कीं, या बाह्य विधीच्या भानगडींतच पडूं नये. या विधीखेरी-जच जर आपण एकत्र राहिलों तर त्यांत काय बिघडणार आहे ? खरें लग्न कांहीं बाह्योपचाराचें नव्हे. तो मनाचा प्रश्न आहे. मनानें जर आपला विवाह झाला आहे तर पुन्हां या विधीची अवश्यकता ती कोणती ? ' शहाजादी या वाक्यानें संतप्त झाली. चेहरा लालभडक झाला ? हातपाय कांपू लागले. शेवटीं ती ह्मणाली, " महाराज ! आपल्यासारख्या थोर माणसांकडून असले नीच विचार ऐकण्याची पाळी येईल असें मला मुळींच वाटलें नव्हतें. महाराष्ट्राचे राजे ह्मणून जरी आपला थोर मर्तबा असला तरी दिल्लीश्वराची कन्या या नात्यानें माझाही दर्जा कांहीं कमी नाहीं. प्रेम आंधळें असतें ही गोष्ट खरी. प्रिय माणसाच्या दोषाच्या राशीही दिसत नाहींत हीही गोष्ट खरी. पण कसल्याही स्थितींत खऱ्या कुलीन माणसास आपल्या शीलाचा विसर पडत नाहीं. त्यास आपल्या क्षणभंगुर सुखापेक्षां कुलाची इभ्रत ज्यास्त महत्वाची वाटते. तो मरेल पण आपलें शील जाऊं देणार नाहीं. महाराज ! काय आपणास माझ्या शीलाचा संशय पडला होता कीं, अशा वाक्यानें माझा कुलाभिमान जागृत करून मला संताप आणण्याचा प्रयत्न केलात. लक्षांत ठेवा, मीही शुद्ध बीजाची आहे. मला मरण पत्करेल; पण अशा अपमानास्पद स्थितींत जिवंत राहणें मुळींच नको आहे. महाराज, ही गोष्ट खरी कीं, मी आपणांवर फिदा झालें आहे. आपलें तनमनधन, आपला जीव, आपलें अस्तित्व, आणि आपलें सर्वस्व आपणांस अर्पण केलें आहे. पण ते आपणांस पति या नात्यानेंच केलें आहे. जोंप-र्यंत आपण रूढीप्रमाणें पति झाला नाहीं; जगांत आपण माझे पति

आणि मी आपली पत्नी हा संबंध न्याय्य आहे अशी कल्पना होणार नाहीं, तोंपर्यंत आपण मला परपुरुषच आहांत. पण संभाजीमहाराज, मी आपल्या बाह्य स्वरूपावर भुललें. मला काय माहित कीं, आपल्या बाह्य मोहकपणाच्या आंत असलें कालकूट भरलें आहे ह्मणून; पण या एका कारणावरून मी आपल्या निश्चयापासून ढळलें असें मात्र नाहीं. मी आपणांस मनानें वरिलें आहे. मला जगांतील इतर पुरुष बंधूसमान आहेत. जर न्याय्य आणि योग्य रीतीनें आपला व माझा विवाह झाला नाहीं; तर मी मरेपर्यंत अविवाहित राहीन. आपल्या नांवाचा जप करीन, झुरेन, मरेन; पण परपुरुषाशीं विवाह करणार नाहीं. आपणांस जर मी सुचविलेल्या मार्गानें माझा स्वीकार करायची इच्छा असली तर तसें स्पष्ट कळवावें. तसें न करतां जर मजशीं ज्यास्त संबंध ठेऊं इच्छाल तर ती इच्छा तृप्त होण्यापूर्वीं मी माझा पवित्र आत्मा स्वर्गीं पाठवीन, आणि त्यामुळें महाराष्ट्राचे राजे तरुण राजकन्यांचा बंदिवासांत अपमान करण्याइतके नीच आहेत अशी तुमची जगभर बदनामी होईल. '

महाराजास आपल्या भाषणाची शरम वाटली; पण युक्तीनें प्रसंग टाळावा ह्मणून ते ह्मणाले, ' शहाजादि, अशी रागावूं नकोस. मी तुझें सत्व पाहण्यासाठींच ती युक्ति मुद्दाम सुचवली. मी खरोखरीच अशी कल्पना बाळगणारा नीच नाहीं हें ध्यानांत ठेव. पण कोणतीही गोष्ट घाईनें करतां कामा नये. याचा पूर्ण विचार केला पाहिजे. एखादें काम विचारांतीं केलें असलें ह्मणजे पश्चात्ताप होण्याचा कमी संभव असतो. '

संभाजीच्या या आश्वासनानें रोषनार जरा शांत झाली होती. सुखाच्या निराशेची रात्र संपून आशासूर्य तिच्या हृत्प्रदेशावर प्रकाशमान होण्याच्या मार्गाला लागला होता. प्रेमासाठीं धर्मत्यागासही प्रवृत्त होणारा राजबिंडा खरोखर प्रेमास योग्य आहे असें तिला

वाटूं लागलें. कारण राजद्रष्ट्या महत्वाचा असा हा विवाह बापही मान्य करील असें तिला वाटूं लागलें होतें. अशाप्रकारें ती कल्पनानंदांत पोहूं लागली. विलासी पतीच्या सान्निध्यानें आणि अशा सुशोभित स्थलाच्या स्वातंत्र्यानें आपणांवर या जगांत प्रेमजन्यसुखाचा वर्षाव होईल असें तिला वाटूं लागलें.

दोघेही सुखाच्या कल्पनेंतच निमग्न झालीं आणि अशा प्रेमानें तल्लीन झालेल्या, बेभान झालेल्या स्थितींतच तीं दोघेंही आलिंगनानें परस्परांशीं निगडित झालीं. इतक्यांत गडावर कांहीं गडबड झाल्यामुळें संभाजीमहाराज सावध होऊन बाहेर आले व पाहतात तों शहाजादीच्या रक्षणार्थ आलेलें सैन्य गडाजवळ येऊन पोंचलें असून कांहीं लोकांचा किल्ल्यांत शिरकावहि झाला होता. गडावरचें सैन्य थोडेंच असल्यामुळें शत्रूशीं सामना करणें त्यास इष्ट वाटलें नाहीं म्हणून स्वतःच्या रक्षणार्थ ते एका चोरवाटेनें किल्ल्याच्या बाहेर पडले.

दैवयोग विचित्र ! परमेश्वरास त्याची सुटका गोड वाटली नाहीं म्हणून त्यासाठीं त्यानें निराळेंच जाळें पसरून ठेविलें होतें. तें स्वदेशी होतें विश्वासरावास ही सारी हकीकत कळल्यामुळें आतां खात्रीनें संभाजी मुसलमान होणार आणि मराठेशाही लय पावणार असें त्यांस वाटलें म्हणून प्रसंग पडल्यास आपण राज्याचें रक्षण करूं अशा निश्चयानें तो आपल्या सैन्यासह आला. आणि मोंगलांचे सैन्य गडाजवळ असलेलें ऐकून आपणही तेथेंच दबा धरून बसला. चोरवाटेनें जातांना संभाजी विश्वासरावास सांपडला आणि त्यानें त्यास रायगडावर कैदेंत ठेविलें.

सुमारें १५ दिवस तो कैदेंत होता. शहाजादीस ही सारी हकीगत कळल्यामुळें तिनें जवळच्या एका फकिराची राजाच्या रक्षणाच्या कामीं योजना केली. संभाजी आपल्या आपत्तीमुळें वैभव, सुख,

विलास, आणि विशेषत: शहाजादीचा सहवास हीं सारीं अंतरणार ह्मणून दु:ख करीत असतांना फकीर तेथें पोंचला. शहाजादीची खुणेची आंगठी त्यानें त्यास दिली. त्या खोलीच्या पश्चिमेच्याबाजूस जें विवर होतें त्या मार्गानें त्याची त्या फकीरानें सुटका केली. विश्वासरावाच्या लोकांस ही गोष्ट कळतांच त्यांना त्या फकीराचाच संशय आला. सारी झोपडी धुंडाळली पण संभाजी सांपडला नाहीं. फकीरास तेथें ज्यास्त वेळ राहूं देणें सुरक्षित वाटेना ह्मणून त्याची तेथून रवानगी केली. जातांना फक्त औरंगजेबाशीं युद्ध करण्याचा आणि मदतीस आपला भाऊ महमद् अकबर हा सिद्ध असल्याचा शहाजादीचा निरोप सांगितला. पूर्ण उत्साहयुक्त होऊन, आणि शहाजादीच्या खऱ्या प्रेमाची तारीफ करीत, व्यसनामुळें विपत्तींत पडलेला संभाजी राजा एकटाच भटकत निघाला.

---

# प्रकरण ९ वें.

## लग्नाचें ठरलें !

अशा प्रकारें रणधीररावांची आणि विश्वासरावांची उचलबांगडी केल्यावर बायजाबाईचा जीव जरा खालीं पडल्यासारखा झाला. विश्वासरावांस या अपमानाचा अतिशय क्रोध आला होता तरी तो प्रसंग नाजुक असल्यामुळें गप्प बसणें त्यांस इष्ट वाटलें. आपण मुद्दाम ज्या हेतूनें इतका लांबचा प्रवास केला तो हेतू पूर्ण होण्याचे ऐवजीं अपमान सहन करण्याची पाळी आली याचें त्यास फार वाईट वाटलें. परंतु रणधीररावासाठींच आपण आलों असें गृहीत धरून त्यास समाधान करून घेणें भाग पडलें. त्यादिवशीं रात्रभर सिंध-

फल्टांत मुक्काम करून दुसऱ्या दिवशीं सकाळीं ते रणधीररावासह रायगडास येण्यास निघाले. वाटेंत मोंगल सैन्याच्या हालचालीचें वर्तमान कळलें ह्मणून त्यांनीं मोठ्या तडाक्यानें तिकडे मोर्चा वळवला. आपल्या सैन्यास ते येऊन मिळाले व दैवयोगानें त्याच दिवशीं संभाजीमहाराज त्यांच्या हातांत सांपडले. नंतरची हकीकत वाचकांस गेल्या प्रकरणांत कळलीच आहे.

संभाजीमहाराज अशा प्रकारें एका मागून एकसारखे कैदेंत होते तरी त्यांस सोडवण्यास त्यांच्या कोणत्याही नव्या सरदारानें खटपट केली नाहीं. प्रत्येक जणास संभाजीच्या राज्यसमाप्तीची खात्री होऊन पुढच्या अमदानींत आपली पोळी पिकावी; निदान असलेली तरी कायम रहावी अशा हेतूनें तटस्थवृत्ती स्वीकारणें अगर तत्प्रीत्यर्थ खटपट करणें अवश्य वाटलें. परंतु सबंध महाराष्ट्रीयसमाज मात्र अशाच भावनेनें बेइमान झाला नव्हता. त्यांस संभाजीच्या व्यक्तीच्या राज्यापेक्षां महाराष्ट्राचें संरक्षण करणें ज्यास्त प्रिय होतें. थोरल्या महाराजांचें वर्तन, त्यांचा हेतू, त्यांची कल्पना, आणि त्यांचीं थोर कृत्यें डोळ्यासमोर स्पष्टपणें दिसत होतीं. श्रीसमर्थ रामदासांचा उपदेश त्यांच्या कानांतून अगदींच नाहींसा झाला नव्हता. संभाजीच्या कारागृहाची बातमी त्याच्या जुलमास कंटाळलेल्या लोकांस कळतांच मोठ्या शौर्यानें आणि अभिमानानें महाराष्ट्राच्या रक्षणासाठीं ते पुढें सरसावले. विश्वासरावाच्या कार्यास या अशा नव्या प्रवृत्तीनें फार जोर आला. आपले अंगीकृत कार्य खात्रीनें तडीस जाणार असें त्यांस वाटूं लागलें.

संभाजीमहाराज आणि कलुशा दिवाणजी हे दोघेही यवनांच्या तडाक्यांत सांपडले होते. शहाजादीच्या कृपेनें त्यांचीही सुटका झाली होती. संभाजीस परत रायगडावर येऊन आपले सर्व सरदार गोळा करणें शक्य नव्हतें. आपले सर्व नवे सरदार गुप्त झालेले

पाहून तर त्यास फार आश्चर्य वाटलें. ज्या नव्या सरदारासाठीं आपण जुन्या लोकांस आणि राष्ट्राची इमारत मजबूत करण्यांत ज्यांचें रक्त आटलें त्यांचा अपमान केला, नानाप्रकारें छळणा केली तें सारें नवें सरदार मंडळ ऐनप्रसंगीं आपणांस सोडून चालतें झालें याचें त्यांस फार वाईट वाटलें. जुन्या सरदारांचीं सैन्यें एका मागून एक जमा होत आहेत आणि मोंगलांशीं सामना करून आपलें राज्य कायम ठेवण्याचा त्यांचा दृढ निश्चय झाला आहे अशी बातमी ऐकून त्यास फार आनंद झाला. पण त्यांस जाऊन मिळण्याचें त्यांस सुचेना. आजपर्यंत ज्यांची फजीती केली त्यांचें सहाय्य मागण्यापेक्षां शत्रूच्या बंदिवासांत हालअपेष्टा सहन करून मरणें त्यांस गोड वाटूं लागलें. त्याच्या डोळ्यांत आतां पूर्ण अंजन पडलें होतें आजपर्यंत केलेलीं घोर कृत्यें, मूर्खपणाचें वर्तन, अन्याय, आणि अनीती हीं सारी त्याच्या डोळ्यासमोर चमकूं लागलीं. ज्या मूर्ख लोकांच्या सहवासानें आपण इहपर घालवलें, पर्वजांचा लौकिक गमावला, आपल्या नांवास कलंक लाविला, मराठेवीरांस बट्टा आगला त्यांची नुसती कल्पना सुद्धां त्यास वेडी करूं लागली. कलुशादि ज्या मंडळीच्या सल्यानें आपण प्रत्यक्ष आपल्या सावत्र आईचा क्रूरपणानें आणि अपमानानें वध करवला त्यांचे दृष्टीस पडणें देखील त्यास सहन करवेना. आपल्या अघोर कृत्यांचा पूर्ण पश्चात्ताप झाला, शरम वाटली, पण आतां त्याचा काय उपयोग ? विश्वासरावाच्या पक्षास आतां मदत मागायची नाहीं असा त्यानें पूर्ण निश्चय केला. आपण अशा थोर आणि पवित्र ठिकाणीं असण्यास आपण अगदींच नालायख आहोंत असें त्यास वाटूं लागलें. त्यामुळें महाराष्ट्राचें राज्य आपणापेक्षां कोणातरी योग्य पुरुषास मिळणें फार चांगलें असें त्यास वाटलें. संभाजीच्या अशा शोकमय स्थितींत कलुशा खेरीज

विश्वासू चाकर त्याच्या जवळ कोणीच नव्हता. कलुशा व्यसनी असो कीं मूर्ख असो मेपर्यंत संभाजीची साथ त्यानें सोडली नाहीं. संभाजीच्या मनोवृत्तीमध्यें असा फरक झालेला पाहून त्यासही बरेंच वाईट वाटे, पण कांहीं इलाज नव्हता. विश्वासरावाकडे जाण्याची कलुशाची सूचना संभाजीस मान्य होईना. तो मरण्यास अगदीं सिद्ध झाला होता. अशा अघोर कृत्यानंतर हा आत्मा ज्यास्त दिवस पृथ्वीवर राहण्यास योग्य नाहीं असें त्याच्या मनानें घेतलें होतें. निरुपाय होऊन तो संभाजीच्या रक्षणार्थ त्याचे मागोमाग फिरत असे. अपमान सहन करूनही इतराप्रमाणें संकटांत आपल्या मालकांस न सोडतां एकनिष्ठपणें सेवा करण्यास तो तत्पर असे

इकडे मुरारराबाची स्थितीही फारच विलक्षण झाली होती. आपण ज्या सद्गुणी माणसास प्रेमानें बोलाविलें होतें. व ज्या थोर सरदारास पाहुणचार स्वीकारण्यासाठीं अत्याग्रहपूर्वक आमंत्रण केलें होतें त्याचा प्रत्यक्ष आपल्या पत्नीनें आपल्या मर्जीविरुद्ध अपमान करावा यानें त्याचे पित्त भडकलें होतें. शिवाय रणधीररावाच्या वियोगानें त्यास तर मुळींच करमेनासें झालें होतें. विशेषतः आपण मुद्दाम उत्तेजन दिल्यामुळें प्रेमबद्ध झालेल्या आपल्या तरुण मुलीच्या दुःखी कल्पनेनें त्यांचें हृदय दुभंग होऊन जात असे. बायजाबाईच्या बेफाम वर्तनालाही ते अगदीं कंटाळून गेले होते. आतां आपला विनाशकाल खात्रीनें जवळ आला असें त्यांस वाटूं लागलें होतें. याखेरीज महाराष्ट्राचीं संकटेंहीं त्याच्या दुःखांत भर पाडीत. आपण अशा प्रसंगीं गादीसाठीं मरून देहाचें सार्थक तरी करावें असा विचार करून विश्वासरावाच्या पक्षास जाऊन मिळावें असें त्यानें ठरवलें. पण बायजाबाई या कामीं संमती देईनांत. दुःखातिशयामुळें आणि असह्य पारतंत्र्यामुळें मुरारराव अगदीं वेडे होऊन गेले होते. त्यांचें मन नेहमीं उदास

असे. त्यांस घरांत राहणें मुळींच सुखावह वाटेना ह्मणून त्यांनीं आपली नेहमींची बैठक त्या ह्मातारीच्या झोपडींतच ठेवली आणि ते आपला सारा दिवस ईश्वरभजनांत घालवूं लागले.

बायजाबाईस यामुळें तर पूर्ण स्वातंत्र्य प्राप्त झालें. तिनें लग्नाची तयारी सुरू केली. आणि लवकरच तारा व कान्होजीराव यांचा विवाह होण्याचें नक्की ठरलें.

रणधीरराव जरी राष्ट्रकार्यांत गुंतला होता आणि तारेच्या आईनें त्याचा अपमान केला होता तरी तारा त्याच्या हृदयांतून हलेना. तिची मूर्ती त्याच्या डोळ्यासमोर नेहमीं असे. त्यामुळें या प्रश्नाचा स्पष्ट निकाल करण्यासाठीं त्यानें मुराररावास एक आणि तारेस एक अशीं दोन पत्रें लिहिलीं. मुराररावाच्या पत्राचें उत्तर आलें, पण तें बायजाबाईनीं लिहिलें होतें. त्यांत त्यांनीं आपला आणि जाधवघराण्याचा द्वेष कां सुरू झाला व तो कशाप्रकारें कृतींत उतरला वगैरे गोष्टींचा खुलासा करून, तारेशीं विवाह करण्याच्या कल्पनेच्या धाष्ट्र्याबद्दल तिनें त्यांची बरीच कानउघाडणी करून ती गोष्ट कसल्याही स्थितींत संभवनीय नाहीं असें तिनें स्पष्ट लिहिलें होतें. तारेचें पत्र मात्र जरा उशीरानें आलें. तें येण्यापूर्वीं तो बराच अधीर झाला होता. कदाचित् बायजाबाईच्या जाचामुळें तिला आपलें प्रेम नाहींसें करावें लागलें असेल किंवा स्त्रियांच्या क्षणिक अनुकंपेच्या रीतीस अनुसरून प्रेम नष्ट झालें असावें आणि आपल्या सान्निध्यांत प्रवाहित असणारा प्रेमनिर्झर सान्निध्याभावीं सुकला असेल व प्रेम नष्ट झालें असेल अशी कल्पना करून निराश होऊन बसला होता. इतक्यांत तिचें पत्र आलें. व त्यांस हुशारीही आली.

" प्राणनाथ !

आपल्या पत्रानें प्रेमोवदन पुन्हा टवटवीत दिसूं लागलें. निराशा-

मय भासणारें जगत् सुखकारक भासूं लागलें. उदास वाटणारा जीव उत्साहपूर्ण झाला. पण प्रिया ! आपले मनोरथ पूर्ण होणार कसे ? आपल्या वियोगानंतर मानसिक उद्विग्नतेला शारिरिक त्रासांची जोड मिळूं लागली. ज्या वाड्यामध्यें एकदां मला स्वतंत्रपणें फिरतां येत होतें तेथेंच आतां बंदिवान् व्हावें लागलें आहे. कदाचित् मी पळून जाईन अगर प्राणत्याग करीन ह्मणून मला बाहेर जाण्याची सक्त मनाई आहे. माझ्या प्रत्येक कृतीवर नजर ठेवण्यासाठीं सक्त पाहरेही आहेत. त्यामुळें प्रत्येक काम बऱ्याच खबरदारीनें करावें लागतें. आपलें हें पत्र सुदैवानें येऊन पोंचलें व त्याचें उत्तरही तशाच गौप्यानें पाठवतां आलें. पण सध्यां पाहरे ज्यास्त कडक झाले असल्यामुळें या युक्त्या सफळ होणें संभवनीय नाहीं. पत्र मला न पोचतां आपलें गुपित मात्र आईसाहेबांस कळलें.

सध्यां बाबांची स्थिती फार शोचनीय झाली आहे. माझा बंदिवास आणि त्रास, आपला वियोग, आईसाहेबांची सत्ता आणि त्यांचें स्वतःचें पारतंत्र्य यामुळें तर ते बहुतेक वेडे झाले आहेत. त्यांस घरीं एक क्षण देखील राहवत नाहीं. ते नेहमीं आंधळ्या ह्मातारीच्या झोपडीकडेच असतात. आईसाहेबांस हा त्यांचा बावळटपणा रुचत नाहीं ही गोष्ट खरी. पण सध्यां त्यांच्या कार्यव्याप्तत्वामुळें इकडे लक्ष देतां येत नाहीं. फक्त जर वेडाचीं चिन्हें ज्यास्त दिसलीं तर त्यासाठीं एक मजबूत अंधारकोठडी तयार झाल्याचें ऐकिवांत आहे. दुर्दैवाची कमाल झाली ! मला ज्यांचा आधार आणि या संकटांतून मुक्त होण्यास ज्यांच्या सहाय्याची आशा त्यांचीच निराशेनें आणि दुःखातिशयानें जर अशी स्थिती झाली, तर मला आतां सुखाची आशा कुठली !

पण प्राणनाथ ! ही सारी प्रेमाची कसोटी आहे. हा प्रसंग

इतरांच्या दृष्टीनें कष्टमय असेल, पण यानें माझें प्रेम कसोटीला लागत असल्यामुळें मला ज्यास्त प्रिय वाटत आहे. ही पृथ्वीवरील मानवी प्रेमाची कसोटी आहे. यांतच यशस्वी झाल्यास ईश्वरी प्रेमाला देखील मी योग्य आहे असें सिद्ध होईल. आतां मला या जगांत सुखाची अणुभर देखील आशा नाहीं. परमेश्वरास हेंच रुचत असलें पाहिजे. आपली भेट होणें, आपला विवाह होऊन सुख लाभणें यागोष्टी कल्पनामयच आहेत. पण एकदां ज्यांस मीं तनमनधन आणि सर्वस्व अर्पण केलें आहे, ज्यांस मीं मनानें वरिलें आहे आणि ज्यांच्या अस्तित्वांत मीं आपलें अस्तित्व देखील विसरून गेलें आहे, त्या माझ्या हृदयमंदिरांतल्या स्वामीस दूर करण्याची कोणाची छाती आहे. माईसाहेबांचा बळजबरीनें लग्न लावण्याचा घाट दिसत आहे. पण माझें आतां लग्न लागेल तरी कसें ? माझें व आपलें लग्न पूर्वींच मुरलीधरासमोर लागलें आहे. मी तर आपली धर्मपत्नी आहे. पण अशा ईश्वरासमक्ष झालेल्या लग्नाची या जगास काय किंमत ? त्यांस त्यांच्या पापी डोळ्यासमोर लागलेल्या पापप्रवृत्तिपर लग्नाचीच विशेष किंमत आहे. पण माझी मनोदेवता सांगतें कीं, परमेश्वर अशा प्रसंगीं माझ्या सहाय्यास येईल आणि हा पतिव्रतेचा देह जुलमानें परपुरुष-स्पर्शानें कलंकित होण्यापूर्वींच निष्कलंक राखण्यास मला कांहीं युक्ती सुचवील. शिवाय माझे बोलते चालते परमेश्वर तर मुळींच मला टाकणार नाहींत. त्यांस असल्या प्रसंगीं कसलेंही कार्य टाकून दासीची सुटका करण्यास आलें पाहिजे. तसा प्रसंग येतांच मी पत्र अगर आंगठी पाठवीन.

कान्होजीरावानीं मजसाठीं मागणी केली आहे. माई-साहेबांनींही अनुमती दिली आहे. भ्रमिष्ट झालेल्या बाबांस तर इक-इचें मुळींच भान नाहींसें झालें आहे. कधीं कधीं मी त्यांच्या दृष्टीस

पडलें ह्मणजे ते रडतात, डोळे पुसतात, आणि दुःखानें निघून जातात. कालच ते भेटले होते ते मोठ्या दुःखित अंतःकरणानें ह्मणाले, " तारे, तुझा खरा वैरी मी आहें. आपलें सामर्थ्य न ओळखून तुला ज्या योग्य तरुणावर प्रेम करण्यास उत्तेजन दिलें त्याचा असा अपमान, आणि वियोग झाला तरी माझ्यानें कांहींच करवलें नाहीं. तारे ! यापुढेंही माझ्यानें कांहींच करवलें जाणार नाहीं. मी तुझा बाप असून नसून सारखाच आहे. मी मृतच झालों आहे. अशा परस्वाधीनतेपेक्षां मरण काय वाईट ? तारे, मी तुझी किती क्षमा मागूं ! बाळ ! या पापी आत्म्यास आपल्या कृतीचा जो पश्चात्ताप होत आहे त्यांत हें कृत्य तर फारच डंवचतें आहे तूं क्षमा कर ह्मणजे मी सुखानें मरेन " यामुळें माझी स्थितीही विलक्षण झाली आहे; पण बाहेर कुणी आलें वाटतें. ज्यास्त काय लिहूं.

पवित्र चरणांची दासी—
" तारा. "

हें पत्र वाचतांच रणधीररावाच्या शरीरावर रोमांच उभे राहिले. शुद्ध प्रेमरसानुभवानें अंतःकरण सद्गदित झालें सात्विक प्रेमाच्या वर्षावानें शरीर आणि मन शांत झालें. तो निस्तब्ध होऊन प्रेमसागरांत अवगाहन करूं लागला. त्यास कांहींच सुचेनासें झालें. शेवटीं, ' तारे! तूं धन्य आहेस. तुझ्या शुद्ध आचरणानें, खऱ्या प्रेमानें, स्वतःचें कुळ धन्य केलेस आणि मला आपल्या सद्गुणांचा दास बनवलेस. द्रव्यहीन, गुणहीन आणि आधारहीन अशावर विरुद्ध स्थितींत अचल प्रेम हा दैविक अनुग्रहच होय. ' असें ह्मणून तो तारेस कसें सोडवितां येईल याचा विचार करूं लागला. बराच वेळ कांहीं सुचलें नाहीं. शेवटीं विश्वासरावानें कांहीं कामासाठीं हांक मारली ह्मणून त्यास हे विचार टाकून जाणें भाग पडलें.

लग्नास फक्त दहा दिवस राहिले होते. कान्होजीरावाकडची मंडळी हळुहळु येऊं लागली होती. तारेची स्पष्ट अनुमती अद्याप मिळाली नव्हती. बायजाबाईनें त्यासाठीं अनेक युक्त्यांची योजना केली होती. तिला ज्यास्त जाच केला, रणधीररावासंबंधीं खोट्या कंड्या पिकवल्या आणि शेवटीं तो मेला अशीही बातमी पसरवली. या योगानें तारेचें मन भांबावून गेलें. खरें काय आणि खोटें काय हें अगदींच कळेनासें झालें. आपल्या विश्वासाचा, जिव्हाळ्याचा कोणींच दिसेना. या बातम्यांवर विश्वासही बसेना आणि खात्रीलायक बातमीही कळेना. एकेदिवशीं भावी पतिराजांचे आप्त वगैरे मंडळीसमोर होणारी रणधीररावांची निंदा तिला अगदींच असह्य झाली. बायजाबाईनेंही या विवाहास संमती देण्यास तिला निक्षून सांगितलें. तारा कांहींच बोलली नाहीं. तिच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें ती गप्प बसली; पण तिच्या चेहऱ्यावर निश्चयाची छटा मात्र पूर्णपणें दिसत होती. शेवटीं बायजाबाई ह्मणाल्या, ' तारे ! तुजसारख्या समंजस आणि विचारी मुलीस आपलें हिताहित कशांत आहे हें सांगण्याची अवश्यकता नाहीं. तरी स्वतःच्या आवडीबरोबर इतर कांहीं गोष्टींचा विचार करणें जरूर असतें. त्यापुढें तूं जें करशील तें विचारानेंच करशील. कौटुंबिक सुखास साह्यभूत होईल, दहा लोकांत बरें दिसेल आणि आईबापांस मान्य होईल असेंच करशील अशी मला पूर्ण खात्री आहे. ह्मणूनच मीं कान्होजीरावांस वचन दिलें आहे. '

' पण आईबाप या दोघांस जर निरनिराळ्या गोष्टी संमत असतील तर मग कसें करायचें ? ' तारा ह्मणाली. मुराररावास या प्रश्नानें जरा आनंद झालासा दिसला. ह्मणून तारेनें आपलें भाषण सुरू केलें, ' आपली आज्ञा मला वंद्य आहे. आपणांस ज्या गोष्टी सुचतील त्या करणें हें माझें कर्तव्य आहे. पण मी सध्यां वचनांत गुंतलें आहे त

देखील बाबांच्या अप्रत्यक्ष संमतीनेंच. प्राण बचावल्यामुळें रणधीररावांचें ऋण फेडण्यास ते अगदीं अधीर झाले होते. निकट सहवासानें त्यांचे सद्गुण ज्यास्त निदर्शनास आले होते. अशा तरुणावर मी प्रेम केलें असेल आणि वचनांत गुंतलें असेन तर वावगें काय? परस्परांचा वैरभाव असे पर्यंत ही गोष्ट जर मी करत्यें तर मात्र क्षम्य होतीना. आतां जरी आपली आज्ञा अमान्य करणें योग्य नाहीं तरी वचनभंग करणें हें तरी सभ्यतेस उचित आहे काय? अशा उभय संकटांत सध्यां मीं पडलें आहे. ह्मणून माझी अशी विनंती आहे कीं, ज्यास मीं आपलें सर्वस्व अर्पण केलें आहे त्यांचीच सेवा आजन्म घडूं द्या. माझ्या सुखासाठीं, माझ्या सत्व रक्षणासाठीं आणि माझ्या पातिव्रत्यासाठीं तरी आपण रणधीररावांशीं लग्न करण्यास संमती द्या. या शिवाय दुसरी युक्तीच नाहीं.'

'तारे! माझा नाइलाज आहे.' मुरारराव ह्मणाले. पण बायजाबाईचे जोरावें वक्तृत्व सुरू झाल्यामुळें बिचाऱ्या मुराररावास माघार घ्यावी लागली. बायजाबाई ह्मणाल्या—

'पण अशा मूर्ख आणि आत्मघातकी कृत्यास कोण संमती देईल? तिकडचा स्वभाव जास्त भिडस्त असल्यामुळें आणि अलीकडे तर साठाजवळ वय गेल्यामुळें जे चाळे सुरू आहेत, त्यामुळें तुला अशा कामीं संमती मिळेल. पण अद्याप माझी विचारशक्ती नष्ट झाली नाहीं. माझी याकामीं कधींच अनुकूलता मिळणार नाहीं. आणि हें काम पूर्ण होणारही नाहीं. तुला वचनभंग केलाच पाहिजे.'

"आईसाहेब, तें तर शक्यच नाहीं. आपली याकांमीं संमती मिळणार नाहीं आणि माझें प्रेम विफळ होणार हें मला माहीत नव्हतें असें नाहीं. प्रेम करतांना आणि वचन देतांना या गोष्टी

माझ्या लक्षांत नव्हत्या असें नव्हे. परंतु, या क्षुल्लक कारणासाठीं प्रेमाचा ओघ बदलत नसतो. कदाचित् या जन्मीं आपण हा प्रसंग येऊं देणार नाहीं; पण नेहमींच कांहीं मी आपल्या तडाक्यांत सांपडेन अशांतला भाग नाहीं. ईश्वरी इच्छा असली तर पुढल्या-जन्मीं हें प्रेम फलद्रायी होईल.'

बायजाबाईस तारेच्या दुःखातिशयानें बेफाम झालेल्या या उद्गारानें संताप आला नाहीं असें नाहीं. पण प्रसंग पाहून त्या गप्प राहिल्या. इतक्यांत कान्होजीराव ह्मणाले, 'वचनभंग व्हावयाचा राहिला आहे थोडाच. परवांच्या लढाईत त्यांस एक मोगलसैन्यांतील सरदाराची मुलगी सांपडली आणि तिच्याशीं त्याचें लग्नही झालें असें माझ्या एका स्नेह्यानें लिहिलें आहे.' त्यांनीं तें पत्र तारेच्या हातीं दिलें. पत्र वाचतांच तिचें मन जरासें साशंक झालें. तिला त्या पत्रांतली बातमी खोटी असावी असें वाटलें. आजपर्यंत रणधीररावांसंबंधीं ज्या खोटया कंड्या पिकल्या होत्या त्यापैकींच हाही प्रयत्न असेल असें तिला वाटूं लागलें. तरी या बातमींत अगदींच तथ्यांश नसेल, हें पत्र सपशेल खोटें असेल, बनावट असेल असेंही वाटेना!

तारेच्या सांगण्यावरूनच बरेच दिवसांत रणधीररावांनीं पत्र लिहिलें नव्हतें तरी या विकारवशतेमुळें आणि संशयामुळें तारेस रणधीर-रावांचें मौन वृत्तिपालटामुळें आणि प्रेम नष्ट झाल्यामुळेंच असेल असें वाटूं लागलें. अथवा लढाईच्या गर्दीमुळें त्यांस फावलें नसेल असेंही तिला वाटलें.

रणधीररावांनीं वचनभंग केला अशीही पण खात्री होईना. ह्मणून संशयनिवृत्ती करण्यासाठीं आणि खरें काय तें कळवून घेण्यासाठीं तिनें निराळीच युक्ती योजिली. गुप्तपणें रणधीररावांस पत्र पाठवणें शक्य नव्हतें आणि त्यांचें पत्र तिला पोचणेंही संभवनीय नव्हतें ह्मणून

तिनें अशी अट घातली कीं, जर रणधीरराव आपण होऊन वचनांतून मला मुक्त केल्याचें तोंडी किंवा लेखी कबूल करतील तर मात्र आपण लग्न करायचें किंवा कसें याचा विचार करूं. बायजाबाईस या अटीनें तर अत्यानंद झाला. त्यांनीं संमती दिली. कान्होजीरावासही हा सरळ मार्ग पसंत पडला आणि तारेनें त्यांना एक पत्र लिहिलें.

" रणधीरराव !

कांहीं बातम्यामुळें माझें मन आपल्या प्रेमाविषयीं साशंक झालें आहे. माझ्या लग्नाची तिथी माईसाहेबांनीं ठरवलीही आहे. भावीपतिराज वगैरे मंडळी आली आहेत. आपलें मजवर पूर्ववत् प्रेम असेल तर येत्या सोमवारीं सकाळीं येऊन भेटावें ह्मणजे ठरलेलें लग्न होणार नाहीं. प्रेम नष्ट झालें असल्यास आणि दुसऱ्या ठिकाणीं प्रेमबद्ध झालां असल्यास तसदी घेण्याचें कारण नाहीं. परमेश्वर तसें न करो.

वचनभंग करूं न इच्छिणारी दासी

तारा "

कान्होजीरावांस हा मसुदा अगदीं पसंत पडला. फक्त पूर्वी ' प्राणनाथ या शब्दाचे ऐवजीं ' रणधीरराव ' हा शब्द घालण्यास त्यांनीं सांगितलें. बायजाबाईस ' वचनभंग करूं न इच्छिणारी ' हे शब्द नकोसें वाटलें. पण कान्होजीरावास ते काढण्याची विशेष अवश्यकता भासली नाहीं. आणि शिवाय तारेनें असें ह्मटलें कीं, ' खरोखरींच जर रणधीररावांनीं वचन मोडलें आहे तर आपण तें पाप आपल्याकडे कां घ्या. अनायासें तोच वचनांतून मोकळे करील आणि आपलें सत्वही कायम राहील. ' कान्होजीरावांस हें कारण फार मानवलें. त्यामुळें बायजाबाईनीं मोठ्या कष्टानें तें पत्र मान्य केलें. पण मनांत कान्होजीरावाच्या मूर्खपणाचा संताप आला. तारेनें मोठ्या युक्तीनें त्याच शब्दांत आपला मनोदय त्यास कळवला ही खुबी तिला कळली. पण ' प्राण-

नाथ ' हा शब्द काढून टाकल्यानें शब्दाची खुबी रणधीररावाच्या डोक्यांत येणार नाहीं असें वाटलें. शिवाय एकदम निकरावर येऊन आजन्म लग्न न करण्याचा निश्चय करणारी मुलगी एकदम या पत्रानें पालटली हें पाहून जो आनंद झाला होता त्या आनंदाच्या भरांत तें पत्र पाठवण्यांत आलें.

हें पत्र पाठवलें गेल्यानें तारेसही बराच आनंद झाला. आपल्या संदिग्ध भाषणानें माईसाहेबांसही आनंद झाला हें पाहून तर आपल्या चातुर्याची तिला तारीफ वाटूं लागली. हें पत्र पाहतांच पूर्वी ठरल्याप्रमाणें रणधीरराव खात्रीनें सहाय्यार्थ येतील. ते आले म्हणजे मग हा लग्नाचा प्रश्नही नाहींसा होईल, अशा रीतीनें आपणास सुख होईल असें तिला वाटूं लागलें. परमेश्वरानें आपणावर आतां कृपेची नजर फेंकली असावी म्हणूनच बायजाबाईचें या अटीस अनुमोदन मिळालें आणि ही अट मान्य करणें म्हणजे यश आल्यास तिची रणधीररावाशीं लग्न करण्यास संमतीच होय असें तिला वाटलें व हा सबंध दिवस सुखांत गेला.

------

# प्रकरण १० वें.

## शेवटीं असें झालेंन ?

लग्नास थोड्या दिवसांचाच अवकाश होता तेव्हां रणधीररावांस पत्र लिहिण्यांत आलें व पाठवण्यांतही आलें; हें गेल्या प्रकरणीं सांगितलेंच आहे. जसजसा काळ लोटत गेला तसतसा कान्होजीरावाच्या मित्राच्या पत्रानें तारेच्या मनांत उद्भवलेला अल्पकाळचा संशय आतां अगदीं नष्ट होत चालला होता. रणधीररावाच्या प्रेमचिन्हाच्या आंगठीच्या

दर्शनानें ही शंका पार दूर झाली होती. तिच्या डोळयासमोर रणधीररावाची मनोहर मूर्ती दिसूं लागली. तिच्या हृदयांतील प्रेमज्योत प्रज्वालित झाली. खरा सात्विकप्रेमाचा मूर्तिमंत पुतळा अशा रणधीररावाविषयीं आपल्या मनांत कशी शंका उत्पन्न झाली याचेंच आश्चर्य तिला वाटूं लागलें. तिला रणधीररावाच्या प्रेमाविषयीं पूर्ण खात्री वाटूं लागली. आपलें पत्र पोंचून कशाही स्थितींत रणधीरराव येतील अशा कल्पनेनें तिचें मन आनंदित होऊं लागलें. इतके दिवस निराश, विरही, निस्तेज आणि कलाहीन झालेला तिचा चेहरा जरा टवटवींत दिसूं लागला.

इतकें झालें तरी रणधीररावाची निर्भर्त्सना कांहीं कमी होईना. तारेचें संदिग्ध बोलणें इतरांस जरी कळलें नव्हतें तरी त्यांतली खुबी बायजाबाईच्या लक्षांत आल्यावांचून राहिली नाहीं. ह्मणून तिनें तारेला ईरेस पाडून कान्होजीरावाशीं लग्न लावण्यास कबूल करण्याचा प्रयत्न सुरू केला. एक दोन दिवसांनीं तिच्या मनाप्रमाणें घडूनही आलें. पूर्ण विचारांतीं रणधीररावाशीं वचनभंग केला नाहीं अशी खात्री झाल्यामुळें आणि आपलें पत्र पोंचतांच रणधीरराव क्षणाचाही विलंब न करतां येतील असा पूर्ण भरंवसा असल्यामुळें लग्नाचे दिवशीं संध्याकाळीं चार वाजेपर्यंत ते स्वतः अगर त्यांचें पत्र जर आलें नाहीं तर त्यांनीं आपणांस वचनांतून मोकळें केलें आहे असें समजून कान्होजीरावांशीं लग्न लावण्यास आपण तयार आहों असें तारेनें आवेशांत आणि प्रियकरनिंदेच्या संतापात ह्मणून टाकिलें. तारा काय बोलत होती हें तिला चांगलें कळतही होतें. एखादवेळेस आनंद तर एखादवेळेस दुःख या मनोविकारांचे छटे एकामागून एक तिच्या चेहऱ्यांत दिसत होते. तिच्या चेहऱ्यावर तिच्या मनोविकाराची छाया पसरली होती. तिच्या मनांत आनंद कां दुःख काय भरलें होतें हें कळत नव्हतें; पण दृढनिश्चयाची झांक मात्र पूर्ण दिसत होती.

लग्नाचे दिवस जसजसे जवळ येऊं लागले तसतसे आपण व्यर्थ पण लाविला असें तिला वाटूं लागलें. तारेच्या मनोवृत्तींत अशा प्रकारचा फरक पाहिला म्हणजे मात्र बायजाबाईस अत्यानंद होत असे. तिला आपल्या मुलीच्या मनस्तापाचें कांहीं विशेष वाटेना. फक्त आपली युक्ती सफल झाली याच आनंदांत ती मग्न होती. तिला तारेची शाब्दिक संमती हवी होती ती मिळाली. तिला आतां दुसऱ्या कशाचीही अवश्यकता नव्हती. हा जबरीचा विवाह परिणामीं दोघांसही सुखकारक होईल कीं नाहीं इकडे तिचें लक्ष नव्हतें. तिच्या मतें विवाहास प्रेमाची अवश्यकता पाहिजेच असें नव्हतें. तिनें स्वतः तरी मुरारराववर कुठें प्रेम केलें होतें. पण तिला प्रापंचिक सौख्याला आणि दांपत्यसुखाला काय कमी पडलें होतें ! अशा विचारानें बायजाबाई हा विवाह करण्यास तारेनें सक्तीची संमती दिली कीं मनःपूर्वक संमती दिली इकडे लक्ष देईनात. तारेची देखील त्यांत विशेष चूक झाली नव्हती. पत्र पोंचण्यास जरी एक दिवस उशीर लागला तरी लग्नाचे दिवशीं रणधीररावांस येतां येईल अशी तिची अटकळ होती. त्यामुळें लग्नाचे दिवस जसजसे जवळ येऊं लागले तसतसे तिचें मन शंका आणि खात्री, आशा आणि निराशा, सुख व दुःख या द्वंद्वांमध्यें हेलकावे खाऊं लागलें.

लग्नास एकच दिवस उरला होता. आतां तर तिचें मन ज्यास्त साशंक होऊं लागलें. तिकडचें प्रेम नष्ट झालें असेल असेंही वाटूं लागलें. पण ती कल्पना फार वेळ टिकेना. लढाईंत त्यांस कांहीं बरेंवाईट झालें असेल. अगर फार महत्वाच्या अशा कामगिरींत ते गुंतले असतील असें वाटें. नानाप्रकारच्या शंकांनीं तिच्या मनांत काहूर माजवलें तिला सर्व जग उदास भासूं लागलें. रात्र सारी अशाच अस्वस्थतेंत गेली.

लग्नाचा शुभ ( ? ) दिवस उगवला. त्या दिवशीं तर सकाळपासून तिचे डोळे वाटेकडे लागले होते. रणधीरराव आतां येतील किंवा गडी पत्र घेऊन तरी येईल अशा भावनेनें त्या वाटेकडील वाऱ्यानें उडणारे धुळीचे लोट तिच्या मनांत आशा उत्पन्न करीत. पण लवकरच शंका निवृत्ती होई व मन निराश होत असे. मनांत अनेक कल्पना उद्भवत. जसजसा उशीर होत असे तसतसें निराशेचें साम्राज्य तिच्या मनास ज्यास्त विस्तार पावत असे. दोन प्रहर झाला तरी रणधीररावांच्या येण्याची तिला आशा उरली नाहीं. त्यामुळें तिला अतिशय दुःख झालें. आपल्या प्रेमाचा अशा निराशामय शोकपर्यवसायीं परिणाम व्हावा असा ईश्वरी संकेतच असावा असें तिला वाटूं लागलें. दुःखातिशयानें ती अगदीं वेडी झाली. बऱ्याच दिवसांपासून रात्रभर पापणीलापापणी लागत नव्हती. सारी रात्र तिनें जागून काढावी. तिला जेवायचें भान नसे. कपड्यांचें भान नसे. तिला सारें जग मृतवत भासूं लागलें होतें. अलीकडे २-४ दिवसांपासून तर तिनें जवळ जवळ अन्न वर्ज्य केलें होतें. त्यामुळें तिचा चेहरा निस्तेज झाला होता, डोळे खोल गेले होते आणि अप्सरांसही लाजवणाऱ्या मुखचंद्रास ग्रहण लागल्यासारखे दिसत होतें.

लग्नघटका अगदीं जवळ येऊन ठेपली तरी रणधीररावाचा पत्ता नाहीं. थोड्याशा हालचालीनें कोणाच्या येण्याचा आभास होऊन बिचारी तारा हजारदां खिडकीपर्यंत गेली असेल आणि अनेकदां निराश झाली असेल. सारा दिवस तिच्या डोळ्याचें पाणी खळलें नाहीं. पण बऱ्याच आक्रोशानंतर–दुःखानंतर—परमेश्वराच्या स्तुतीनंतर, नवसांनंतर जसजशी लग्नाची वेळ जवळ येऊं लागली होती तसतसें तिचें दुःख बाह्यस्वरूपांत लोकांस दृग्गोचर होईनासें झालें. तें अंतर्याम जाळीत होतें. तरी त्यास आपलें असें विनाकारण प्रदर्शन

करणें बरें वाटेना ह्मणून त्यानें दिखाऊपणा टाकिला होता. या अशा फरकानें तारेच्या हालचालीवर नजर ठेवणाऱ्या मंडळीस फार आनंद झाला. त्यांनीं ही सुवार्ता बायजाबाईस कळवण्यास मुळींच आळस केला नाहीं. हें शुभ वर्तमान लवकरच गांवभर पसरलं. बायजाबाई ह्मणाल्या " हें असं व्हायचंच. रडून रडून मला भेवडावयाचा तिचा हेतू होता. पण जेव्हां तिचें रडण्याचें सामर्थ्य थकलें आणि मी तिच्या कृत्यास संमती देणार नाहीं हें स्पष्ट कळलें तेव्हां तिचें उसनें अवसान नष्ट झालें. "

लवकरच बायजाबाई वधूस मंगलस्नान घालण्यासाठीं बोलावूं आल्या आणि तारेस ह्मणाल्या, ' ताराबाई ! पाहिलें ना रणधीररावाचें प्रेम, मेल्यानें उगीचच तुला वेड लावलें आणि शेवटीं असा गळा कापला. पण आह्मां अनुभवी माणसांना या साऱ्या युक्त्या माहित ह्मणूनच मी तुला नको ह्मणत होतें. बरें झालें इतक्यावरच निभलें. आतां यापुढें हें वेड टाकून दे आणि सुखानें संसार कर ! '

" आई, तुझें हृदयच तसें कोमल. साऱ्या जगाच्या कल्याणाविषयीं जर तुला इतकी धडपड करावी लागते तर तूं प्रत्यक्ष पोटच्या गोळ्यासाठीं आणि तिच्या सुखासाठीं जर इतके श्रम केले असशील तर त्यांत नवल काय ? मला आतांपर्यंत तुझ्या कोमल मनाची किंमत कळली नव्हती. पण आतां झालें तें झालें मी तुझ्या आज्ञेबाहेर मुळींच नाहीं. तूं जें ह्मणशील तें करण्यास मी अगदीं सिद्ध आहें. पण आई यासाठीं रणधीररावांची निंदा हवी कशाला ? त्यांचा नीचपणा, किंवा चांगुलपणा घेऊन आपणांस काय करायचें आहे. ? माणसास जोंपर्यंत सुखाची आशा असते तोंपर्यंतच त्यास साऱ्या जगाची भीड. आतां मजवर चोहोंकडून आकाश फाटलें आहे. सुखाची सारी आशा अगदीं नष्ट झाली आहे. मग स्पष्ट तरी कां बोलूं नये ? परमे-

श्वरास माझ्या सुखाच्या आशेची निराशा करण्यांतच जर भूषण वाटत असलें आणि त्यास तीच गोष्ट रुचत असली तर त्यास माझा काय इलाज ! आतां मी वाटेल तें करायला सिद्ध आहे. या प्रेमाचा मला या जन्मीं जरी मोबादला मिळाला नाहीं तरी तो खात्रीनें विफळ होणार नाहीं. माझ्या प्रेमांत कांहीं उणीव असेल ह्मणूनच ते फलदायक होणें परमेश्वरास रुचलें नसावें. आई ! आतां माझ्या लग्नाचे ह्मणून जे कांहीं सोहळे करायचे असतील ते तूं खुशाल कर. संपत्तीचें वाटेल तितकें प्रदर्शन कर. आपली हौस पुरवून घे. तुला ज्या ज्या गोष्टींनीं आपल्या डोळ्यांचें पारणें फेडायचें असेल आणि समाधान मानून घ्यावयाचें असेल त्या त्या गोष्टी कर. कांहींच बाकी ठेऊं नकोस. मला परमेश्वर जसें ठेवील तसें राहिलें पाहिजे आणि जें करायास लावील तें केलें पाहिजे. ”

‘ जे करायला लावील तें केलें पाहिजे. ’ हे शब्द जरा जोरानें तिनें उच्चारिले. तरी त्याचा रोख कोणाच्याही लक्षांत आला नाहीं. तें वाक्य बरेंच अर्थपूर्ण असलें पाहिजे असा बायजाबाईचा तर्क होता; पण त्या घाईच्या वेळीं तिला त्याचा ज्यास्त विचार करण्यास फावलें नाहीं. तिनें फक्त तारेस चलण्यास सांगितलें आणि ताराही मुळींच उशीर न करतां निघाली. इतर मंडळीस याचा बराच आचंबा वाटला. कान्होजीरावांस तर अत्यानंद झाला. लग्नाची सर्व तयारी झाली. वधुवरांचीं मंगलस्नानें झालीं आणि हिंदुधर्माच्या पद्धतीवर विवाहास प्रारंभ झाला. वैदिक मंडळींचे मंत्र चालूं झाले. जिकडे तिकडे एक प्रकारची गंभीर प्रसन्नता पसरली.

घाईमुळें आणि महाराष्ट्राच्या तत्कालीन परिस्थितीमुळें बायजाबाईस या समारंभास विशेष भपकेदार करतां आलें नाहीं. फक्त निवडक आप्तइष्ट व सोयरे मंडळी जमली होती. कांहीं आसपासचे प्रमुख

ब्राह्मण जमले होते. ते तोंडानें वैदिक मंत्राचा उच्चार करीत होते आणि हातानें मंगल आक्षता वधुवरांवर फेंकित होते. बिचारे वधुवर तो मारा मुकाट्यानें सहन करीत होते. इतक्यांत कोणी एक तरुण मनुष्य गर्दीतून पुढें येतांना दिसला.

वधूच्या अगदीं जवळ येईपर्यंत तिकडे कोणाचेंही लक्ष गेलें नाहीं. पण तेथें तो दिसतांच एकदम जिकडे तिकडे स्तब्धता उत्पन्न झाला. शिपाई लोक तरवारी उपसूं लागले. कांहीं लोक भीतीनें आपापसांत कुजबजूं लागले. पण बोलण्याचें धैर्य कोणाच्यानेंही होईना. शेवटीं तो तरुण ह्मणाला.—

" वीरहो ! तरवार उपसण्याचा हा प्रसंग व हें ठिकाणही नव्हे. ज्याठिकाणीं ती उपसणें फार जरुरीचें आहे तेथें तुमचें तोंडही दिसत नाहीं. तुमचे स्वामी, महाराष्ट्राचे प्रभू, मोंगलाचे कैदी आहेत त्यांस सोडवण्याच्या कामीं आपली तरवार न उपसतां एखादा मनुष्य सामोपचारानें बोलण्यास आल्यास त्याचा असा सन्मान करतां काय ? या भाऊबाईच्या कृती आतां शिपायांस—वीरांसा—देखील रुचूं लागल्या आहेत हें महाराष्ट्राचें दुर्दैवच होय. सारेंच जेथें विपरीत झालें आहे तेथें तुह्मांस बोल लाऊन तरी काय उपयोग ? " असें ह्मणून तारेकडे वळून तो ह्मणाला " तारे ! तुला असेंच जर करायचें होतें तर तसें स्पष्ट कां लिहिलें नाहींस ! ह्मणजे मी तुझ्या सुखासाठीं वचनांतून तुला मोकळें केलें असतें. उलट मला बोल लावून तूंच वचनभंग करत्येस काय ? "

रणधीररावाच्या अवचित येण्यानें आनंदित झालेली व भांबावलेली तारा यावेळपर्यंत बेभान झाली होती. रणधीररावानें तिला उद्देशून केलेलें भाषण ऐकतांच ती भानावर आली. आपल्या घोर चुकीचें तिला अतिशय वाईट वाटूं लागलें आपण थोडा वेळ

जर वाट पाहिली असती तर आपले मनोरथ पूर्ण झाले असते ! अशा कल्पनेंत ती अतिशय दुःखी झाली. तिचा कंठ दाटून आला व डोळे भरून आले. सर्वांगास कंप सुटला. तोंडांतून शब्द निघेना. फक्त अश्रुपूर्ण नयनांनीं ती करुण मुद्रेनें रणधीररावांकडे पाहूं लागली. तिच्या या मुद्रेचा भाव त्याचे लक्षांत आला. आणि तो ह्मणाला, ' तारे ! याला कोण काय करणार ! परमेश्वरी इच्छाच अशी, ती बदलणार कशी ? तुझें मजवरचें प्रेम नष्ट झालें नाहीं ही खात्री तुझें स्वरूप देत आहे. पण तूं आपल्या परिस्थितीला काय करशील ? अयोग्य पुरुषासाठीं इतके हाल सोसून शेवटीं फळ तरी काय मिळालें असतें. बायजाबाईच्या विचारांत फरक पडेपर्यंत आपणांस सुखाची आशा मुळींच नव्हती. अशा स्थितींत तूं जें केलेंस तें तुला जरी सुखकारक नसलें तरी बायजाबाईस आणि कान्होजीरावांस तरी सुखकारक होवो ह्मणजे झालें. तुझें व माझें प्रेम या जन्मीं फलप्रद होणार नव्हतें. त्यासाठीं आपणांस निराळा जन्म घ्यावा लागावा अशीच परमेश्वरी इच्छा दिसते. तारे ! तूं जें केलेंस तें योग्यच केलेंस. तुझ्या शरीरावरचा या विवाहानें जरी माझा हक्क उडाला आहे तरी तुझ्या नांवावरची सत्ता नष्ट झाली नाहीं. कारण, तुला सासरीं दुसरें नांव मिळेलच व ' तारा ' या मंत्राचा जप करण्यास मलाही मोकळीक राहील. '

रणधीररावांच्या भाषणानें तारेचें हृदय अगदीं व्याकुळ झालें. रणधीररावांस झालेलें अतिशय दुःखही तिला स्पष्ट दिसलें. पण करणार काय ? आपण होऊन जी गोष्ट केली त्याचा दोष कोणाकडेच नाहीं असें तिला वाटे. आपण या विधीनें परपत्नी झाल्यामुळें आपणांवरचा रणधीररावाचा हक्क ज्याअर्थीं उडाला आहे त्याअर्थीं त्याचें प्रेमचिन्ह तरी कां जवळ बाळगावें ह्मणून मोठ्या धैर्यानें ती ह्मणाली—

" रणधीरराव ! परमेश्वरास रुचलें तेंच झालें. याला मनुष्याचा काय उपाय ? आतां या विधीमुळें मी कान्होजीरावांची धर्मपत्नी झाल्यें आहे. हा विधी झाला आहे. मजवर यामुळें इतर कुणाचाही पतित्वाचा हक्क नाहीं. मलाही या विधीमुळें यांचीच सेवा करणें भाग आहे. सध्यां मी परस्त्री आहें. आजपर्यंतचें आपलें प्रेम हें सध्यां या जन्मीं बंधुभगिनीचें झालें आहें. ह्मणून आजपर्यंत जपून ठेवलेलें तुमचें प्रेमचिन्ह परत घ्या. लोकमताप्रमाणें तुमचा मजवरचा हक्क उडाला आहे. तुह्मी वचनांतूनही मोकळे झाला आहां. " असें ह्मणून तारेनें ती आंगठी गुंडाळलेलें असें एक कागदाचें पुडकें त्यास दिलें. व तें त्यानें खिशांत ठेवलेंही. दुःखातिशयानें ती तेथेंच बेशुद्ध पडली. थोड्यावेळानें सावध झाली. रणधीरराव जड अंतःकरणानें परत जाण्यास निघाला. आपल्या कन्येच्या पातिव्रत्यपूर्ण भाषणानें आनंदित झालेल्या बायजाबाईनें त्यास त्या दिवशीं राहण्याचा फार आग्रह केला पण रणधीररावानें तें मान्य केलें नाहीं. फक्त ' तारे ! हा विवाह तुला सुखकारक होवो. परंतु बंधु ह्मणून देखील या रणधीररावांची आठवण ठेवूं नकोस आणि आपल्या कर्तव्यांत अंतर पडूं देऊं नकोस ' असें ह्मणून चट्कन् तो तेथून निघाला. जिकडेतिकडे आनंदीआनंद झाला. बायजाबाईस स्वर्गास दोनच बोटें उरलीं होतीं. आपल्या प्रत्येक कृतीस ज्याअर्थीं यश मिळत आहे त्याअर्थीं आपली योजकता फार अद्वितीय असली पाहिजे आणि परमेश्वराची अशा कामीं कृपाही असली पाहिजे असें तिला वाटत होतें.

समारंभही संपला. प्रत्येक मनुष्य विश्रांतीसाठीं गेला. नवपरिणतवधूसह कान्होजीराव मात्र आपल्या रंगमहालांत दिसत होते. विलासी माणसास अशा सुंदर सहचरीचा लाभ झाल्यामुळें जो आनंद झाला होता तो बाहेर पडण्यांत इतकावेळ साधलें

नसल्यामुळें सध्यां तो पूर्ण रंगेल विलासाच्या रूपानें डोकावूं पहात होता. तारा पलंगापासून दूर उभी होती. तिला हस्त-स्पर्श करून आमचे विलासी नूतन जामात बोलण्यास प्रारंभ करणार तोंच तारा त्यांना जरा आवेशानें ह्मणाली—“ कान्होजीराव ! विधीमुळें जरी जगाच्या दृष्टीनें मी तुमची पत्नी झाले असलें तरी तात्विक दृष्ट्या मी रणधीररावांची पत्नी आहे. मुरलीधरासमोर आह्मी दोघेही एकमेकांच्या वचनांत गुंतलों आहोंत. आमचा मानसविवाह झाला आहे. यासाठीं माझी आपणापाशीं पदर पसरून इतकीच विनंती आहे कीं, फक्त आईसाहेबांच्या खुशीसाठीं जो विधी होऊं दिला आणि त्यांची जी शेवटली हौस पुरूं दिली ती तितक्याच वेळेपुरती होती असें माना. आपणांस स्त्रियांच्या पातिव्रत्याची कांहीं किंमत वाटत असेल तर मला ज्यास्त निकराचा प्रसंग मात्र आणू नका. मला या जगांत आतां कोणतेंच कर्तव्य उरलें नाहीं. आईबापांची आज्ञा मोडूं नये ह्मणून मला इतका त्रास सोसावा लागला आहे ! बाबांच्या इच्छेप्रमाणें रणधीररावांवर प्रेम केलें. आई साहेबांच्या इच्छेसाठीं तुम-च्याशीं विधीपूर्वक विवाह लावला. आतां मला स्वतःस जें रुचेल तेंच करायचें आहे मला या पापी निर्दय जगाचा लवकर त्याग करायचा आहे. मला माझ्या प्रियकराच्या आराधनेसाठीं लवकर स्वर्गांत जायचें आहे. तुह्मी इतकेंच करा कीं, माझ्या मृतदेहावर मुरलीधराचे देवळा-शेजारी समाधी बांधा. आणि जगांत असें जाहीर करा कीं, माझा परपुरुषाशीं स्पर्श होण्यापूर्वींच अंत झाला. ”

कान्होजीराव तर या भाषणानें आधींच गांगरून गेले होते. निर्वा-णीच्या प्रसंगीं तिनें स्पष्टपणें केलेलें भाषण करतांना तिच्या तोंडा-कडे पाहण्याचें धैर्य त्यांना झालें नाहीं. परंतु, बऱ्याचवेळानें त्यांस अवसान आल्यावर त्यांनीं असा विचार केला कीं, ह्या शब्दांना भिऊन

हातची शिकार घालवावयाची नाहीं. ह्मणून ते ह्मणाले, “ प्रिये ! अशा ऐन सुखाच्या प्रसंगीं तूं अशी त्रागा करूं नकोस. दगडासमोर एका नीचावर प्रेम करण्याच्या फुकाच्या शब्दासाठीं हा सुखाचा प्रसंग कां घालवतेस. ये, माझ्या आलिंगनोत्सुक बाहूंस आपल्या शरीराचा आधार देऊन मला धन्य कर. ” असें ह्मणून तिला आलिंगन देण्यास ते पुढें सरसावले.

तारा ह्मणाली, “ कान्होजीराव ! तुह्मी परपुरुष आहां, ज्यास्त अचरटपणा कराल तर तुमचा हात मला स्पर्श करीपर्यंत माझा पवित्र आत्मा हा देह सोडून जाईल ! माझा आत्मा जाणारच आहे. पण तुह्मी माझें ह्मणणं ऐकाल तर तो माझ्या प्रियकराच्या चरणाजवळ समरांगणांत जाईल. न ऐकाल तर एका दुष्ट प्राण्याच्या अमानुषपणामुळें इथेंच जाईल. ”

कामांध झालेले कान्होजीराव ‘ पाहूं तर खरें पतिव्रता कशी मरतें तें. ’ असें ह्मणून ते तिचा हात धरण्यास गेले. तारेनें त्यांच्या छातींत एक जोरानें लाथ मारिली. कान्होजीराव दरवाज्याजवळ जाऊन पडले आणि उठून पाहतात तों तारेनें आपल्या उरांत जंबिया खुपसून घेऊन आत्महत्या केली. आतां डोळें उघडले; पण काय उपयोग ? दुसऱ्या दिवशीं सिंधफळ बिचाऱ्या तारेसाठीं हळहळूं लागला. बायजाबाईसही बरेंच वाईट वाटलें. पण रणधीररावाची पत्नी होण्यापेक्षां तिचें मरण तिला ज्यास्त बरें वाटलें. मुरारराव मात्र अगदींच वेडे झाले. त्यांनीं घर वर्ज्य केलें. ते जंगलांतच कोठेंतरी असत.

# प्रकरण ११ वें.

## उपसंहार.

पूर्वी सांगितल्याप्रमाणें शहाजादीनें संभाजीची सुटका करवून त्याच्या मदतीस आपल्या भावास पाठवलें. अशा आणिबाणीच्या प्रसंगीं आपल्या मुलानेंही बंड केलें हें बरें झालें नाहीं असें अवरंगजेबास वाटलें; पण तो मुळींच घाबरला नाहीं आणि तो निवडक सैन्यासह त्याजवर पहिल्यानें चाल करून गेला.

शिवाजीच्या उत्कर्षापासून महाराष्ट्रावर सत्ता गाजवण्याची अवरंगजेबाची महत्वांकाक्षा आतां खात्रीनें पूर्ण होणार असें त्यास वाटूं लागलें होतें. शिवाय संभाजी आणि कलुशा त्याच्या बंदींत असल्यामुळें आपणांस टक्कर देण्यास कोणाचेंच सामर्थ्य नाहीं असें त्यास वाटत होतें. महाराष्ट्रांत दुफळी झाली असल्यामुळें व कांहीं तटस्थ वृत्तीचे लोकही असल्यामुळें आपणांस तो प्रांत जिंकण्यास मुळींच त्रास पडणार नाहीं अशी त्याची कल्पना होती. पण अशावेळीं आपल्या मुलानें बंड केलेलें ऐकून तर तो जय्यत तयारीनें लढाईस सिद्ध झाला. आपण ज्याचा पक्ष घेऊन लढतों आहों तोच शत्रूच्या ताब्यांत असल्यामुळें अकबरशहास थोडीशीं निराशा वाटली. पण आतां लढाईस तोंड दिल्याशिवाय मार्गच नसल्यामुळें तो दोन हात करायला सिद्ध झाला. बापाच्या अशा या अफाट सेनेबरोबर आपले थोडे शिपाई कसे धीर धरतील याची त्याला भीति वाटली; पण त्याच्या सैन्यांत विशेषेंकरून रजपुतांचा भरणा असल्यामुळें व ऐनवेळीं कांहीं संभाजीच्या सरदारांनीं मदत केल्यामुळें त्या सेनासागराचे कांहीं चालेना. पहिल्यानें ते फार नेटानें लढत होते; पण मराठ्यांच्या पगड्या दिस-

तांच त्याची पांचावर धारण बसली. आतां आपणांस जय येणार नाहीं असें त्यांस वाटूं लागलें. सैन्यांतली शिस्त मोडली. बेबंदशाही सुरू झाली. यामुळें अकबरशहाच्या सैन्यास खूप आवेश आला. तें मोठ्या नेटानें लढूं लागलें. या देखाव्यानें संभाजीस पूर्ण आवेश आला. तंबूंतून निघून घोड्यावर स्वार होऊन तोही लढूं लागला. त्याला पाहतांच तर तत्पक्षीय लोकांस पूर्ण आशा वाटूं लागली आणि ते नेटानें लढूं लागले.

मराठ्यांस तर दुप्पट स्फुरण चढलें. 'हरहरमहादेव' या जयघोषांत मराठ्यांनीं दुसरा एक हल्ला चढवला. मोगललोकांस पुढें लढाई चालू ठेवण्याचें धैर्य झालें नाहीं. दीड तासाच्या तुमुल युद्धांत त्यांचे बरेच लोक मृत होऊन पडले होते त्यामुळें निराश होऊन त्यांनीं पळ काढला. झालें; अवरंगजेबाच्या सैन्याचा पुरा मोड झाला. आपण मोंगलास जिंकिलें असें वाटून त्यानें अवरंगजेबाशीं तहाचें बोलणें लावलें. अवरंगजेबानेंही तहांतील साऱ्या अटी मान्य केल्या. पण लवकरच त्यानें तो तह गुंडाळून ठेविला आणि पुन्हां महाराष्ट्र जिंकण्याची प्रचंड तयारी सुरू केली.

संभाजी या जयाच्या गर्वानें अगदींच फुगून गेला होता. तो पुन्हां पूर्वकर्मांत हळंहळूं मग्न होऊं लागला. त्याचे पूर्वीचे कलीजे पुन्हां जमूं लागले आणि पूर्वीच्या आयुष्यक्रमाचा पुन्हां ओनामा सुरू झाला होता. अकबरशहास पैशानें मदत करण्याचें दिलेलें अभिवचन तो विसरला. त्याची सल्लामसलत तर काय पण भेट देखील होईना. कबूल केल्याप्रमाणें रोषनार धर्मांतर करून विवाह करण्यास सिद्ध होईना. ती टाळाटाळी करूं लागली. अकबरशहास या सर्व गोष्टींचा त्रास आला. ज्याच्यासाठीं बहिणीनें आपणांस बापाविरुद्ध लढायास लाविलें त्या नीचानें आपणांसही मदत केली नाहीं आणि तिला दिलेलीं वचनें

पाळलीं नाहींत हें पाहून तो मोठ्या दुःखानें इराणांत निघून गेला. कारण आपल्या सैन्याच्या मोडक्या स्थितींत बापाच्या सैन्याशीं टक्कर देऊन जय मिळवणें त्याला शक्य नव्हतें. आणि जर कदाचित् आपण त्याच्या तडाक्यांत सांपडलों तर हालहाल करून प्राण घेतल्या खेरीज तो राहणार नाहीं अशी त्यास खात्री होती. या सर्व कारस्थानांतले रोषनारचे अंग बादशहास माहित नव्हतें म्हणून तिला या नीच मराठ्याशीं कसलाही संबंध न ठेवतां, बापाजवळच हुशारीनें राहण्यास सांगून तो तेथून निघून गेला. ही बातमी कळतांच बादशहास फार आनंद झाला.

संभाजीस पकडण्यासाठीं लढाई करून मनुष्याचे बळी घेण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें वाटून त्यानें मुकरबखान आणि तकरीबखान यांचीच पुन्हां या कामीं योजना केली. राजा पुन्हां जवळ जवळ पूर्वी इतकाच व्यसनी झाला असल्यामुळें त्यांना त्यांच्या कामास विशेष दिरंगाई लागली नाहीं. लवकरच पुन्हां संभाजीमहाराज मोंगलाचे कैदी झाले. आतां त्यास जास्त बंदोबस्तांत ठेविलें होतें. बादशहा समोर नेतांच त्यानें संभाजीस महमदीधर्म स्वीकारण्यास सांगितले; पण संभाजीनें रोषनारशीं लग्न होत असल्यास आपली कांहीं हरकत नाहीं असें म्हटलें. बादशहानें संतप्त होऊन त्याचा हाल हाल करून प्राण घेण्याचा हुकूम दिला !

संभाजीच्या अंतानंतर सर्व महाराष्ट्रदेश पुन्हा एक झाला. लोक संभाजीच्या मुलास गादीवर बसवून राज्यकारभार चालवण्यास कबूल झाले, पण ' शाहू ' मोंगलांच्या ताब्यांत गेल्यामुळें आणि त्यास तेथून सोडवून आणणें सुलभ नसल्यामुळें राजारामास त्याच्या मुक्ततेपर्यंत गादीवर बसवलें व शिवाजीमहाराजांच्या पद्धतीवर पुन्हां राज्यकारभार सुरू झाला. महाराष्ट्रांत पुन्हां सुराज्य सुरू झालें. विश्वासराव आपणांकडून देशकार्य झाल्याबद्दल समाधान पावून कोंकणांत गेले.

राष्ट्रकार्याचें यशाबद्दल विश्वासरावास समाधान वाटलें; पण ज्या भाच्यानें आपणास उत्तम मदत केली त्याच्या स्थितीमुळें मात्र अत्यंत दुःख झालें. तारेच्या लग्नानंतर रणधीरराव पुन्हा जे सैन्यांत आले तेव्हां पासून त्यांच्या मनोवृत्तींत भयंकर फरक पडला होता आणि पुढें तारेच्या मृत्यूच्या बातमीनें तर ते अगदींच वेडे झाले होते. लढण्यापलीकडे ते दुसरें कांहीं काम करीत नसत. निराश, आणि बेफाम झाल्यामुळें ते लढतांना बेफिकीर असत. त्यामुळें मोंगलांचा पूर्ण पराजय झाला. लढाईंत त्यांस एक भयंकर जखम लागली होती. त्यांतून ते बचावले नाहींत. मरेपर्यंत ‘ तारा ’ या नांवाचा जप चालला होता आणि तिच्या एका पत्राचें पारायण सारखें चाललें होतें. शेवटीं ‘ तारे मीही आलों ’ असें ह्मणून त्यांनीं प्राण सोडिला. तें पत्र लहानच होतें, तें असें:—

‘ प्रिय पतिराज ! ’

‘ पतिराज ’ हा शब्द मी हक्कानें मिळवून वापरावा असा परमेश्वरी संकेत नसेल. नसो, पण अशा निर्वाणीच्या प्रसंगीं तरी वापरण्यांत यावा असाच असेल. नाहीं कुणी ह्मणावें. ही प्रेमचिन्हाची आंगठी समजून फाडूं नका. ही आंगठी नव्हे हा माझा शेवटचा प्रेमसंदेश आहे. ती आंगठी मी आपणास देईन कशी ? ती माझ्या हक्काची आहे. ती स्वर्गांत देखील मजजवळच राहील. आईसाहेबांच्या अतिशय जाचामुळें आणि माझ्या दुर्दैवानें आपण येण्यास उशीर केल्यामुळें मी लग्नास कबूल झाल्यें. आणि त्याचवेळेस त्या बाह्योपचारिक लोकांत मानल्या जाणाऱ्या पतीचा या देहास स्पर्श होण्यापूर्वींच या देहाचा अंत करण्याचा निश्चय केला. कारण, पतिराज ! लग्न शरीराचें व्हायचें असतें तर त्यास मनाची–प्रेमाची–मुळींच अवश्यकता नसती. तसला विवाह आपला व माझा प्रत्यक्ष मुरलीधरासमोर झालेला आहे. या पापी जगासमोर झालेल्या विधीपेक्षां तो

ज्यास्त महत्वाचा आहे. लहानपणीं लुटुपुटीच्या खेळांत देखील मुलींना एक नवरा असतोच. शिवाय या जगाचा अगदींच कंटाळा आल्यामुळें मी मरण्याचा पूर्ण निश्चय केला होता, पण मरण्यापूर्वी आईची इच्छा तृप्त करावी ह्मणून हें लग्न केलें. आणि माझ्या पतिव्रतेच्या देहास कसलाही पापी स्पर्श होण्यापूर्वींच आणि लवकर स्वर्गांत जाऊन आपली मार्गप्रतिक्षा करण्यास मोकळीक मिळावी ह्मणून आजरात्रीं माझा आत्महत्या करण्याचा निश्चय आहे. सर्व तयारी आहे. लग्नाचे दिवशीं रात्रीं मी मेलेली आढळेन. आपण यानें भांबावून जाऊं नये. मजवरचें प्रेम नष्ट होऊं नये एवढ्याचसाठीं मी हें पत्र लिहिलें आहे. मरतांना देखील स्वार्थ सुटत नाहीं. पण त्यास काय इलाज ? याजन्मीं प्रेमाचा शब्द आपणांस बोलूं शकलें नाहीं. ती आशा पुढल्या जन्मीं खात्रीनें तृप्त होणार आहे.

आपली

स्वर्गवासी दासी तारा.

विश्वासरावास तारेच्या मृत्यूची हकीकत कळली होती. कारणही आज कळलें. आणि याचसाठीं रणधीररावही वेडा होऊन स्वर्गांत सात्विक प्रेम अनुभवण्यास गेला असें वाटलें. या तरुणांच्या शुद्ध प्रेमाचा असा शेवट झालेला पाहून त्यांस अतिशय वाईट वाटलें. ‘ निवळ प्रेमासाठींच ’ आमच्या महाराष्ट्राचे दोन सद्गुणांचे अवतार नष्ट झालेना ? असे उद्गार त्यांच्या तोंडून निघाले.

मुराररावांचें काय झालें हें मात्र कळलें नाहीं. फक्त बायजाबाई मरेपर्यंत सिंधफळच्या जहागीरदारीण होत्या.

मरणापूर्वीं रणधीररावानें विश्वासरावास सांगितल्याप्रमाणें सिंधफळास तारेच्या समाधी शेजारीं रणधीररावांची समाधी बांधली. भोंवताली बाग वगैरे लाविली. प्रवाशांच्या सोईसाठीं एक धर्मशाळाही बांधली. पण आतां ती धर्मशाळा पडून गेली आहे. व पूर्वींचीं चिन्हें स्पष्ट दिसत नाहींत.

पुणे मराठी ग्रंथालय
प. न. १९७२

## चारवाचनीय पुस्तकें.

अ... हिना २॥·

...राव २।·

र...पूतकुमारीतारा १।=

प्रमीला ·॥।·

मकरंदकार्यालय

पो. वाई । जि॰ सातारा.